
# अनुक्रमणिका



**4**
प्रारंभिक
**संकटकाळी कार्यकर्त्यांची मदत**
– जयंत पाटील



**5**
प्रबंध संपादकीय
**सावधानता हाच उपाय!**
– दिलीप वळसे पाटील




**6**
संपादकीय
**अस्वस्थ डोमकावळे**
– डॉ. सुधीर भोंगळे



**10**
**शरद पवार यांची खा. संजय राऊत यांनी घेतलेली मुलाखत**
**एक शरद बाकी सगळे गारद!**



**38**
**कोरोनाचे निमित्त आणि मनमानी राज्यकारभार**
आकाश, नवी दिल्ली (वार्तापत्र)



**48**
**भारत-चीन सीमा संघर्ष : वास्तव काय?**
**गहिनीनाथ**



**58**
**योगेश्वराचा तनुत्याग**
(लोकमान्य टिळक यांच्या स्मृतीशताब्दी निमित्त लेख)
**डॉ. सदानंद मोरे**



**66**
**छोडो भारत**
(क्रांतीदिनानिमित्त विशेष लेख
**डॉ. गणेश राऊत**



**74**
**अजित पवार यांची मुलाखत**
राज्याच्या महसूलावर परिणाम पण सरकारच्या इच्छाशक्तीवर नाही



**78**
**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मुलाखत**
राष्ट्रवादीत परत येणाऱ्यांसाठी दरवाजे खुले



**80**
**कानोकानी–** घंटाकर्ण



**88**
**राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून करण्यात आलेल्या मदतीचा आढावा**

**90**
**शरद पवार यांनी घेतलेल्या कोरोना प्रादुर्भाव आढावा बैठकीचा वृत्तांत**
१) औरंगाबाद– केंद्राने दिलेली मदत अजून राज्यात आलेली दिसत नाही.
२) नाशिक– राज्यात टेस्टिंग वाढविल्याने कोरोना रुग्णसंख्येत वाढ

**102**
**शेवटचे पान– शापीत जगणे**
– हेमन्त टकले





**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.



**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८
०२२-३०२३५५३०/५५/५६
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर अ‍ॅण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.











# राष्ट्रवादी
स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!
मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ । ऑगस्ट २०२० । वर्ष १३ वे /अंक ४

## प्रारंभिक



# संकटकाळी कार्यकर्त्यांची मदत

**ध्येयवादी व प्रामाणिक कार्यकर्त्यांची भूमिका ही कायम संकटात सापडलेल्या, अडचणीत असलेल्या व्यक्तीला इमानेइतबारे मदत करण्याचीच असते. कोरोनाचे संकट तर इतके भयानक आहे की सर्व पातळींवरून कितीही मदत केली तरी ती कमीच पडेल अशी स्थिती आहे. कोरोना झालेल्या व्यक्तीला व्हेंटीलेटर सुद्धा उपलब्ध होईल की नाही अशी परिस्थिती निर्माण होतो आहे. त्याच वेळी त्याच्या घरातील व्यक्तींनाही क्वारंटाईन करावे लागते आहे. सगळे कुटुंब अशावेळी भयभीत झालेले असते. त्यांना कार्यकर्त्यांच्या मदत व सहानुभूतीची गरज असते. अशा वेळीच आपली मदत त्यांना मोठी मोलाची किंबहुना अनमोल ठरणार आहे, याचे भान ठेवून अंगचोरपणा न करता स्वत:च्या जीवाची पूर्ण काळजी घेत आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याने लोकांच्या उपयोगी पडले पाहिजे.**






कोरोना महामारीमुळे अचानक जे संकट आपल्या सर्वांपुढे उभे राहिले आहे त्याने आपली कार्यपद्धती आणि जीवनप्रणालीच पूर्णपणे बदलून टाकली आहे. या बदलाला समर्थपणे व धैर्याने सामोरे जाऊन संकटांशी जो खंबीरपणे मुकाबला करु शकेल तोच या महामारीने निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करु शकेल. संपूर्ण जगच या संकटाचा सामना करीत असल्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर याचे गंभीर परिणाम झालेले आहेत. अगोदरच मागील ५-७ वर्षांपासून जग आर्थिक मंदीचा अनुभव घेत असतानाच कोरोना कोविड-१९ याने ही मंदी आणखीन गहिरी आणि विस्तारुन ठेवली आहे. जीवनाचे कोणतेच क्षेत्र आज असे नाही की ज्याला कोरोनाचा फटका व झटका बसलेला नाही. सगळी क्षेत्रे या संकटाने पूर्ण भाजून काढली आहेत, होरपळून निघाली आहेत. लाखो लोकांचे जीवन या महामारीने उद्‌ध्वस्त केले.

अमेरिकेसारख्या विकसीत देशांना अजूनही महामारीवर संपूर्ण नियंत्रण आणता आलेले नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सेवासुविधा, अद्ययावत उपकरणे व नवनवीन औषधे, प्रचंड इन्फ्रास्ट्रक्चर, स्वच्छता, राहणीमान, चांगले आर्थिक उत्पन्न व पैसे खर्च करण्याची क्षमता या सर्व गोष्टींचा विचार केला तर त्या तुलनेत आपण देश म्हणून (पान १०० वर)



## प्रबंध संपादकीय



# सावधानता हाच उपाय!

**कोरोनाचे संकट लगेचच पूर्णपणे आटोक्यात येईल अशी शक्यता दिसत नाही. आणखीन काही काळ तरी आणि या व्हायरसला प्रतिबंध करेल अशी लस निघेपर्यंत तरी संपूर्ण सुरक्षा बाळगीत काळजीचे जीवन सर्वांना जगावे लागेल असे चित्र दिसते आहे. या संकट काळात अनेक नवनवीन संकटेही उभी राहात आहेत. या सर्वांवर खंबीरपणे मात करण्यासाठी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संकटग्रस्त असलेल्या जनतेला मदतीचा हात दिला पाहिजे. सहानुभूतीचा ओलावा दाखविला पाहिजे. करुणेचे मूल्य हे निस्वार्थ भावनेने मदत करण्यातच तडलेले असते. समोरच्याचे दु:ख पाहून आपल्या मनात करुणा व मदत करण्याची भावना निर्माण होणे हेच मानवतेचे लक्षण आहे.**



कोरोना कोविड-१९ या व्हायरसने संपूर्ण जगामध्ये जो प्रचंड धुमाकूळ घालून जे भयानक संकट उभे केले आहे त्याचा अनुभव मागील ५-६ महिन्यांपासून आपण सारेजण घेत आहोत. 'न भूतो न भविष्यती' अशा प्रकारचे हे संकट असून त्याचा सामना व प्रतिरोध सावधगिरी बाळगत व संपूर्ण काळजी घेतच आपल्याला करावा लागणार आहे. नाका-तोंडाला रुमाल वा मास्क लावणे, हात सॅनिटाईज करणे वा वारंवार साबणाने धुणे, थोडे एकमेकांपासून लांब बसणे (सोशल डीस्टन्स पाळणे) यांसारख्या गोष्टी अगदी दिसायला साध्या असल्या तरी आजच्या संकटसमयी खूप मोलाच्या आहेत. त्यांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे.

अनेक लोक आणि खेडेगावातले आपले कार्यकर्तेही बऱ्याचदा म्हणतात, ''खेडेगावात, शेतात कुठे कोरोना आहे? आम्हांला कोरोनाला भिण्याचे कारण नाही. खेडेगावात स्वच्छता असते. घाण नसते, त्यामुळे रोग काही पसरत नाही.'' वास्तविक हा रोग संसर्गजन्य आहे. तो लगेच वेगाने पसरतो. काहींच्या शरीरात याची लक्षणे दिसतात तर काहींना रोग होऊन गेला तरी लक्षणे दिसत नाहीत व कळतही नाही. सर्दी, खोकला, श्वासोच्छवासाला त्रास होणे, ताप येणे, घसा खवखवणे यांसारखी लक्षणे या साथीमध्ये आढळून येत असली तरी सर्वांच्या ठिकाणी ती दिसतीलच असे नाही. त्यामुळे बेसावध व गाफील (पान १०१ वर)



# संपादकीय



# अस्वस्थ डोमकावळे

**समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पवार साहेब रात्रंदिवस आजही काम करीत असताना भाजपच्या नेत्यांनी मात्र कुत्सितपणे राज्यात दोन मुख्यमंत्री आहेत, स्टेअरींग कुणाच्या हाती आहे, उद्धवजी नावाला मुख्यमंत्री आहेत, खरी सत्ता राष्ट्रवादीच राबवित आहे असा जाणीवपूर्वक व धादांत खोटा प्रचार चालविलेला आहे. महाआघाडी सरकारमध्ये बेबनाव निर्माण व्हावा म्हणून अनेक पाताळयंत्री क्लृप्त्या भाजप नेत्यांकडून केल्या जात आहेत. कर्नाटक आणि मध्यप्रदेश मधील राज्य सरकारे पाडल्यानंतर आता ते राजस्थानच्या मागे आहेत. तिथला कार्यक्रम झाल्यानंतर महाराष्ट्रातले महाआघाडीचे सरकार पाडण्याच्या मागे लागणार असल्याचे भाजपचेच नेते सांगत आहेत. पण त्यांना अजून शरद पवारांचा हिसका कळलेला दिसत नाही.**

कोरोना महामारीच्या संकटामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था खूप अडचणीत आली आहे. जवळपास दोन लाख कोटी रुपयांनी उत्पन्न घटले आहे. त्यामुळे शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांचे पगार नियमितपणे कसे करावेत असा प्रश्न राज्य सरकारपुढे उभा आहे. विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न तर खूप दूरच आहे. आधी तातडीने निधी द्यावा लागतो तो कोरोनाग्रस्तांचा जीव वाचविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या हॉस्पिटल्स, औषधे, व्हेंटीलेटरसारखी लागणारी उपकरणे, बेडस् व वैद्यकीय सोयीसुविधा आणि आरोग्यासाठी आवश्यक असणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरच्या उभारणीकरिता. अचानक टोळधाडीसारखे हे संकट उद्‌भवल्यामुळे जगातल्या अमेरिका, फ्रान्स, चीन, इंग्लंड, इटली, ब्राझीलसारखे आर्थिकदृष्ट्या विकसीत व प्रगत असलेले देशसुद्धा जिथे गांगरून गेले तिथे आपण या संकटामुळे खडबडून गोंधळलो तर नवल वाटायला नको. पण तरीदेखील महाराष्ट्रातील महाआघाडीच्या सरकारने सुरुवातीपासूनच अत्यंत नियोजनपूर्वक, सावधपणे धोरणे आखीत त्यांची कठोरपणे अंमलबजावणी केली आणि जनतेनेही त्यांना मनापासून साथ दिली म्हणून कोरोना कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या साथीला बऱ्यापैकी प्रतिबंध महाराष्ट्रात घालता आला.



२२ मार्चला मा. पंतप्रधानांनी दूरदर्शनवरुन भाषण करुन त्याच दिवशीच्या रात्री आठपासून लॉकडाऊनची घोषणा केली. क्षणार्धात सगळा देश बंदिस्त करुन टाकला. २०१६ मध्येही नोटबंदीची घोषणा त्यांनी अशाच प्रकारे करुन जनतेला संकटांच्या खोल दरीत लोटले होते. तोच प्रकार त्यांनी लॉकडाऊन बाबतही केला. वास्तविक २२ मार्चला भाषण करताना त्यांनी ३-४ दिवसांची मुदत लोकांना इकडून तिकडे जाण्यासाठी दिली असती आणि वाहतुकीची रेल्वे, बसगाड्या, विमाने, खासगी कार व इतर वाहने चालू ठेवली असती तर लोक आपापल्या घरी वा सोयीच्या ठिकाणी तातडीने रवाना झाले असते. पण अचानक लॉकडाऊनची घोषणा करून सगळ्यांना अटकाव व प्रतिबंध केला. लाखो लोकांचे प्रचंड हाल झाले. हातावर पोट असणाऱ्या मजूर आणि कामगारांवर उपासमारीची पाळी आली. लोक भिकाऱ्यासारखे वणवण हिंडू लागले. दोन वेळच्या अन्नसाठी महाग झालेले लोक कुणी जेवायला घालतंय, शिदा देतंय, नाश्ता वाटतंय म्हटलं की धावत पळत सुटायचे. मोठमोठ्या रांगा लावायचे. त्या रांगा व माल मिळण्यावरुन किती भांडणे, मारामाऱ्या झाल्या. कोरोना, सोशल डीस्टन्स राहिले बाजूला. शेकडो-हजारो माणसे त्या वस्तु गोळा करण्यासाठी तुटून पडत होते. फुकट गोळा करणाऱ्यांची जी अवस्था होती तीच स्थिती माल विकत घेणाऱ्यांचीही होती.

आर्थिक परिस्थिति चांगली असलेले लोकही भाजीपाला, किराणा, फळे, दूध

यांसारख्या वस्तु व माल मिळेल की नाही या भितीपोटी सगळ्या दुकान व विक्रेत्यांपुढे सकाळपासून झुंबडीने जाऊन उभे राहात होते. गंमत म्हणजे धुणे, भांडी, फरशी पुसणाऱ्या मोलकरणी कामाला येणे बंद झाल्यामुळे घरातल्या माणसांना ही सर्व कामे करावी लागणार होती. याच वेळी फरशी पुसणारा झाडू बाजारातून अचानक गायब झाला होता. किती म्हणून अडचणी सांगाव्यात! लॉकडाऊनच्या काळात जनतेने सर्व प्रकारच्या अडचणी व संकटांचा सामना केला. सहनशीलता व मर्यादा सांभाळली. पण जेव्हा दुःख आणि उपासमार सोसवेना तेव्हा लोक मोठ्या संख्येने घराबाहेर पडले. मिळेल त्या वाहनाने, पायी, सायकल-मोटार सायकलवरुन रणरणत्या उन्हात उपाशीपोटी, रस्त्यात जो कुणी काही देईल ते खात चालत राहिले. ''भुकेल्या पोटी मनुष्य तत्त्वज्ञान ऐकत नाही, न्याय-अन्यायाचा विचार करीत नाही आणि प्रार्थनेसाठीही कुणापुढे वाकत नाही.'' असे सेन्सा या विचारवंताचे प्रसिद्ध वाक्य आहे. त्याची प्रचिती यावेळी सर्वांना आली. हे लोक मोठ्या संख्येने व झुंडीच्या झुंडी जेव्हा आपापल्या राज्यात, गावात गेले त्यानंतर कोरोना साथीचा व रोगाचा राज्यात व देशभर प्रचंड वेगाने प्रसार झाला. मार्च महिन्यात जेव्हा रोगाचे नावही कुणाला फारसे माहिती नव्हते आणि रोग्यांची संख्याही अत्यल्प होती तेव्हाच लोक, मजूर, कामगार आपापल्या गावी जाऊ दिले असते तर आज रूग्णांची संख्या एवढी वाढली नसती. ग्रामीण भागात व खेड्यात महामारीचा इतका भयानक प्रसार झाला नसता. पण मा. पंतप्रधान ना कुणाशी बोलतात, ना संवाद करतात वा इतरांची मते समजून घेतात. स्वतःचेच घोडे सतत पुढे दामटायचे आणि 'मी म्हणतो तेच ब्रह्मवाक्य,' या पद्धतीने त्यांचा कारभार चालू असल्यामुळे त्यांच्या अहंगंडतेची व तर्कशून्य विचारसरणीची फळे जनतेला भोगावी लागत आहेत.

महाराष्ट्राची सत्ता हातातून गेल्यामुळे भाजपाचे नेते अगोदरच प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. सत्तेचा मलिदा चाखण्याची सवय लागल्यामुळे व तो आता मिळत नसल्यामुळे कावरेबावरे झालेले हे डोमकावळे महाआघाडी सरकारच्या उणीवा, चुका, कामातला अनियमितपणा, उशीर शोधून काढण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असून चांगल्या सुरळीत चाललेल्या कामात खोडा कसा घालता येईल असा प्रयत्न करीत आहेत. पाच वर्षे स्वतः सत्तेवर असताना भाजपच्या नेत्यांनी कधीच शेतकऱ्यांना न्याय दिला नाही, मदत केली नाही. त्यांना संपूर्ण कर्जमाफी देवून सातबारा कोरा केला नाही. उलट अनेक नियम व जाचक अटी घालून दोन लाख रूपयांपर्यंतची कर्जमाफीही मिळू दिली नाही. दूध उत्पादकांनी लिटरला ५ रु. भाव वाढवून द्यावा म्हणून राज्यभर आंदोलने केली. पण त्यांच्या पदरात रूपयाही पडला नाही. त्यावेळी दुग्धविकास मंत्री असलेल्या महादेव जानकरांना दूध उत्पादकांच्या अडचणींची जाणीव झाली नाही आणि दूध उत्पादनाचे अर्थशास्त्रही समजले नाही. आता मात्र सत्ता गेल्यावर दूधाला लिटरमागे १० रु. भाव वाढवून मिळावा म्हणून पांडुरंगाला पंढरपुरात जाऊन दुधाचा अभिषेक करताहेत. पांडुरंग काय असल्या खोट्या दांभिकांना पावणार आहे का? कविवर्य सुरेश भट यांच्या शब्दात सांगू का -

**''मठोमठी मंबाजींना कीर्तन करू द्या**
**विठू काय असल्या बेईमानांना पावणार आहे?''**


विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करण्याची आणि जनहित विरोधी तसेच निष्फळ धोरणांना विरोध करण्याची भूमिका जरुर बजावली पाहिजे त्याबद्दल कुणाच्याही मनात संदेह नाही. पण केवळ विरोधासाठी विरोध करणे हे न्याय्य नाही. राज्यकर्त्यां पक्षानेही लोकांना उत्तर देण्यास व चुकांचा खुलासा करण्यासाठी जबाबदार वर्तन करावे यासाठी दक्षता घेतली पहिजे. विरोधी पक्ष आपला अधिकार सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही व्यासपीठावरुन वापरु शकतात. ते म्हणजे सरकारच्या चांगल्या किंवा वाईट व्यवहाराचे उत्तरदायित्व ठरविण्याचा जनतेचा अधिकार वापरण्यासारखे आहे. पण आज आपण असे पाहतो आहोत की विरोधी पक्षाचा व्यवहार हा सद्हेतूक असतोच असे नाही. ते राईचा पर्वत करु पाहतात. एखादी क्षुल्लक बाब जाणीवपूर्वक मोठी करतात. कोरोनाला प्रतिबंध करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना, औषधांचा पुरवठा, नवनवीन रूग्णालये व खाटांची निर्मिती या सगळ्यात भाजपला फक्त भ्रष्टाचार दिसतो. चुकीची माहिती समजामध्ये पसरवून सरकार कसे बदनाम होईल यासाठी भाजपचे नेते सातत्याने प्रयत्नशील आहेत. गोबेल्स निती वापरण्याचे त्यांचे तंत्र फार जुने आहे. शिवाय सत्तेवर असताना भाजपच्या मंत्र्यांनी किती प्रचंड भ्रष्टाचार केला आहे हे लोकांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. त्यामुळे आता त्यांनी नाकाने वांगी सोलू नयेत असे लोक जाहीरपणे बोलू लागले आहेत.

समाजातील फार मोठा विभाग कोणत्याही राजकीय पक्षाला जोडलेला नसतो आणि ते काही कोणत्याही पक्षाला एखाद्या सैद्धांतिक लोलकामधून बघत नाहीत तर त्या त्या पक्षाच्या गुणवत्तेकडे बघत असतात. त्यामुळे सर्वसाधारणपणे जनतेला राजकीय पक्ष हा पर्याय असू शकत नाही. लोकांना न्याय मिळविण्यासाठी लोकशाही हक्कांचा वापर करावा लागतो. लोकशाही हक्क हे तलवारही आहेत आणि ढालही आहेत. सत्ताधाऱ्यांपासून संरक्षण करण्यासाठी ते तलवारीसारखे आहेत. मतभिन्नता दाखवण्याचा हक्क, चुकीच्या व्यवहाराबाबत निषेध करण्याचा हक्क, न्याय मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याचा हक्क हे जनतेचे स्वाभाविक हक्क आहेत. या हक्कांची मोदी सरकारने मागील सहा वर्षात केलेली पायमल्ली आणि फडणवीस सरकारने पाच वर्षे सत्तेत असताना केलेला अंदाधुंद मनमानी कारभार

याची कितीतरी उदाहरणे देता येतील. स्वतः काचेच्या घरात राहणाऱ्यांनी इतरांच्या घरांवर दगड फेकायचे नसतात याचे कणभरही भान भाजप नेत्यांना राहिलेले दिसत नाही. सत्ता ही गोरगरीबांच्या आणि संकटात सापडलेल्या जनतेच्या सेवेसाठी वापरायची असते. कुत्र्यामांजरांच्या नावावर हजारो एकर जमीन घेणाऱ्यांसाठी नव्हे, हे माजी मुख्यमंत्र्यांना कोणी सांगायचे? केवळ विरोध आणि टीका करण्यासाठी विरोधी पक्षनेत्यांनी दौरे करण्यापेक्षा जनतेच्या अडीअडचणी व समस्या समजावून घेऊन त्यांना सरकारमधून कशी मदत करता येईल याबाबतच्या सूचना व सल्ले मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि त्यांच्या मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांना दिले असते तर ते जास्त विधायक व समाजोपयोगी काम झाले असते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशातील ज्येष्ठ राजकीय नेते मा. शरदरावजी पवार हे आज वयाच्या ८० व्या उंबरठ्यावर आहेत. अनेक दुर्धर आजारांचा त्यांनी प्रभावीपणे सामना केला आहे. एवढेच नव्हे तर आजही व्याधींवर मात करीत ते संकटसमयी जनतेच्या मदतीला धावून जात आहेत. साताराच्या सभेत त्यांनी भर पावसात भिजत भाषण केल्यानंतर जनतेच्याही डोळ्यात अश्रू आले. या सभेने महाआघाडीचे सरकार सत्तेवर बसविले. आता सत्ता आली म्हणून तिची फळे चाखत बसू असला क्षुद्र व शुल्लक विचार कधीही पवार साहेबांच्या मनाला शिवला नाही. सत्ता ही समाजाच्या कल्याणासाठीच वापरायची असते हा ध्येयवाद व गुरूमंत्र आयुष्यभर शरदरावांनी डोळ्यात तेल घालून जपला आहे. त्यामुळेच कोरोना महामारीच्या भयानक संकटाशी लढणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस, आशा वर्कर्स आणि हॉस्पिटल बॉईजसाठी त्यांनी कोट्यावधी रूपयांचे फेसशिल्ड, औषधे राष्ट्रवादी वेलफेअर फंडातून वाटली. इतकेच नव्हे तर तीन हजार तमाशा कलावंतांना प्रत्येकी तीन हजार रुपये आणि रंगमंच बॅकस्टेज आर्टिस्टला प्रत्येकी २५०० प्रमाणे १५०० लोकांना आर्थिक मदत फंडातून केली. वादळात रायगड आणि रत्नागिरीतील प्राथमिक शाळांचे पत्रे उडून गेले त्यांना ५० लाखांचे पत्रे दिले. १३ महाविद्यालयांना शंभर संगणक दिले. जवळपास साडेतीन कोटी रुपयांची मदत या संकटकाळात राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून त्यांनी केली आहे. हा माणुसकीचा झरा आहे. करूणेचे मूल्य आहे. इतके करून ते थांबले नाहीत. आपल्या स्वतःचा जीव धोक्यात घालून शरदराव पवार साहेब यांनी कोरोना संकटाचा आढावा घेऊन सरकारला योग्य ती उपाययोजना सुचविण्यासाठी संबंधित मंत्र्यांना व पालकमंत्र्यांना बरोबर घेऊन नाशिक, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांचे दौरे केले व मिटींग घेऊन प्रश्नाची दाहकता व वस्तुस्थिती समजून घेतली. या प्रश्नावर सरकारला मार्गदर्शन करून उपाययोजना सुचविण्यासाठी ते स्वतः कितीतरी वेळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सह्याद्री अतिथीगृहावर जाऊन भेटले. त्यांना लेखी सूचना केल्या. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनाही त्यांनी कोविड-१९ या संकटाबाबत अनेक पत्रे पाठविली.

समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पवार साहेब रात्रंदिवस आजही काम करीत असताना भाजपच्या नेत्यांनी मात्र कुत्सितपणे राज्यात दोन मुख्यमंत्री आहेत, स्टेअरींग कुणाच्या हाती आहे, उद्धवजी नावाला मुख्यमंत्री आहेत, खरी सत्ता राष्ट्रवादीच राबवित आहे असा जाणीवपूर्वक व धादांत खोटा प्रचार चालविलेला आहे. महाआघाडी सरकारमध्ये बेबनाव निर्माण व्हावा म्हणून अनेक पाताळयंत्री क्लृपत्या भाजप नेत्यांकडून केल्या जात आहेत. कर्नाटक आणि मध्यप्रदेश मधील राज्य सरकारे पाडल्यानंतर आता ते राजस्थानच्या मागे आहेत. तिथला कार्यक्रम झाल्यानंतर महाराष्ट्रातले महाआघाडीचे सरकार पाडण्याच्या मागे लागणार असल्याचे भाजपचेच नेते सांगत आहेत. पण त्यांना अजून शरद पवारांचा हिसका कळलेला दिसत नाही. ते भाजपवाल्यांना कुठल्या घाटावर नेऊन पोहचवतील आणि कुणाकुणाला कात्रजचा घाट दाखवतील हे वेळ आल्यावर कळेलच. तेव्हा भाजप नेत्यांनी उगीचच सरकार पडण्याची स्वप्ने पाहू नयेत. हे सरकार व्यवस्थितपणे पाच वर्षे चालणार आहे. तेव्हा विरोधकाची भूमिका प्रभावीपणे व विधायक कामातून





कशी बजाविता येईल याचा गांभीर्याने विचार करा. जनतेच्या कल्याणासाठी सरकार बरोबर हातात हात घालून काम करा. निवडणुकीच्यावेळी जे करायचे ते राजकारण करा.

सत्य न सांगणे आणि असत्य सांगणे, यात मूलभूत फरक आहे हे भाजप नेत्यांनी लक्षात घ्यावे. असत्य सांगणे ही हेतुतः केलेली कृती होय. स्वतःशी कधीही असत्य बोलता येत नाही. कारण असत्य सांगतानासुद्धा सांगणाऱ्याला सत्य काय हे माहीत असते. एकाचे सत्य हे दुसऱ्याचे असत्य ठरू शकते. असत्य कथनाच्या पारंपारिक प्रकारात सत्य लपविण्याकडे ओढा असतो तर आधुनिक प्रकारात सत्यापलाप आणि सत्य-नाश करण्याकडे कल असतो. पूर्वी आपल्याकडे 'नरो वा कुंजरो वा' म्हणणारे होतेच. आणि आज 'सत्यमेव जयते' हे घोषवाक्य म्हणून स्वीकारलेल्या आपल्या राष्ट्रात राजकीय नेते किती बेमालूम असत्य सांगत असतात एवढंच नव्हे तर दस्तुरखुद्द आपल्या पंतप्रधानांनाच जनतेने जर 'फेकू' हे नाव दिलेले असेल तर भाजपनेत्यांनी असत्याचा किती कळस गाठला आहे हे वेगळे सांगायची जरूरी आहे का? आधुनिक प्रकारात म्हणजे सत्यापलापाच्या जाणीवपूर्वक केलेल्या प्रयत्नात प्रतिमा-वृद्धी ही वास्तवापेक्षा अधिक महत्त्वाची ठरते आणि म्हणून राजकीय नेत्यांची प्रतिमा तयार करण्यासाठी आणि ती अधिकाधिक 'उजळ' करण्यासाठी सरकारी प्रयत्नांची किती शिकस्त केली जात आहे हे पंतप्रधान मोदींच्या रुपाने आपण पाहतोच आहोत. प्रसारमाध्यमे आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा प्रतिमा-वृद्धीसाठी मोदींनी जेवढा वापर केला तेवढा अन्य कोणत्याही पंतप्रधानांनी आजपर्यंत केलेला नाही. ते सारे प्रामाणिकपणे देशहितासाठी कार्यरत राहिले. असत्य-कथन हे व्यक्तिशः घातक नसले तरी सार्वजनिक हिताला ते बाधक ठरते, म्हणून ते अयोग्य होय हे स्पष्टपणे सांगण्यातच राष्ट्रीय हित आहे.

अजूनही वेळ गेलेली नाही. कोरोना कोविड-१९ चे संकट इतक्या लवकर संपुष्टात येईल असे वाटत नाही. भाजप नेत्यांनी या संकटाचे राजकीय भांडवल करू नये. तसे केले तर ते लोकांच्या जीवाशी खेळण्यासारखे आहे. सत्ता येते आणि जाते. सत्तेचा अमरपट्टा कधीच कोणाला लाभत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात आपल्या पक्षाची सत्ता नाही म्हणून भरीव आर्थिक मदत करायची नाही, त्यांच्याबद्दल दुजाभाव बाळगायचा व त्यांना सावत्रपणाची वागणूक द्यायची असे धोरण केंद्र सरकारने राबवू नये. डॉ. मनमोहन सिंग साहेब हे देशाचे पंतप्रधान आणि श्री. शरद पवार हे देशाचे कृषिमंत्री असताना श्री. नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री होते. तेव्हा या दोघांनीही मनात कोणताही आकस न ठेवता आणि श्री. मोदी हे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर टीकेचा भडीमार करीत असतानाही त्यांनी गुजरातला भरभरुन मदत केली व अनेक नवनवीन योजना राबविण्यासाठी केंद्रातून सढळ हाताने पैसे दिले हे मोदी कसे विसरतात? संकटकाळात महाराष्ट्राला केंद्र सरकारने मनापासून मदत दिली पाहिजे. देशाच्या तिजोरीत कराच्या रूपाने सर्वाधिक रक्कम महाराष्ट्रातली जनताच देते. अशा वेळी महाराष्ट्राला पाण्यात बघून त्याची उन्नती रोखण्याने देशाचीही उन्नती रोखली जाणार आहे. महाराष्ट्राला खाली खेचण्याचे पाप केंद्र सरकारने करू नये आणि महाराष्ट्रातल्या भाजपच्या नेत्यांनी असल्या दळभद्री कुटील राजनितीला खतपाणी घालू नये एवढीच कळकळीची विनंती!

■■■

# एक शरद, बाकी सगळे गारद!



**संजय राऊत : सध्या नक्की काय चाललंय?**

**शरद पवार :** सध्या खास असं काही चाललेलं नाही. काय चालणार? एक तर देशात आणि राज्यात काय चाललंय याच्यावर लक्ष ठेवणं आणि वेगवेगळ्या लोकांशी सुसंवाद ठेवणं, अगदी राजकारणाबाहेरच्या लोकांशी मी बोलतोय आणि काही चांगलं वाचायला मिळालं तर वाचन करणं याच्या बाहेर काही फारसं चाललेलं नाही.

**संजय राऊत : लॉकडाऊनचे हे फायदेसुद्धा आहेत.**

**शरद पवार :** संकट तर आहेच, पण त्यातून जे चांगलं करता येईल, सकारात्मक दृष्टिकोन ठेवता येईल ते करणं गरजेचं आहे. याचं महत्त्वाचं कारण की आता कोरोनाचं जे संकट जगावर आलंय त्यामुळे लॉकडाऊन आहे. सगळ्या गोष्टी बंद आहेत. दुर्दैवानं लॉकडाऊनसारखे जे काही निर्णय सगळ्यांना घ्यावे लागले त्याचा हा परिणाम आहे. समजा हा लॉकडाऊनचा काळ नसता, हे संकट नसतं तर कदाचित माझ्याबद्दल काही वेगळं चित्र पाहायला मिळालं असतं हे नक्की!

**संजय राऊत : पण लॉकडाऊनचा काळ अद्यापि संपलेला नाही. आपण अनेकदा भविष्याचा वेध घेता. आपल्याला स्वप्नात तरी असं कधी वाटलं होतं का, की अशा प्रकारच्या संकटाला माणसाला तोंड द्यावं लागेल?**

**शरद पवार :** कधीच वाटलं नाही. माझ्या वाचनात काही जुने संदर्भ आहे. खासकरून काँग्रेस पक्षाचा इतिहास वाचताना. काँग्रेस पक्षाची स्थापना जी झाली त्याला एक इतिहास आहे. खरं तर काँग्रेसची स्थापना पुण्यात व्हायची होती १८८५ साली आणि तिथं अधिवेशनही ठरलं होतं. पण प्लेगची साथ त्याच काळात मोठ्या प्रमाणावर आली. माणसं मृत्युमुखी पडायला लागली म्हणून पुण्याची जागा शिफ्ट झाली मुंबईमध्ये आणि आता ज्याला ऑगस्ट क्रांती मैदान म्हणतात किंवा गवालिया टँक, तिथे ते अधिवेशन झालं. पण त्यावेळचा प्लेगच्या साथीचा संपूर्ण इतिहास लिहिला गेलांय. त्यात असं चित्र होतं, की राज्याच्या अनेक भागात प्लेगमुळे माणसं मृत्युमुखी पडत होती. सगळे व्यवहार थांबले होते, पण ती वाचनात आलेली गोष्ट आहे. कारण त्यावेळी माझा जन्म झालेला नव्हता आणि आज कधी अपेक्षा केली नाही, कधी विचार केला नाही, अशाप्रकारचं चित्र ते महाराष्ट्रापुरतं सीमित नाही. अवघ्या विश्वात आहे. हे कधी अनुभवास येईल असं कधी वाटलं नव्हतं. पण परिस्थितीला

सामोरे जावेच लागेल.

**संजय राऊत : आज माणूस माणसाला घाबरतोय असं चित्र आहे...**

**शरद पवार :** हो, अगदी घराघरांत हेच चित्र आहे. डॉक्टरांच्याही सूचना आहेत, की एकमेकांपासून जेवढं दूर राहता येईल, तेवढं दूर राहायला हवं. तुम्ही काळजी घ्या. नाही तर त्याचे दुष्परिणाम सहन करावे लागतील. त्यामुळे अवघे विश्व चिंतेत आहे. या सगळ्या कालखंडात एकच गोष्ट मोठ्या प्रमाणावर बघायला मिळतेय की समाजातल्या सगळ्या घटकांमध्ये एकप्रकारची घबराट आहे. आता हळूहळू ती कमी व्हायला लागलीय हे खरं; पण या घबराटीमुळे घरातून माणूस घराबाहेर पडणार नाही असं कधी वाटलंही नव्हतं ते आपल्याला पाहायला मिळालं.

**संजय राऊत : वेगळ्या पद्धतीचा कर्फ्यु लागलांय अनेकदा...**

**शरद पवार :** म्हणजे मला आठवतंय, की पूर्वी चीन वा पाकिस्तानचं युद्ध झालं तेव्हा एक-दोन दिवस कर्फ्यु असायचा. शत्रू राष्ट्राचे वैमानिक हल्ला करणार आहेत अशा बातम्या यायच्या तेव्हा अशाप्रकारचा कर्फ्यु होत असे. असायचा. लोक घरामध्ये बसायचे. पण ते एका दिवसासाठी, अर्ध्या दिवसासाठी किंवा एखाद्या रात्रीसाठी हा कर्फ्यु असे. पण आता कोरोनामुळे लोक महिना-महिना, दोन-दोन महिने, अडीच महिने घराबाहेर पडलेले नाहीत. हे चित्र कधी पाहायला मिळेल असं वाटलं नव्हतं. आता एक वेगळीच स्थिती कोरोनामुळे आपल्याला पाहायला मिळाली.

**संजय राऊत : लॉकडाऊनचा सुरूवातीचा काळ सगळ्यांकडून अत्यंत कठोरपणे पाळला गेला. मग कलाकार असतील, आपल्यासारखे राजकारणी असतील, उद्योजक असतील...**


**शरद पवार :** दुसरा काय पर्याय होता? घरी थांबणं हाच सगळ्यात सुरक्षित उपाय होता.

**संजय राऊत : आपण तर सतत फिरणारे नेते आहात. सतत लोकांमध्ये राहणारे नेते आहात. हा लॉकडाऊनचा सुरूवातीचा काळ आपण कसा व्यतित केला?**

**शरद पवार :** तो सुरूवातीचा महिना, दीड महिना मी



**देशातील सर्वात ज्येष्ठ आणि अनुभवी नेते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दैनिक सामनाला मॅरेथॉन मुलाखत दिली. खासदार संजय राऊत यांनी विचारलेल्या कोरोना, लॉकडाऊन, चीनचे संकट, ढासळलेली अर्थव्यवस्था अशा सर्वच प्रश्नांवर त्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. राजकीय टोलेबाजीही केली. ही ऐतिहासिक आणि खळबळजनक मुलाखत प्रश्नोत्तरे स्वरूपात जशीच्या तशी...**



लॉकडाऊनच्या काळात शरद पवार हे मुंबईतील आपल्या निवासस्थानी भीमसेन जोशी यांची गाणी ऐकताना.

अक्षरशः माझ्या घराच्या चौकटीच्या बाहेरसुद्धा गेलो नाही. अगदी प्रांगणातसुद्धा गेलो नाही. चौकटीच्या आतच होतो. त्याची काही कारणं होती. एक तर घरातून प्रेशर होतं. त्यानंतर सगळ्या तज्ज्ञांनी सांगितलं होतं, की ७० ते ८० या वयोगटातील सगळ्यांनी अत्यंत काळजी घेण्याची गरज आहे किंवा हा वयोगट अतिशय व्हलनरेबल आहे. मी नेमका त्या वयोगटात येतो. त्यामुळे अधिक काळजी घेतली पाहिजे हा घरच्यांचा आग्रह होता आणि नाही म्हटलं तरी मनावर दडपण. त्यामुळे मी त्या चौकटीच्या बाहेर फारसा कुठे गेलो नाही. बराचसा वेळ टेलिव्हिजन, वाचन याच्याबाहेर काही दुसरं केलं नाही.

**संजय राऊत : आम्ही तुमचा एक व्हिडिओ पाहिला, जो सुप्रियाताईंनी टाकला होता. त्यात आपण व्हरांड्यात फेऱ्या मारताय आणि गीत–रामायण ऐकताय.**

**शरद पवार :** हो, या काळात खूप गाणी ऐकली. भीमसेन जोशींचे सगळे अभंग ऐकले. हे सगळे अभंग दोन–तीन–चार वेळा नव्हे, अनेकदा ऐकले. जुन्या काळात हिंदीमध्ये बिनाका गीतमाला असायची. आता ती नव्याने उपलब्ध आहे. त्याही पुन्हा पुन्हा ऐकण्याची संधी यानिमित्ताने मिळाली. संपूर्ण गीत–रामायण पुन्हा ऐकलं. ग. दि. माडगुळकरांनी काय जबरदस्त कलाकृती या देशाच्या विशेषतः महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या सांस्कृतिक विश्वात निर्माण करून ठेवलीय याचा पुन्हा प्रत्यय आला.

**संजय राऊत : तुमचा राममंदिराच्या आंदोलनाशी कधी संबंध आला नाही, पण गीत–रामायणाशी येतोय...**

**शरद पवार :** नाही, त्या आंदोलनाशी कधी संबंध आला नाही.

**संजय राऊत : पण रामायणाशी संबंध आलाय...**

**शरद पवार :** तो गीत–रामायणाच्या माध्यमातून!

**संजय राऊत : कोरोनाचं संकट तर राहणारच आहे असं जागतिक तज्ज्ञांचं मत आहे. हे संकट एवढ्यात दूर होणार नाही. ते तसंच राहील, पण लॉकडाऊनचं संकट किती काळ राहील असं आपल्याला वाटतं?**

**शरद पवार :** एक गोष्ट तर या काळात स्पष्ट झालेली आहे, की इथून पुढं तुम्हाला, मला, आपल्या सर्वांना कोरोनासोबत जगायची तयारी ठेवली पाहिजे. कोरोना आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग होतोय अशा प्रकारची भूमिका तज्ज्ञांकडून मांडली गेली आहे. त्यामुळे आता आपणही हे स्वीकारायलाच हवं. ही परिस्थिती गृहित धरूनच पुढे जाण्याची तयारी ठेवली पाहिजे. प्रश्न आहे तो लॉकडाऊनचा. चिंताजनक परिस्थिती निर्माण करतो तो लॉकडाऊन.

**संजय राऊत : म्हणजे लॉकडाऊनबरोबर पुन्हा जगावं लागेल का?**

**शरद पवार :** नाही, अगदीच तसं नाही. लॉकडाऊनसह कायम जगावं लागेल असं मला वाटत नाही. अलीकडे मी काही तज्ज्ञांशी बोलत होतो. त्यांनी सांगितलं, की साधारणत: जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापासून तो ट्रेंड खाली जाईल. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पूर्ण खाली जाईल आणि पुन्हा नॉर्मलसी येईल, पण याचा अर्थ कोरोना कायमचाच संपला असं काही गृहित धरण्याचं कारण नाही. कधी रिव्हर्सही होऊ शकतो. त्यामुळे यापुढे आपल्याला कोरोनाची काळजी घ्यावी लागेल आणि आपल्या सगळ्या व्यवहारात काळजी घेण्याची गरज आहे, पण कोरोनासारखी अशी परिस्थिती पुन्हा उफाळून आली तर लॉकडाऊन करण्याची वेळ येते आणि लॉकडाऊन केल्यामुळे जे परिणाम झालेत, उदाहरणार्थ अर्थव्यवस्थेवर झालेत, प्रवासावर झालेत. हे सगळं आपण आता पाहिलंय. यापुढे अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये अशी आपली प्रार्थना आहे. पण अर्थसंकट आलंच तरी आपली सर्वांची त्यासाठी तयारी असली पाहिजे.

**संजय राऊत : त्यासाठी समाजात जागरूकता आणणं गरजेचं आहे, असं वाटतंय का?**

**शरद पवार :** हो नक्कीच. माझं तर स्वच्छ मत आहे, की इथून पुढे आता आपल्या पाठ्यपुस्तकात हा दोन-अडीच महिन्यांचा जो कालखंड आपण अनुभवला यासंबंधी जी काळजी अथवा खबरदारी घेण्याची आवश्यकता आहे यावर आधारित एखाद् दुसरा धडा पाठ्यपुस्तकात असणं गरजेचं आहे.

**संजय राऊत : गेले काही दिवस ज्या बातम्या येताहेत त्या आधारावर असं विचारतोय, की लॉकडाऊन संदर्भात आपली भूमिका आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भूमिका वेगळी आहे. मतभेद आहेत.**

**शरद पवार :** अजिबात नाही. कसले मतभेद? मतभेद कशाकरता? या संपूर्ण काळात माझा मुख्यमंत्र्यांशी उत्तम संवाद होता. आजही आहे.

**संजय राऊत : पण लॉकडाऊन शिथिल करावा अशी आपली भूमिका होती आणि त्यासंदर्भात मतभेद होते असं प्रसिद्धी माध्यमांत आलंय.**

**शरद पवार :** प्रसिद्धी माध्यमात काय आलंय ते येऊ द्या. एक लक्षात घेतलं पाहिजे. वृत्तपत्रांच्या काही समस्या असतात. जसं लॉकडाऊनमुळं आम्हाला घराबाहेर पडता येत नाही, आमची बरीचशी कामं करता येत नाहीत, बऱ्याचशा ॲक्टिव्हिटीज थांबल्यात. याचे परिणाम जसे बऱ्याचशा घटकांवर झाले आहेत, तसे वृत्तपत्रांवरही झाले आहेत. मुख्य परिणाम म्हणजे, त्यांना जे वृत्त हवं असतं ते वृत्त देणारे जे उद्योग असतात, कार्यक्रम असतात ते कमी झाले आणि त्यामुळे जागा भरण्यासंबंधीची जबाबदारी त्यांना टाळता येत नाही. मग यांच्यात आणि त्यांच्यात नाराजी आहे अशा बातम्या दिल्या जातात. दोन-तीन दिवस मी वाचतोय की आमच्यात म्हणजे, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेत मतभेद वाढताहेत. त्यात यत्किंचितही सत्य नाही, पण त्या बातम्या येताहेत. येऊ द्या!

**संजय राऊत : माझा प्रश्न असा होता, की लॉकडाऊन**



कोरोना संकटाची वस्तुस्थिती आरोग्यमंत्री राजेश टोपे हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना सादर करताना.

**हळूहळू उठवावा अशी आपली भूमिका आहे. लोकांना मोकळीक दिली पाहिजे असं आपलं म्हणणं आहे.**

**शरद पवार :** हे पहा, यात माझं स्वच्छ म्हणणं असं आहे, की सुरूवातीच्या काळात कठोरपणानं लॉकडाऊन करण्याची आवश्यकता होती. त्याची अंमलबजावणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात झाली. इथे तशी आवश्यकताच होती. एवढी कठोर भूमिका घेतली नसती तर कदाचित न्यूयॉर्कसारखी अवस्था इथे झाली असती. आपण न्यूयॉर्कसंबंधीची वृत्ते वाचतो, की हजारो लोकांना या संकटामुळे मृत्यूला सामोरे जाण्याची वेळ आली. तीच स्थिती इथे आली असती. इथे कठोरपणे लॉकडाऊन राबवला आणि विशेष म्हणजे लोकांनी त्यांना सहकार्य केलं. त्यामुळे इथली परिस्थिती सुधारायला मदत झाली. नाहीतर अनर्थ झाला असता. पहिले दोन महिने-अडीच महिने याची आवश्यकता होती. याबाबत मुख्यमंत्री ठाकरे आणि राज्य सरकारचा दृष्टिकोन शंभर टक्के बरोबर होता. आमचा सगळ्यांचा याला मनापासूनचा पाठिंबा होता.

**संजय राऊत : लॉकडाऊनचा सगळ्यात मोठा फटका कामगार व उद्योजकांना बसला. त्यामुळे शिथिलता आणावी असं आपलं मत होतं...**

**शरद पवार :** या काळात मी अनेकांशी चर्चा केली. त्यात उद्योजकही होते. कामगार संघटनांचे लोक होते, त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर माझं एक मत बनलं ते मी मुख्यमंत्र्यांच्या नक्कीच कानावर घातलं. याला मतभेद म्हणत नाहीत. स्पष्ट सांगायचं म्हणजे काही ठिकाणी, उदाहरणार्थ दिल्ली. दिल्लीत रिलॅक्सेशन केलं. काय झालं तिथे? त्याची झळ बसली, पण व्यवहार हळूहळू सुरू झाले. कर्नाटकच्या सरकारने रिलॅक्सेशन केलं. त्याच्यातही काही परिणाम झाले. नाही असं नाही. पण कर्नाटकातले व्यवहार सुरू झाले. हे महत्त्वाचं. या पद्धतीने पावले टाकावी लागतील. कारण सबंध समाजाची, राज्याची, देशाची अर्थव्यवस्था संपूर्ण उद्ध्वस्त झाली तर कोरोनापेक्षा त्याचे दुष्परिणाम पुढे काही पिढ्यांना सहन करावे लागतील. त्यामुळे ही अर्थव्यवस्था पुन्हा कशी सावरता येईल







त्यादृष्टिने काळजी घेऊन आपण पुढे कसं जायचं याचा विचार करावा लागेल. तेवढ्यापुरता निर्णय घ्यावा लागेल. याचा अर्थ सगळं खुलं करा असा नव्हे, पण थोडीबहुत तरी आता हळूहळू मोकळीत द्यायला हवी. तशी ती दिली आहे. उदाहरणार्थ परवा मुख्यमंत्री ठाकरे यांनी सलून सुरू करण्याबाबत निर्णय घेतला. त्याची आवश्यकता होती. कारण अनेक आमचे मित्र भेटायचे. त्यांना पाहून त्यांच्या डोक्यावर एवढे केस आहेत हे पहिल्यांदाच कळलं. कोरोनाचा परिणाम. दुसरी गोष्ट अशी की या व्यवसायात असलेल्या लोकांच्या कौटुंबिक समस्या फार वाढायला लागलेल्या होत्या. त्यादृष्टिने सलून सुरू करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला तो माझ्या मते योग्य निर्णय होता.

**संजय राऊत : म्हणजे मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पद्धतीने**

**लॉकडाऊन शिथिल करण्याचा निर्णय घेतला...**

**शरद पवार :** नक्कीच. मुख्यमंत्री ठाकरे यांनी घेतलेला निर्णय हा थोडा उशिरा घेतला असं काहींना वाटलं असेल, पण त्यांनी तो निर्णय योग्य वेळी घेतला. मुख्यमंत्र्यांचा जो स्वभाव आहे त्याच स्वभावाला साजेसाच हा निर्णय आहे. म्हणजे निर्णय घ्यायचाच, पण अत्यंत सावधगिरीने. निर्णय घेतल्यावर दुष्परिणाम होणार नाहीत याची खातरजमा जेवढी करून घेता येईल तेवढी करून घ्यायची आणि मग पाऊल टाकायचं. एकदा पाऊल टाकल्यावर मागे घ्यायचं नाही ही त्यांची कार्यपद्धती आहे.

**संजय राऊत : बाळसाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीत हा फरक आहे तर...**

**शरद पवार :** बरोबर आहे...हा फरक आहे. तसा तो राहणारच.





**संजय राऊत : बाळासाहेब ठाकरे तडकाफडकी निर्णय घेऊन निर्णयाला सामोरे जात, पण बाळसाहेब कधीच सत्तेत नव्हते आणि उद्धव ठाकरे प्रत्यक्ष मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर आहेत...**

**शरद पवार :** हादेखील फरक आहेच ना. बाळासाहेब हे प्रत्यक्ष सत्तेत नसले तरी सत्तेच्या पाठीमागचे एक मुख्य घटक होते. त्यांच्या विचाराने महाराष्ट्रात सत्ता आली हे महाराष्ट्राने आणि देशाने बघितलं. आज विचाराने सत्ता आली नाही, पण सत्ता प्रत्यक्ष कृतीत आणण्याच्या संबंधीची जबाबदारी आताचे मुख्यमंत्री ठाकरे यांची आहे. हा फरक महत्त्वाचा आहे.

**संजय राऊत : या सगळ्या परिस्थितीत कधी तुम्हाला बाळसाहेब ठाकरेंची आठवण येते का?**

**शरद पवार :** येते ना. कोरोना आणि लॉकडाऊनमुळे पहिले दोन महिने स्वस्थपणे घरामध्ये बसून होतो. बाळासाहेबांची कामाची पद्धत माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त माहित आहे. ते काय दिवसभर घराच्या बाहेर पडून कुठे गेलेले असायचे असे नाही. अनेक वेळेला ते दिवस दिवस घरातच घालवायचे. पण ते घरात असतानासुद्धा सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांना प्रोत्साहित करून आलेल्या परिस्थितीला कसं तोंड द्यायचं हे बाळासाहेबांनी शिकवलं होतं असं मला वाटतं. माझ्यासारख्याला या दोन महिन्यात बाळासाहेबांची आठवण अशासाठी येत होती, की आपण घरातून तर बाहेर पडायचं नाही, पण बाकीची कामं, ज्या दिशेने आपल्याला जायचंय, त्या दिशेला जाण्याच्या प्रवासाची तयारी आपण केली पाहिजे. ते ज्या पद्धतीने बाळासाहेब करायचे त्याची आठवण या काळात झाली.

**संजय राऊत : कोरोनामुळं संपूर्ण जग बदललंय. त्या बदललेल्या जगाचा परिणाम हिंदुस्थानवरसुद्धा होतोय, देशावरसुद्धा होतोय. म्हणजे परदेशात जो नोकरदार वर्ग जगभरात पसरला होता, जो आपला होता तो आपल्या देशात परत आलाय. मगाशी आपण न्यूयॉर्कचा उल्लेख केलात. तिथूनसुद्धा हजारो लोक इथे परत आले. या बदललेल्या जगाकडे आपण कसं पाहता?**

**शरद पवार :** माझ्या मते एक संधी म्हणून या परिस्थितीकडे आपण पाहिलं पाहिजे. हे संकट आहे. या संकटामुळे पहिल्यांदा लक्षात आलं, की जगाच्या कानाकोपऱ्यात भारतीय कुठे कुठे पोहोचलेत. विशेषत: लॉकडाऊनच्या पहिल्या दोन महिन्यांत मुंबईत बसून एक काम फार करावं लागलं. ते काम असं की, अनेक देशांतून टेलिफोन यायचे की आमच्या देशात इतके इतके भारतीय आहेत. त्यांना परत यायचंय. त्यांना परतण्यासाठी विमानाच्या व्यवस्थेसाठी सहकार्य करा. मला आश्चर्याचा

धक्का केव्हा बसला? जेव्हा फिलिपिन्समधून ४०० मुलं मेडिकल एज्युकेशन घेणारी परत आणण्याची व्यवस्था मला करावी लागली. ताश्कंदवरून तीनशे-साडेतीनशे विद्यार्थी हे आणण्यासंबंधी व्यवस्था मला करावी लागली. इंग्लंड, अमेरिकेचे ठीक आहे, पण हे जे देश आहेत या देशात एवढ्या मोठ्या संख्येने आपले विद्यार्थी गेले आहेत हे माहितच नव्हतं. जगाच्या कानाकोपऱ्यात भारतीय आणि मराठी हे दोन्ही बघायला मिळाले. हे कोरोनामुळे घडले.

**संजय राऊत : या सगळ्या प्रकरणात या देशाचं आणि राज्याचं राजकारणच बदलून गेलं आहे. आतापर्यंत आपल्यासारखे मोठे नेते हे जाहीर सभा घ्यायचे. हजारो-लाखोंच्या सभांना संबोधित करायचे. प्रधानमंत्री मोदी असतील,**

बघायला मिळत नाही, पण टेलिव्हिजन आणि रेडिओच्या माध्यमातून सबंध देशाचे लक्ष त्या दिवशीच्या चर्चेकडे असायचे. समजा, राष्ट्राध्यक्षपदाचा उमेदवार वा प्रतिस्पर्धी उमेदवार या दोघांमध्ये डिस्कशन, चर्चा, प्रश्नोत्तरे असतात त्याकडे लागलेलं असतं. सबंध देश हे बघत असतो. पण ते पाहण्याचं आणि व्यक्त करण्याचं माध्यम वेगळं आहे. आपलं माध्यम वेगळं आहे.

**संजय राऊत : आपल्याकडे हे डीजिटल सभेचे प्रकरण रूजेल?**

**शरद पवार :** आपल्याकडं कसं आहे, इथल्या राजकीय नेत्याला, वक्त्याला समोर गर्दी नसेल तर त्याच्या बोलण्याला धार येत नाही. मी बोलतोय ते समोरच्याला किती पटतंय, किती डायजेस्ट होतंय, हे त्यांच्या चेहऱ्यावरून कळत असतं



शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे यांची मुंबईतील भव्य सभा.


अटल बिहारी वाजपेयी भव्य जनसमुदायापुढे बोलताना.

**आपण असाल, इतर नेते असतील. आता हे सगळं बंद होणार. हे राजकारणालाच लॉकडाऊन झालं की काय.**

**शरद पवार :** तुम्ही म्हणतांय ते बरोबर आहे. आजतरी चित्र तसंच दिसतंय. नव्या पद्धतीचं राजकारण आता स्वीकारावे लागेल.

**संजय राऊत : मुळात, आपल्या भारतीय राजकारणाचा आत्मा गर्दी आहे. गर्दी नसेल तर आपलं राजकारण इंचभरही पुढे जाणार नाही. आपला संदेश पुढे जाणार नाही. लाखांची गर्दी जो जमवतो तो मोठा नेता हे आतापर्यंत आपल्या देशातलं चित्र होतं.**

**शरद पवार :** ही स्थिती एकदम बदलेल असं मला वाटत नाही. हळूहळू पूर्वपरिस्थिती येत जाईल, पण आपल्याला ही स्थिती दुर्लक्षित करता येणार नाही. आपण अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक बघतो. त्या निवडणुकीत चित्र अगदी वेगळं असतं. आपल्याकडे चित्र वेगळे आहे. आपण भारतात बघतो, बाळासाहेबांची लाखोंची सभा व्हायची. अटलजींची लाखांची सभा व्हायची. इंदिरा गांधींची व्हायची. यशवंतराव चव्हाणांची व्हायची. हे चित्र अमेरिकेत किंवा पश्चिमी देशात

आणि समजा तो स्तब्ध राहिला...गर्दीचा अजिबातच प्रतिसाद मिळत नसला तर त्याचाही परिणाम वक्त्यावर होत असतो. या सगळ्यांतून आपण गेलोय, पण आता हळूहळू या सगळ्या जुन्या पद्धती आपल्याला बदलाव्या लागतील. म्हणजे मी त्या शंभर टक्के संपतील असं म्हणत नाही. पण त्या हळूहळू कमी होणारच. कम्युनिकेशनची मॉर्डन टेक्नॉलॉजी आत्मसात करण्याचा विचार करावा लागेल.

**संजय राऊत : पण ग्रामीण भागात हे कसं रूजणार? विधानसभा निवडणुकीत ज्या प्रकारचं वातावरण आपण स्वत: निर्माण केलंत, त्यामुळे पुढे परिवर्तन होऊ शकलं. विशेषत: तुमची भरपावसातली सातारसारखी सभा ही नवीन यंत्रणेत कशी होणार? लोकांना मनापासून वाटतं की मी माझ्या नेत्याला पाहावं, समोरून ऐकावं. हे सर्व थांबेल असं वाटत नाही का यापुढे?**

**शरद पवार :** नक्कीच हे थांबेल. माझ्यासारख्या माणसाला, माझ्या पिढीच्या माणसाला ते थांबलं तर मजा नाही. लोकांमध्ये जावंच लागेल. निवडणुकीच्या सभेतसुद्धा जान नाही अशीसुद्धा

स्थिती येईल की काय याची चिंता आहे, पण हे फार दिवस चालेल असं वाटत नाही. चालू नये अशी प्रार्थना आहे.

**संजय राऊत : एक वर्षापूर्वी या देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्या. साधारण देशाची परिस्थिती आणि राजकारण जैसे थे राहिले. म्हणजे जी व्यवस्था होती ती व्यवस्था कायम राहिली. प्रधानमंत्री मोदी आहेत. त्यांचे सरकार कायम राहिले. केंद्रातील राजकीय व्यवस्था बदलेल अशी शक्यता नव्हतीच. लोकसभेचे निकाल लागायचे तसेच लागलेत. पण काही राज्यांत बदल झाले. विशेषत: आपण महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्राचे राजकारण सहा महिन्यांपूर्वी पूर्ण बदलून गेले. अशा प्रकारे बदललं की संपूर्ण देश या महाराष्ट्राच्या घडामोडींकडे भविष्यातला एक वेगळा विचार म्हणून पाहू लागले. अनेकांच्या मनात एक प्रश्न आहे, की हा जो बदल आहे महाराष्ट्रातला हा एक अपघात होता. त्या वेळेला झाला? की हा बदल सगळ्यांनी ठरवून केला.**

**शरद पवार :** मला अपघात अजिबात वाटत नाही. दोन गोष्टी आहेत. महाराष्ट्रातली लोकसभेची निवडणूक. देशाच्या लोकसभेच्या निवडणुकीत फारसं अंतर नव्हतं. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातल्या मराठी जनतेनंसुद्धा देशातलं जे चित्र होतं त्याच्याशी सुसंगत महत्त्वाची भूमिका घेतली. पण राज्याचा प्रश्न आला त्यावेळेला महाराष्ट्रातलं चित्र वेगळं आपल्याला दिसायला लागलं. ते केवळ महाराष्ट्रातच नाही तर अन्य राज्यांतही दिसत होतं. कुठं काँग्रेस आली, कुठे इतर आघाड्या सत्तेवर आल्या. आता मध्य प्रदेशचं उदाहरण घ्या किंवा राजस्थान, झारखंड, छत्तीसगड...या सगळ्या राज्यांत चित्र बदललं. लोकसभेला तेथे जागा होत्या, पाठीशी केंद्रातलं सरकार होतं, पण विधानसभेला भाजपची पिछेहाट पाहायला मिळाली. महाराष्ट्रात माझ्या मते चित्र बदलायचा मूड लोकांचा होता.

**संजय राऊत : असं आपण कसं म्हणता?**

**शरद पवार :** उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होण्यापूर्वीचा काळ पहा. या पाच वर्षात शिवसेना आणि भाजपचं सरकार होतं, पण शिवसेनेच्या विचाराचा जो मतदार आहे आणि शिवसेनेचा जो कार्यकर्ता आहे त्या सगळ्यांमध्ये त्या सरकारविषयी एकप्रकारची अस्वस्थता स्पष्ट दिसत होती.

**संजय राऊत : असं तुम्हाला काय जाणवलं?**

**शरद पवार :** शिवसेनेची काम करण्याची विशिष्ट पद्धत आहे. एखादी गोष्ट हाती घेतल्यानंतर ठोसपणाने ती राबवायची. त्यासाठी कितीही कष्ट आणि किंमत देण्याची तयारी ठेवायची. भाजपसोबतच्या सहभागाच्या या कालखंडात शिवसेनेने मोठी किंमत मोजली. साधारणत: शिवसेनेला गप्प कसं ठेवता येईल, थांबवता कसं येईल, त्यांना बाजूला कसं ठेवता येईल ही भूमिका भाजपने सातत्याने घेतली. त्यामुळे हा शिवसेनेस मानणारा वर्ग बाजूला झाला. शिवसेनेला मानणारा वर्ग अस्वस्थ होता. दुसरी गोष्ट, ती पाच वर्षे महाराष्ट्राच्या जनतेने पाहिली ती खऱ्या अर्थाने भाजपचंच सरकार असावं अशीच होती. याच्याआधी युतीचं सरकार होतं. १९९५ साली मनोहर जोशी मुख्यमंत्री होते. त्यात हे असं वातावरण कधी नव्हतं. याचं कारण त्याचं नेतृत्व शिवसेनेकडे होते आणि बाळासाहेबांकडे होते. या सरकारच्या मागे त्यांची



खासदार संजय राऊत हे शरद पवार यांची 'दै. सामना'साठी मुलाखत घेताना.

भक्कम भूमिका होती. आता जे या दोघांचं सरकार होतं, त्यात भाजपने शिवसेनेला जवळपास बाजूला केलं आणि भाजप हेच खरे राज्यकर्ते आणि या पुढच्या कालखंडात राज्य भाजपच्या नेतृत्वाच्या विचारानेच चालणार ही भूमिका भक्कमपणानं घेऊन त्यांनी पावलं टाकली. महाराष्ट्राच्या जनतेला हे पटत नव्हतं.

**संजय राऊत : म्हणजे या महाराष्ट्रात आम्हीच राजकारण करणार, दुसरं कोणी करणार नाही...**

**शरद पवार :** हो, करूच शकत नाही. दुसरं कोणी इथं राजकारण करूच शकत नाही अशी भावना दिसत होती.

**संजय राऊत : मग या विरोधात लोकांचं बंड उफाळून मतपेटीतून आलं असं वाटतं का?**

**शरद पवार :** अगदी सरळ सरळ तसंच चित्र आहे आणि थोडाफार हा चेष्टेचाही विषय झाला की 'मी परत येणार...मी परत येणार...'

**संजय राऊत : मी पुन्हा येईन...**

**शरद पवार :** हो, मी पुन्हा येईन...या सगळ्यामुळं एक तर असं आहे, की कुठल्याही राज्यकर्त्याने, राजकीय नेत्याने मीच येणार ही भूमिका घेऊन जनतेला गृहित धरायचं नसतं. अशा गृहित धरण्यात थोडासा दर्प आहे अशा प्रकारची भावना लोकांच्यात झाली आणि यांना धडा शिकवला पाहिजे हा विचार लोकांच्यात पसरला.

**संजय राऊत : माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच एका मुलाखतीत म्हटले की माझं सरकार गेलं किंवा मी मुख्यमंत्रिपदी नाही हे पचवणं खूप कठीण गेलं. हे समजून घ्यायलाच दोन दिवस लागले. याचा अर्थ असा आहे की, आपली सत्ता कधीच जाणार नाही या भूमिकेत...अमरपट्टाच बांधून आलेलो आहोत.**

**शरद पवार :** हे पहा, कुठल्याही लोकशाहीतला नेता आपण अमरपट्टा घेऊन आलोय असा विचार करू शकत नाही. या देशातल्या मतदारांना गृहित धरलं तर तो कधी सहन करत नाही. इंदिरा गांधींसारख्या जनमानसांत प्रचंड पाठिंबा असणाऱ्या व्यक्तीलासुद्धा पराभव पहावा लागला होता. अटलबिहारी वाजपेयींसारख्या नेत्यालासुद्धा पराभव पाहायला मिळाला. याचा अर्थ असा आहे की, या देशातला सामान्य माणूस लोकशाहीच्या अधिकाराच्या संदर्भात आम्हा राजकारणातल्या लोकांपेक्षा



अधिक शहाणा आहे आणि आम्ही पाऊल चाकोरीच्या बाहेर टाकतोय असं दिसलं की तो आम्हालाही धडा शिकवतो. त्यामुळे कोणतीही भूमिका घेऊन बसलो की आम्हीच, आम्हीच येणार...तर लोकांना ते आवडत नाही.

**संजय राऊत : १०५ आमदारांचं बळ असतानासुद्धा प्रमुख पक्ष सत्ता स्थापू शकला नाही. सत्तेवर येऊ शकला नाही. हीसुद्धा एक अजब कला किंवा महाराष्ट्रात चमत्कार होता. याला तुम्ही काय म्हणाल?**

**शरद पवार :** असं आहे की, तुम्ही ज्याला प्रमुख पक्ष म्हणतांय, तो प्रमुख कसा बनला याच्याही खोलात जायला पाहिजे. माझं स्पष्ट मत आहे की, विधानसभेला त्यांच्या

आमदारांची १०५ ही जी फिगर झाली त्यात शिवसेनेचं योगदान फार मोठं आहे. त्यातून तुम्ही शिवसेना मायनस केली असती, त्याच्यात सामील नसती तर १०५चा आकडा तुम्हाला कुठेतरी ४०-५०च्या आसपास यावेळी दिसला असता. भाजपचे लोक जे सांगतात की, आम्ही १०५ असतानाही आम्हाला आमच्या सहकाऱ्याने म्हणजे शिवसेनेने दुर्लक्षित केलं किंवा सत्तेपासून दूर ठेवलं. त्यांना १०५पर्यंत पोहोचवण्याचं काम ज्यांनी केलं त्यांनाच जर गृहित धरण्याची भूमिका घेतली तर मला वाटत नाही की इतरांनी काही वेगळं करण्याची आवश्यकता आहे.

**संजय राऊत : पण त्यांना जे जमलं नाही ते शरद पवार यांनी जमवून दाखवलं आणि शिवसेनेला भाजपशिवाय मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचवलं.**

सन्मानाने वागणूक देऊन त्यातून एकत्र येण्याचा विचार केला आणि पुढे सत्ता येण्यात हातभार लावला. दुसरी गोष्ट अशी होती की, काँग्रेसशी त्यांचा संघर्ष होता, पण तो काही कायमचा संघर्ष होता असं मला वाटत नाही. शिवसेना ही काँग्रेसच्या कायमचीच विरोधात होती असं नाही.

**संजय राऊत : बाळासाहेब हे चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट हे तोंडावर म्हणणारे नेते होते. त्यामुळे हे घडलं असावं.**

**शरद पवार :** हो, बाळासाहेब तसेच होते. जितके रोखठोक तितकेच दिलदार. राजकारणात ही अशी दिलदारी दुर्मिळ आहे. कदाचित बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना ही या देशातली एकमेव संघटना अशी असेल की एखाद्या राष्ट्रीय



**शरद पवार :** असं म्हणणं हे पूर्ण खरं नाही. मला जे बाळासाहेब ठाकरे माहित आहेत, माझ्यापेक्षा तुम्हा लोकांना कदाचित अधिक माहिती आहेत, पण बाळासाहेबांची सबंध विचारधारा, कामाची पद्धत ही भारतीय जनता पक्षाच्या विचाराशी सुसंगत होती असं मला कधी वाटलंच नाही.

**संजय राऊत : का...? असं का वाटतं आपल्याला?**

**शरद पवार :** सांगतो ना. त्याचं कारण असं आहे की, बाळसाहेबांची भूमिका आणि भाजपची विचारधारा यात अंतर होतं. विशेषत: कामाच्या पद्धतीत जमीन-अस्मानाचा फरक आहे. बाळासाहेबांनी सन्मान केला तो काही व्यक्तींचा केला. त्यांनी अटलबिहारी वाजपेयींचा केला, त्यांनी अडवानींचा केला, त्यांनी प्रमोद महाजनांचा सन्मान केला. या सगळ्यांना त्यांनी

प्रश्नावरून सत्ताधारी पक्षातल्या प्रमुख लोकांना स्वत:च्या पक्षाच्या भवितव्याची काय स्थिती होईल याची यत्किंचीतही तमा न बाळगता पाठिंबा द्यायचे. म्हणजे आणीबाणीच्या काळातदेखील इंदिरा गांधींच्या विरोधात देश होता, त्या वेळेला शिस्त आणण्याचा फैसला करणारे नेतृत्व म्हणून बाळासाहेब इंदिरा गांधींसोबत उभे राहिले. नुसतेच उभे राहिले असं नाही तर आम्हाला सगळ्यांना धक्काच बसावा अशी भूमिका त्यांनी घेतली, की महाराष्ट्राच्या निवडणुकीत मी उमेदवारसुद्धा उभा करणार नाही. राजकीय पक्ष चालवणाऱ्यांनी मी उमेदवार उभा करणार नाही असं म्हणून त्या संघटनेचं नेतृत्व टिकवणं ही काही साधी गोष्ट नाही, पण ते बाळासाहेब ठाकरे करू जाणोत आणि त्यांनी ते केलं. याचं कारण काँग्रेससंबंधी त्यांच्या मनात तसा विद्वेष नव्हता.



काही धोरणासंबंधी स्पष्ट मतं होती. त्यामुळे तो एक वेगळा पैलू त्यावेळी पाहायला मिळाला आणि आज कमीजास्त प्रमाणात त्याच मार्गाने उद्धव ठाकरे चाललेत असं म्हणायला हरकत नाही.

**संजय राऊत : तुमचंसुद्धा कधी शिवसेनेशी वैचारिक नातं होतं असं म्हणता येणार नाही...पण आज आपण महाराष्ट्राच्या या जडणघडणीमध्ये एकत्र आहात...**

**शरद पवार :** वैचारिक मतभेद होते. काही गोष्टीत असतीलही, पण सुसंवाद नव्हता असं नाही. बाळासाहेबांशी सुसंवाद होता. शिवसेनेच्या आत्ताच्या नेतृत्वापेक्षाही अधिक सुसंवाद होता. भेटीगाठी, चर्चा, एकमेकांकडे जाणं या सगळ्या गोष्टी होत्या आणि अनेक वेळेला मी जाहीरपणेसुद्धा बोललोय. बाळासाहेबांनी एखादी व्यक्ती, कुटुंबाच्या संबंधी, पक्षाच्या संबंधी वैयक्तिक सुसंवाद ठेवला किंवा वैयक्तिक ऋणानुबंध ठेवला तर त्यांनी कधी कशाची फिकीर बाळगली नाही. ते ओपनली मदत करत होते. म्हणून मी माझ्याच घरातलं उदाहरण जाहीरपणानं सांगितलं, की सुप्रियाच्या वेळेस तिला फक्त बाळासाहेबांनी बिनविरोध निवडून दिले. हे फक्त बाळासाहेबच करू शकतात.

**संजय राऊत : तुम्ही राज्यात महाविकास आघाडीचा जो प्रयोग केलात, तुम्ही त्याचं नेतृत्व केलंत, त्याला सहा महिने होऊन गेले. हा प्रयोग यशस्वी होतोय असं आपल्याला वाटतं का?**

**शरद पवार :** नक्की होतोय. हा प्रयोग आणखीन यशस्वी होऊन या प्रयोगाची फळं महाराष्ट्रातल्या जनतेला, महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागाला मिळताहेत अशी स्थिती आपल्याला नक्कीच बघायला मिळाली असती. पण हे कोरोनाचं संकट आलं हे दुर्दैव आहे महाराष्ट्राचं. गेले काही महिने राज्य प्रशासन,



राज्यकर्ते आणि राज्याची संपूर्ण यंत्रणा फक्त एकाच कामात गुंतलेली आहे कोरोनाविरूद्ध लढण्याच्या. त्यामुळे बाकीचे सगळे प्रश्न बाजूला राहिले. अशीच दुसरी गोष्ट मी तुम्हाला सांगतो. हा आत्ताचा सेटअप नसता तर या कोरोनाच्या संकटाला सुद्धा इतक्या प्रभावीपणे तोंड देता आलं नसतं. तुम्ही लक्षात घ्या. कोरोनासारखं एवढं मोठं संकट तीन विचारांचे तीन पक्ष, पण सगळे जण एका विचारानं मुख्यमंत्री ठाकरे यांच्या पाठीशी आहेत. त्यांच्या धोरणाच्या पाठीशी आहेत आणि या परिस्थितीला तोंड देताहेत. लोकांच्या पाठीशी मजबुतीने उभे राहताहेत. हे घडू शकलं याचा अर्थ माझी खात्री आहे, हे एकदिलानं काम सुरू आहे म्हणून घडू शकलं. या तिन्ही पक्षांत यत्किंचितही नाराजी नाही.

**संजय राऊत : आणि श्रेय लाटण्याची धडपडही नाही.**

पुलोदचं सरकार आलं त्यावेळी देशाचं नेतृत्व मोरारजीभाई देसाई यांच्याकडे होते. ते पंतप्रधान म्हणून महाराष्ट्रातल्या पुलोदच्या सरकारला पूर्ण ताकदीने मदत करत होते. आज फरक थोडासा असा आहे की, या ठिकाणी आयडियालॉजी वेगळी असेल, तरीही एका विचाराने काम करणारे लोक एकत्र आले आहेत, दिशा कोणती आहे याच्यात स्पष्टता आहे आणि त्या दिशेने जाण्याचा प्रवास नीट राहील आणि तो लोकांच्या हिताचा असेल याची काळजी घेण्याची भूमिका घेतली आहे. पण पुलोदच्या वेळेला जसा केंद्राचा पाठिंबा मजबूत होता तसा या वेळेला याठिकाणी आहे असं मला दिसत नाही.

**संजय राऊत : या सरकारचे तुम्ही हेडमास्तर आहात की रिमोट कंट्रोल?**



**शरद पवार :** अजिबात नाही.

**संजय राऊत : पुलोद हा एक प्रयोग तुम्ही या देशात सगळ्यात पहिला केलात. अनेक पक्ष एकत्र आणून एक राज्य निर्माण केलं. पुलोदचं सरकार आणि आताचं महाविकास आघाडीचं सरकार यांच्यात तुम्ही काय फरक कराल?**

**शरद पवार :** फरक असा आहे की, पुलोद सरकारचं नेतृत्व माझ्याकडं होतं. त्या सरकारात सगळे होते. आजचे जे भाजप आहे, ते त्या वेळी जनसंघाचे म्हणून होते. तेही त्याच्यात होते आणि मंत्रिमंडळ एका विचारानं काम करणारे होते. त्यात कुठल्याही प्रकारची अडचण नव्हती. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, केंद्र सरकारची त्याला मोठ्या प्रमाणावर साथ होती.

**शरद पवार :** दोन्ही नाही. हेडमास्तर असला तर तो शाळेत असायला हवा. लोकशाहीत सरकार किंवा प्रशासन हे रिमोटने कधी चालत नाही. रिमोट चालतं कुठे? जिथे लोकशाही नाही तिथं. आपण रशियाचं उदाहरण पाहिलं. पुतीन २०३६पर्यंत अध्यक्ष राहणार. ही एकहाती सत्ताच आहे. लोकशाही वगैरे सगळे बाजूलाच केलेलं आहे. त्यामुळे आपण म्हणू त्या पद्धतीने सरकार चालवले पाहिजे हा अट्टाहास आहे. पण इथे लोकशाही सरकार आहे आणि लोकशाहीचे सरकार रिमोट कंट्रोलने कधी चालू शकत नाही. मलाच ते मान्य नाही. सरकार मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळच चालवत आहे.

## मुलाखत : भाग २

**संजय राऊत : सहा महिने हा परीक्षेचा काळ असतो. जसं पूर्वी वार्षिक परीक्षा, सहामाही परीक्षा असायच्या. मग ते प्रगती पुस्तक येतं पालकांकडे. तसं या सरकारचं सहा महिन्याचं प्रगती पुस्तक आपल्याकडे आलंय का?**

**शरद पवार :** बरोबर आहे. पण आता ही सहा महिन्यांची परीक्षा झालीय. परीक्षा संपूर्ण झाली आहे असं मला वाटत नाही. परीक्षेतला प्रॅक्टिकलचा भाग अजूनही बाकी आहे.

**संजय राऊत : तोच तर महत्त्वाचा आहे.**

**शरद पवार :** आता कुठे लेखी परीक्षा झाली आहे. पण त्या परफॉर्मन्सवरून तरी प्रॅक्टिकलमध्येसुद्धा हे सरकार यशस्वी होईल असा आता ट्रेंड दिसतोय. दुसरं महत्त्वाचं म्हणजे, अवघ्या सहा महिन्यांच्या कालखंडासंबंधी लगेचच निष्कर्ष काढणं योग्य नाही. शिवाय विद्यार्थी कष्ट घेताना दिसतोय. त्यामुळे निकालाची चिंता बाळगावी अशी स्थिती दिसत नाही. राज्याचा विचार करून तुम्ही विचारत असाल तर या सहा महिन्यांत परीक्षेचा आमचा विद्यार्थी संपूर्ण पास झाला आहे. तो पुढची परीक्षा, पुढचे पेपरही सहजपणाने सोडवेल अशी खात्री आहे.

**संजय राऊत : आपण हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविषयी सांगताय?**

**शरद पवार :** अर्थात, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविषयीच मी बोलतोय. कारण शेवटी राज्यप्रमुख महत्त्वाचा असतो. त्याच्या नेतृत्वाखाली टीम काम करते. त्यामुळे त्याचे श्रेयसुद्धा त्यांनाच मिळणार.



**संजय राऊत : आपण मघाशी म्हणालात की, कोरोना संकट नसतं तर राज्य या सहा महिन्यांत आणखी पुढे नेले असतं. तुम्ही याआधी हे राज्य चालवलेलं आहे. इतक्या वर्षाचा अनुभव आहे. आज राज्यासमोर सगळ्यात मोठं संकट कोणतं आहे?**

**शरद पवार :** अर्थव्यवस्थेचं संकट आहे. ती रूळावर आणणं हे आव्हान आहे. हे मला फार मोठं चॅलेंज वाटतं.

**संजय राऊत : कोरोनाचं संकट आणि अर्थव्यवस्थेची पडझड याचा परिणाम आपल्याला काय दिसतोय?**

**शरद पवार :** शेतीच्या अर्थव्यवस्थेचा विचार करा. खासकरून शेती आणि त्याचं उत्पादन. शेतीशी संबंधित बाकीचे व्यवहार चालू आहेत. चालू नाहीत असं नाही. पण त्याला मार्केट नाही. मार्केट नसल्यामुळे सुरूवातीचे काही दिवस शेतकऱ्यांनी पिकवलेल्या पिकांचं पुढं जाऊन करायचं काय? हा प्रश्न शेतकऱ्यांपुढं आला. नंतर त्या मालाच्या किंमतीचे प्रश्न आले. त्यामुळे संपूर्ण शेती, अर्थव्यवस्था संकटात आली. दुधासारखे शेतीचे जे जोडधंदे आहेत, त्याचा सप्लाय बंद झाल्यासारखी स्थिती होती. साधने नव्हती. या सगळ्या गोष्टींचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत होता.









**संजय राऊत : कारखानदारीवरही संकटाचे सावट आहे...**

**शरद पवार :** तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्या. महाराष्ट्राचं वैशिष्ट्य मुळी आहे ते कारखानदारी आणि औद्योगिकीकरण. पण कोरोनामुळे महिनोन्‌महिने कारखाने बंद, कामगारांना काम करायला संधी नाही. कारखानदारी पूर्ण संकटात गेली. कोरोनाच्या या संकटामुळे अर्थव्यवस्था अतिशय अडचणीत आली आणि तिथे काम करणाऱ्या माणसाचा रोजगार संकटात आला. बजाज ऑटोसारख्या काही कारखानदारांनी कामगारांचं वेतन दिलं, पण तेही आता विचार करू लागलेत की, आपण किती दिवस वेतन देऊ शकणार? ज्या उद्योगांची वेतन देण्याची कुवतच नव्हती त्या ठिकाणच्या कामगारांचा, कष्टकऱ्यांचा प्रपंच चालवायचा कसा, त्यांचं घर चालवायचं कसं हे यक्षप्रश्न घराघरांतून निर्माण झालेले आपण पाहिले आहेत आणि तिसरा मुद्दा म्हणजे व्यापार. व्यापारासाठी महाराष्ट्र किंवा मुंबई हे महत्त्वाचं सेंटर आहे. मुंबई शहर एकेकाळचं कापड गिरण्यांचं किंवा वेगवेगळ्या इंडस्ट्रिजचं शहर होतं. पण काळाच्या ओघात आता ते चित्र राहिलेलं नाही. आता त्या गिरण्या आणि व्यवहार इतर शहरांत आणि राज्यांत गेले. मुंबईने त्यातूनही झेप घेतली. आता मुंबई शहर देशाचं आर्थिक केंद्र झालेलं आहे. ही नगरी आता फायनान्स आणि कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात फार पुढे गेली आहे. पण कोरोनाच्या काळात हे सगळे व्यवहाराच बंद झाले होते. तेही आता हळूहळू सुरू होताहेत.

**संजय राऊत : पण फायनान्शियल सेंटर तर गुजरातला हलवलं आहे...**


**शरद पवार :** ते कोरोनाचं दुसरं संकट आहे. त्यावर नंतर बोलू कधीतरी. पण आता तुम्ही बीकेसीचा भाग पहा. त्या परिसरात ओळीने तुम्हाला मोठमोठ्या बँकांच्या इमारती दिसतील. टोलेजंग. आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न करून या बँका इथे आणल्या. आता त्या सगळ्या बँकांचे व्यवहार गेले दोन महिने जवळपास ठप्प झाले होते. त्यामुळे वाणिज्य, शेती आणि कारखानदारीचे विषय असतील, हे सगळे पूर्णपणाने थंडावले. आणि या सगळ्या गोष्टींचे दुष्परिणाम प्रत्येक घरात झाले, हे मान्य करावेच लागेल.

**संजय राऊत : पण अशा वेळेला हा सगळा पीडित वर्ग आशेने सरकारकडे बघतो. मायबाप सरकार असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा सरकार आमची चूल पेटवेल, हे सरकार आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करेल ही जनतेची सरकारकडून अपेक्षा असते. अशा वेळेला सरकार म्हणून काय करणार? एका मंत्र्यांचे निवेदन मी ऐकलं की, कर्मचाऱ्यांचे पगार द्यायलाही पैसे नाहीत असं ते म्हणताहेत. अशा वेळेला राज्य कसं चालणार?**

**शरद पवार :** बरोबर आहे, पण नेमकी स्थिती काय आहे याचाही नीट विचार व्हायला हवा. तुम्ही पहा, या सगळ्या परिस्थितीत नागरिकांनी अत्यंत समंजसपणाची भूमिका घेतली. सरकारकडून त्यांच्या अपेक्षा नक्कीच आहेत. पण त्यांना हेही ठाऊक आहे की, सरकारचीच आवक थांबलेली आहे. सरकारचीच आवक थांबल्याचे सामान्य जनांच्या नजरेला येते तेव्हा लोकसुद्धा आपण किती आग्रह करायचा, किती हट्ट करायचा, किती संघर्ष करायचा या सगळ्या गोष्टींत अत्यंत सामंजस्य लोकांनी दाखवलंय.

**संजय राऊत : उत्पन्न इतकं घटलंय, की पगार होणार नाहीत...**

**शरद पवार :** होय, राज्य सरकारचं उत्पन्नच घटलं हे खरं आहे. यासंदर्भात मी अधिकाऱ्यांकडून माहिती घेत होतो की, तुम्ही महाराष्ट्राच्या विधानसभेत राज्याचं बजेट मांडलं आणि त्यानंतर कोरोना आला. बजेट मंजूर झाल्यावर कोरोना आला. आता त्या बजेटमध्ये राज्याच्या उत्पन्नाचा काय विचार केला होता? तो आकडा काहीतरी ३ लाख ९० हजार कोटींच्या आसपास होता. माझा आकडा कदाचित चुकत असेल, पण असा



काहीतरी आकडा होता. ठीक आहे. आता त्यानंतर हे तीन महिने असेच गेले. सरकारची आवक थांबली. या काळात किती उत्पन्न येईल याचं कॅलक्युलेशन जर केलं तर जो आपण मूळ आकडा गृहित धरला होता त्याच्यात ५० टक्क्यांच्यापेक्षाही जास्त फटका या तीन महिन्यांतच बसला असं दिसतं. याचा अर्थ सरकारचीसुद्धा आर्थिक ताकद घटायला लागलेली आहे. यालाच आपण आर्थिक संकट म्हणू शकतो. त्यामुळे सरकारलासुद्धा आता मर्यादा आहेत. एका मंत्र्यांच्या स्टेटमेंटविषयी तुम्ही बोललात. मीही ते ऐकलंय. अर्थमंत्र्यांकडूनही हेच मी ऐकलं. पण तरीसुद्धा सरकारचा सतत प्रयत्न आहे की, काहीही करून कर्मचाऱ्यांचे वेतन द्यायचेच आणि आजच्या महिन्यापर्यंत सर्व कर्मचाऱ्यांना वेतन दिलं आहे. पण कदाचित पुढे कर्ज काढावे लागेल अशी परिस्थिती दिसते. पण त्यावरही मार्ग काढता येऊ शकेल.

**संजय राऊत : या मोठ्या आपत्तीत केंद्र सरकारने राज्यांना मदत केली पाहिजे असं आपल्याला वाटत नाही का?**

**शरद पवार :** हंड्रेड पर्सेंट. अशा वेळेला केंद्रानेच राज्यांना मदत करायला पाहिजे. हा राज्याचा गाडा पुन्हा उभा करण्यासाठी केंद्रानेच मदत द्यायला हवी. ती केंद्राचीच जबाबदारी आहे. केंद्राच्या उत्पन्नाचे तरी मार्ग काय असतात? त्यांच्या सगळ्या उत्पन्नाचे मार्ग राज्यांतूनच आहेत. राज्यांची अर्थव्यवस्था, राज्यांचे व्यवहार, राज्यांचे उत्पादन हे गतिमान झालं तर त्याच्यातून राज्यांचं उत्पन्न निर्माण होईल आणि त्याचाच भाग केंद्राला मिळणार आहे. त्यामुळे केंद्राला आपलं दुकान चालवण्यासाठीसुद्धा राज्यांची दुकाने चालवली पाहिजेत.

**संजय राऊत : केंद्र तरी काय करू शकेल?**

**शरद पवार :** केंद्राकडे रिझर्व्ह बँक आहे. केंद्राकडे नोटा छापायचा अधिकार आहे. केंद्राकडे जागतिक बँक किंवा एशियन बँकेकडून पैसे उभे करण्याची ताकद आहे. तो त्यांचा अधिकार आहे. केंद्र बरेच काही करू शकते. ते राज्यांना शक्य नाही. राज्यांना उद्या कर्जरूपाने पैसा उभा करायचा असेल तर त्यांना स्वत:च्या निर्णयाने काही करता येत नाही. केंद्र सरकारने प्रत्येक राज्याने किती कर्ज काढायचं याची सीमा ठरवून दिलेली असते आणि त्यामुळे राज्यांना मर्यादा आहेत. या संकटाच्या काळात आंतरराष्ट्रीय संस्थेकडून कर्ज काढून आपण राज्यं स्थिरस्थावर केली तर आपण एक चौकट तयार करू आणि घेतलेलं कर्जही परत करू शकू.

**संजय राऊत : आपण मोदींचे गुरू आहात असं ते म्हणतात. अशावेळी आपण आपल्या शिष्याला हे सांगायला**

**हवं की, देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी काही निर्णय आपल्याला कठोरपणे घ्यावे लागतील.**

**शरद पवार :** मी त्यांचा गुरू आहे असे म्हणून उगीच त्यांना अडचणीत आणू नका आणि मलाही अडचणीत आणू नका. गुरू वगैरे सोडा. राजकारणात कुणी कुणाचा गुरू वगैरे असत नाही. आपल्याला सोयीची भूमिका आम्ही लोक एकमेकांच्या संदर्भात मांडत असतो. शिवाय अलीकडे त्यांची आणि माझी भेटही झालेली नाही. बाकी राहिला मुद्दा अर्थव्यवस्थेसंबंधीचा, तर मला स्वत:लाही असं वाटतं की, या सगळ्या परिस्थितीमध्ये अर्थव्यवस्था रिव्हाईव्ह करण्यासाठी मोदींनी काही जाणकारांची मदत घेण्याची आवश्यकता आहे. मध्यंतरी एक गृहस्थ इथे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. दुर्दैवानं काय झालं मला माहित नाही, ते सोडून गेले. आता अशी जी माणसं आहेत, ज्यांना आपण जाणकार म्हणू शकू त्यांच्याशी बोललं पाहिजे किंवा डॉक्टर मनमोहन सिंगांसारखे लोक आहेत.

**संजय राऊत : या देशाला एका मनमोहन सिंगांची गरज आहे का?**

**शरद पवार :** हंड्रेड पर्सेंट गरज आहे. कारण मनमोहन सिंग फायनान्स मिनिस्टर झाले तेव्हा त्या मंत्रिमंडळात मी होतो. मला माहितीय की, त्या वेळेला फायनान्सियल क्रायसेसमधून



**पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग**

कसे आम्ही जात होतो. पण मनमोहन सिंगांनी एक नवीन दिशा दिली. या देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढलं. त्या मनमोहन सिंगांना मी श्रेय देतो तसं नरसिंह रावांनाही श्रेय देतो. या दोघांनी नेहमीच्या चौकटीचा रस्ता बदलून वेगळ्या वळणावर गाडी नेली आणि सबंध अर्थव्यवस्था सावरली. आज त्यांची आवश्यकता होती. तशा प्रकारच्या तज्ज्ञ लोकांची मदत घेऊन मोदी साहेबांनी पावलं टाकायला हवीत. माझी खात्री आहे, अशा कोणत्याही प्रयत्नांना देश सहकार्य करेल.

**संजय राऊत : आपण राष्ट्रीय स्तरावर खूप महत्त्वाचे नेते आहात आणि देशभरातल्या अनेक राष्ट्रीय प्रश्नांवर आपण मते व्यक्त करता. आपला सल्ला घेतला जातो. आपण जे बोलता त्याला एक महत्त्व प्राप्त होतं. मग पंतप्रधान असतील, गृहमंत्री असतील, अर्थमंत्री असतील किंवा विरोधी पक्षातले इतर नेते असतील, हे सतत आपल्या संपर्कात असतात. पण हे जे संकट आपल्याला दिसतंय या देशातलं आणि महाराष्ट्रातलं, ते दूर करण्यात कुठे समन्वयाची तुम्हाला कमतरता दिसतेय का?**

**शरद पवार :** मला असं दिसतंय की, पंतप्रधानांनी इतर पक्षांच्या काही जाणकार लोकांशी बोलण्याची गरज आहे. संकटाची व्याप्ती पाहता कुठल्या तरी एकाच पक्षाने हे सर्व आपणच सोडवून टाकू ही भूमिका घेऊन चालणार नाही. या वेळेला ज्यांची ज्यांची मदत होणं शक्य आहे, उपयुक्त आहे, त्या सगळ्यांना बरोबर घेण्यासंबंधी प्रयत्न केला पाहिजे. आज मोदी साहेबांचा जो सेटअप आहे, त्या सेटअपमध्ये अनेक सहकारी असे आहेत, की या अशा प्रकारच्या कामाचा अनुभव त्यांना नाही. कोरोनाचं म्हणाल तर, आम्हालाही तसा अनुभव कुणालाही नाही. कारण असं संकट आपण कधी पाहिलेलंच नव्हतं. पण या संकटावर मात करण्यासाठी ज्या प्रकारची पावलं टाकायला सगळ्यांची साथ घेतली पाहिजे, त्याची आम्हाला कमतरता दिसते. सर्वांना सोबत घेऊनच या संकटावर मात करता येऊ शकेल.

**संजय राऊत : तुम्ही देशाच्या अर्थमंत्र्यांशी या विषयावर कधी चर्चा केली?**

**शरद पवार :** नाही. माझी कधी त्यांच्याशी भेटही झालेली नाही. एकदाही भेट झाली नाही. भेट सोडाच, कधी बोलणंही झालेलं नाही. पण मला असं वाटतं, की इतका मोठा देश, मोठी लोकसंख्या म्हटल्यावर रोज समोर असे प्रश्न उभे राहतात. देशाची अर्थव्यवस्थाच जेव्हा संकटात सापडते, त्या वेळेला एक प्रकारचा डायलॉग इतरांबसोबत पाहिजे. तो डायलॉग मला सध्या दिसत नाही.

**संजय राऊत : हा डायलॉग संपलाय असं वाटतं आपल्याला?**

**शरद पवार :** काही लोकांच्या कामाची हीच पद्धत असते. ती यांचीही असू शकेल. पूर्वी अर्थमंत्री प्रणव मुखर्जी होते, चिदंबरम होते किंवा मनमोहन सिंग होते. त्या काळात अनेक वेळेला मी पाहायचो, की अन्य पक्षांच्या लोकांशी किंवा अन्य जाणकारांशी ते तासन्‌तास चर्चा करीत, तज्ज्ञांची मते जाणून घेत असत. आता तशी तज्ज्ञांची मते जाणून घेतली जातात की नाही मला माहित नाही. कारण आमच्यासारख्या वेगळ्या विचारांच्या लोकांना तिथे प्रवेश आहे असं दिसत नाही. त्यामुळे तसा जाणकारांचा सल्ला ते घेतात की नाही माहित नाही. घेत असले

तर तसे परिणाम कुठे दिसायला हवेत तसे ते दिसतही नाहीत.

**संजय राऊत : कोरोना असेल, लॉकडाऊन असेल, अर्थव्यवस्था असेल, हे संकट सुरु असताना देशावर अजून एक संकट आले आहे ते म्हणजे चीनचा हल्ला. आपल्या सीमांवर अशांतता आहे. चीनचे सैनिक आतमध्ये घुसलेत अशा प्रकारचे आरोप होताहेत. तुम्ही या चीनच्या संकटाकडे या क्षणी कसं काय पाहता?**

**शरद पवार :** माझा या सगळ्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. आपण या देशात अनेक वर्षे आपला मित्र कोण, शत्रू कोण याचा ज्यावेळी विचार करतो, त्यावेळी भारतीय मनात शत्रू म्हणून पहिल्यांदा पाकिस्तान येतं. पण माझं अनेक वर्षांपासून मत आहे, पाकिस्तानपासून खरी चिंता आपल्याला नाही. पाकिस्तान आपल्या विचारांचा नाही ही गोष्ट खरी. पाकिस्तान आपल्या हिताच्या विरोधात पावलं टाकतो हेही खरं. पण लाँगटर्मच्या दृष्टिने आपल्या सगळ्यांच्या हिताबाबत खरं संकट निर्माण करण्यची ताकद, दृष्टी आणि कार्यक्रम फक्त चीनचा आहे. चीन हे आपल्या देशाच्या दृष्टिनं मोठं संकट आहे. चीनपासून आपल्याला होणारा उपद्रव हा साधासुधा नाही.

**संजय राऊत : असं आपण कसं म्हणू शकता?**

**शरद पवार :** पाकिस्तानची लष्करी शक्ती आणि चीनची लष्करी शक्ती यांच्यात जमीन-आस्मानाचा फरक आहे. आज आपली लष्करी शक्ती, आपलं हवाई दल, आपलं नाविक दल, आपलं सैन्यदल, आपली शस्त्रास्त्रं-स्फोटकं यांची चीनशी तुलना केली तर कदाचित दहाला एक असं प्रमाण पडू शकेल. आपल्यापेक्षा दहापटीने अधिक त्यांच्याकडे या गोष्टी आहेत. हे त्यांनी वर्षानुवर्षे जाणीवपूर्वक प्रयत्न करून निर्माण केलंय. त्यांचे भारत या देशावर कधी लक्ष नव्हते. आधी ती त्यांची पॉलिसी होती. चित्रं आता अगदी अलीकडं बदललंय.

**संजय राऊत : तुम्ही संरक्षणमंत्री होतात, तुम्ही अनेकदा चीनच्या दौऱ्यावर गेलेले आहात. तिथल्या नेत्यांशी चर्चा केलेली आहे, म्हणून विचारतोय की आपला दृष्टिकोन तेव्हा काय होता?**

**शरद पवार :** तेच सांगतोय. माझं अगदी ठाम मत होतं की, आपल्याला पाकिस्तानची फारशी चिंता करायची गरज नाही.







खरी चिंता चीनचीच आहे. त्याचं एक साधं उदाहरण सांगतो की, मी संरक्षणमंत्री असताना चीनला गेलो होतो. त्यावेळी डिफेन्स सेक्रेटरी व्होरा हेही सोबत होते. व्होरा तुम्हाला आठवत असतील. नंतर ते काश्मीरमध्ये दहा वर्षे राज्यपाल होते. तर सात दिवस मी आणि तिथल्या डिफेन्स मिनिस्टरनी चर्चा केली. त्यावेळी हिमालयीन बॉर्डरवर आपलं सैन्य होतं. त्यांचेही सैन्य होतं. हिमालयीन बॉर्डरवर सैन्य ठेवणं हे अत्यंत खर्चिक होते आणि हवामानाच्या दृष्टिने आपल्या जवानांसाठी त्रासदायक होतं. बर्फ वगैरे नैसर्गिक बाबींचा विचार करता तसं ते कठीणच होतं. या पार्श्वभूमीवर आम्ही सात दिवसांच्या चर्चेत आपापलं सैन्य मागे घ्यायचं




यावर एकमत केलं. त्या कराराचा ड्राफ्ट तयार केला. मी तो नरसिंह रावांकडे पाठवला. त्यावेळी ते पंतप्रधान होते. त्यांनी या कराराच्या मसुद्याला मान्यता दिली. चीनच्या पंतप्रधानांनाही हा ड्राफ्ट दाखवायचा होता. चीनच्या डिफेन्स मिनिस्टरने मला सांगितलं की, आमच्या प्राइम मिनिस्टरना हा ड्राफ्ट दाखवायला तुम्ही माझ्यासोबत चला. मी म्हटलं, ठीक आहे. कुठे जायचं? कसं जायचं? तर ते म्हणाले, पंतप्रधान विश्रांतीला एके ठिकाणी गेले आहेत. कुठे गेले हे सांगितलं नाही. उद्या सकाळी आपण जाऊया, एवढंच म्हणाले. सात वाजता तयार रहा असंही त्यांनी सांगितलं. मी सात वाजता तयार राहिलो. ते आल्यावर आम्ही निघालो. विमानतळावर पोहोचलो. डिफेन्सच्या विमानात बसलो. कुठे जातोय हे त्यांनी तेव्हाही सांगितलं नाही. तीन तासांनी प्लेन एका ठिकाणी उतरले. तो सागरी किनाऱ्याचा प्रदेश होता. तिथे अजिबात लोकसंख्या नव्हती. विशेष म्हणजे, जिथे विमान





उतरले तिथे फक्त चांगले बंगले होते. शेवटी मी विचारलेच, कुठे आलोय आपण? त्यांनी सांगितले, कम्युनिस्ट पार्टीच्या पॉलिट ब्युरोचे जे मेंबर आहेत, त्यांच्या विश्रांतीसाठी हा सगळा परिसर आहे. इथे बाकी लोकसंख्या नाही. केवळ सागरी किनारा आहे. प्रधानमंत्री इथेच आहेत. आम्ही गेलो. त्यांना भेटलो. आमचा ड्राफ्ट त्यांना दाखवला. साधारणतः ११ वाजेपर्यंत हे सगळं उरकलं. नंतर त्यांनी आम्हाला जेवायला बोलावलं होतं. १ वाजता. आता ११-११.३०पर्यंत ही सगळी चर्चा होती. ती संपली होती. आम्ही मोकळे झालो होतो. जेवण होईपर्यंत तिथे कुठे जायलाही जागा नाही. शहर नाही. गाव नाही. आसपास काही नाही. तास-दीड तास कसा घालवायचा हा विचार मी करत होतो. तेवढ्यात त्यांच्या प्राईम मिनिस्टरनी सुचवलं, लेट्स वॉक! समुद्र किनाऱ्यावर आपण चालूया. छान सागरी किनारा आहे. मी मनात म्हटले, ही गोल्डन ऑपॉर्च्युनिटी आहे. यानिमित्त त्यांच्याशी बोलता येईल. मग आम्ही त्या किनाऱ्यावर चालत होतो. तास-सव्वा तास मी अनेक प्रश्न त्यांना विचारत होतो. मला ते एकच गोष्ट सांगायचे, की माझं सगळं टार्गेट अमेरिका आणि जपान आहे. ही तीस वर्षापूर्वीची गोष्ट आहे. चीनला जगाची आर्थिक महासत्ता बनवायची आहे, असे ते वारंवार सांगत होते. अमेरिकेच्या तोडीस तोड चीन उभा राहू शकतो हे चित्र जगाला दाखवायचंय. अमेरिकेच्या नंतर किंवा त्यांच्या बरोबरीने किंवा त्यांच्या अधिक पुढे गेलेला देश चीन आहे हे मला दाखवायचे आहे. हे त्यांचं स्वप्न होतं. ते हे स्वप्न अभिमानानं सांगत होते. ही सगळी चर्चा झाल्यावर मी सहज त्यांना विचारलं, तुमच्या शेजारी देशांबद्दल काय धोरण राहणार? तर ते हसले. म्हणाले,



आमचं टार्गेट अमेरिका आणि जपान आहे. शेजारी राष्ट्रांचा तूर्त आम्ही विचार करत नाही. बघू, पाच-पंचवीस वर्षांनी विचार करू. हे ऐकताच माझ्या डोक्यात आलं, उद्या भारताच्या समोर संकट आलं तर ते आज नाही, पंचवीस-तीस वर्षांनी येईल.

**संजय राऊत : ते संकट आता आलंय...**


**शरद पवार :** हो, खरं आहे. शिवाय आता काय झालंय, चीन आर्थिकदृष्ट्या मजबूत झालाय. त्यांचं टार्गेट आता भारत आहे. म्हणजे मोदी साहेबांनी तिथे जाऊन त्यांच्याशी दोस्ती केली, त्यांना इथे आणून झोपाळ्यावर बसवलं आणि भारतीय कपडे शिवले. हे सगळं करून आपण खूप मोठं काहीतरी घडवून आणलंय असं चित्र निर्माण केले. एकमेकांच्या हातात हात घालून, गळाभेट करून दोन्ही देशांची दोस्ती होतेय असं चित्र निर्माण केलं. पण गळाभेट ठीक आहे. शेकहॅण्डही ठीक आहे. पण अशाने दोन देशांमधले सगळे प्रश्न सुटत नसतात हे आता आपल्या लक्षात आलंय.

**संजय राऊत : चीन आणि पाकिस्तानचा जेव्हा जेव्हा प्रश्न येतो, तेव्हा सतत या सरकारकडून इंदिरा गांधी आणि पंडित नेहरू हेच त्या प्रश्नाला दोषी आहेत...**

**शरद पवार :** यावर बोलूच. पण त्याआधी मी सांगतो, आज चीनने काय केलंय. भारताच्या आजूबाजूचं चित्र पहा. चीनने भारताच्या भोवती असलेल्या प्रत्येक देशाला आपल्यापासून दूर केलं. पाकिस्तान त्यांच्याबरोबर आधीच गेलाय. नेपाळ, जो नेहमी आपल्यासोबत होता, तो आता दुरावलाय. तुम्हाला आठवत असेल, मोदी साहेब पंतप्रधान झाल्यावर पहिल्यांदा नेपाळला गेले होते. पशुपतीनाथच्या मंदिरात जाऊन पूजा केली होती. पहिलं हिंदू राष्ट्र म्हणून त्याचं कौतुकही केलं, आमचे मित्र म्हणून. पण आता नेपाळही आपल्यासोबत नाही, तो चीनसोबत आहे. त्याच्या शेजारचा बांगलादेश बघा. बांगलादेशच्या निर्मितीसाठी आपण किती कष्ट केले होते? चीनने त्याच बांगलादेशाशी परवा करार केला. त्यामुळे बांगलादेशही त्यांच्यासोबत. म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश आणि खाली श्रीलंका हे चहूबाजूंनी आपले शेजारी आहेत, त्या सगळ्यांना चीनने आपल्या बाजूने केलेले आहे. त्यात भारतविरोधी सूर आपल्याला ऐकायला मिळतोय. हे बिघडलेले संबंध या अलिकडच्या काळातलं योगदान आहे.

**संजय राऊत : पण अजूनही नेहरूंनंतर इंदिरा गांधी यांनाच दोषी ठरवले जातेय.**

**शरद पवार :** हो, त्यावरच येतोय मी. आता हे नेहरू आणि इंदिरा गांधींना दोष देण्यासंबंधीची भूमिका घेतात. जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडात प्रारंभीच्या काळात चीन आणि आपल्यात संघर्षाचं चित्रच नव्हते. चीनचे आणि आपले खरोखर सहकार्याचे, सौहार्दाचे संबंध होते आणि जवाहरलाल नेहरूंचा दृष्टिकोन हा होता, की आज ना उद्या चीन महासत्ता होणार आहे. त्यामुळे त्यांच्याशी सुसंवाद ठेवणं गरजेचं आहे. आपण संघर्ष करणं दोघांच्याही हिताचं नाही. त्यामुळे त्यांनी संघर्षाची भूमिका घेतली नाही. याउलट नेहरूंनी या शेजाऱ्यांना बरोबर घेऊन आपलं पंचशीलचे तत्त्वज्ञान जगासमोर मांडले. या सगळ्यांना घेऊन. त्यामुळे आपल्या प्रदेशात एक प्रकारची



शांतता आपल्याला बघायला मिळाली. पुढे दुर्दैवानं त्या काळात चीनच्या नेतृत्वाने काही वेगळी भूमिका घेतली आणि त्याच्यातून आपला आणि त्यांचा संघर्ष झाला. हा भाग आहेच. तो दुर्लक्षित करून चालणार नाही.

**संजय राऊत : आपलं परराष्ट्र धोरण चुकतंय असं आपल्याला वाटतं का?**

**शरद पवार :** जवाहरलाल नेहरूंच्या काळात, इंदिरा गांधींच्या काळात किंवा अटल बिहारींच्या काळात परराष्ट्र धोरणात काही बदल नव्हता आणि आजही कमी जास्त प्रमाणात तेच चालू आहे. फक्त मध्ये मोदी साहेब आल्यानंतर त्यांनी काही वेगळा प्रयत्न करण्याचा दृष्टिकोन घेतला असं दाखवलं होतं, पण ते खरं टिकलं नाही. आज परराष्ट्र खातं बघितलं आणि त्या खात्याची संपूर्ण यंत्रणा बघितली , आपले राजदूत बघितले की, जी जुनी आपली नीती होती, त्यापेक्षा वेगळी नीती आपण घेतलेली नाही हे दिसून येतं.

**संजय राऊत : चीनच्या प्रश्नाचं राजकारण करू नये असे आपण म्हणालात. म्हणजे नक्की काय?**



**शरद पवार :** मी काय म्हणालो? हा जो परवा संघर्ष झाला, त्यात निश्चितच चीनची भूमिका चुकीची होती. गलवानचे जे खोरे आहे, तो लडाखमधील अत्यंत महत्त्वाचा भाग आणि लडाख आपल्या दृष्टिनं अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. लडाख हा भारतासाठी कधीही चिंता करण्यासारखा भाग नव्हता. तिथे जे लोक आहेत, ते बुद्धांच्या विचारांचे, शांतताप्रिय आणि भारत व संपूर्ण भारतीयांबद्दल आस्था असणारे असे आहेत. आपलाच भाग आहे तो. याआधी तिथे असा वाद कधी रंगला नव्हता. शेजारी चीन आहे. १९९३ साली ज्यावेळी मी चीनला गेलो होतो, त्यावेळेला आम्ही चीनशी करार केला. आम्ही तो ड्राफ्ट बनवला, जे मी मघाशीच सांगितलं. आमच्या तो चर्चेचा मसुदा...त्यानंतर पी. व्ही. नरसिंह राव यांनी स्वत: तिथे जाऊन तो मंजूर करुन घेतला. मसुदा काय होता, तर तो असा होता, की लडाख आणि सगळ्या परिसरामध्ये आपल्यामध्ये संघर्ष नको आणि उद्या एखाद्-दुसऱ्या प्रश्नावरून मतभेद झाले तर त्या ठिकाणी दोन्ही देशांनी बुलेट वापरायची नाही. बंदुकीचा वापर करायचा नाही. तुम्ही बघितलंत, परवा त्या रस्त्यावरुन वाद झाला, तेव्हा तिथे बंदूक वापरली नाही. हा त्या कराराचाच भाग होता.

**संजय राऊत : अवजारं वापरली, त्यात सैनिकांचं नुकसान झालं.**

**शरद पवार :** ती नंतर. सेकंड राऊंडला. पहिल्यांदा नाही आणि त्या अवजारांमध्ये त्यांनी स्टिक वापरल्या. त्याला उलटे खिळे लावले होते किंवा








आणखीन काहीतरी...पण फायरिंग नाही झाले. कारण त्या वेळचा तो करार होता ९३ सालचा. तो करार आपणही पाळला आणि त्यांनीही काही प्रमाणात पाळला. आता आपण तिथे एक रस्ता करायला घेतला आणि तो रस्ता म्हणजे डूरबुक ते दौलत बेग ओल्डी. हा जो दौलत बेग ओल्डी भाग आहे, तो सियाचीन आणि लडाखच्या जवळचा भाग आहे. तिथे जो रस्ता आपण करतो आहोत तो शंभर टक्के आपल्या हद्दीत आहे आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला चीन आहे. हा रस्ता आपण आपल्याच हद्दीत करतोय, त्यामुळे काही चूक नाही. तिथे जी चीनने धक्काबुक्की केली आपल्या लोकांना, ती योग्य नव्हती.

**संजय राऊत : पण त्यावर उपाय काय? हे थांबेल असे वाटत नाही...**

**शरद पवार :** माझं स्वच्छ मत असं आहे, की हा प्रश्न आहे तो आपण लष्करी शक्तीने सोडवू शकत नाही. हा प्रश्न आपल्याला डिप्लोमॅटिक स्ट्रॅटेजीनेच सोडवला पाहिजे आणि त्यामुळं हे जे सांगितलं जातं सारखं की सैन्य आहे, सैन्य आणलंय, सैन्य आपण वापरतोय. ठीक आहे. सैन्य आपल्याला नेता येईल. लष्करप्रमुख नरवणे आणि काही लोकांची स्टेटमेंट मी ऐकली. ठीक आहे, वेळ आली तर ते आपण उत्तर द्यायचं ते देऊच. त्याची काय किंमत द्यायची असेल ती देऊ, पण आज त्या लष्करी शक्तीने हा प्रश्न सोडवण्याची परिस्थिती नाही. त्याचे उलटे परिणामही आपल्याला भोगावे लागतील.

**संजय राऊत : पण चीन आतमध्ये घुसला आहे आणि त्याने आपली जमीन ताब्यात घेतल्याचा आरोप होतोय.**

**शरद पवार :** ती जमीन काही आज ताब्यात घेतलेली नाही. त्यांनी अक्साई चीनमध्ये जवळपास ४५ हजार स्क्वेअर किलोमीटर जमीन ताब्यात घेतलेली आहे आणि त्याच्यानंतर शॅक्सगॅम व्हॅली म्हणून एक भाग आहे. शॅक्सगॅम व्हॅलीमध्ये ५ हजार स्क्वेअर किलोमीटरची जमीन ताब्यात घेतली आहे. पण ही आज नाही घेतली. ही घेतली आहे पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडात. त्यामुळे त्यांनी आक्रमण करून जमीन घेतली आहे हे राहुल गांधी सांगताहेत ते खरं आहे, पण त्याला झाली पन्नास वर्षे. त्याच्यापेक्षाही जास्त झाली. पण आता त्यांनी त्याठिकाणी त्यांची जबरदस्त लष्करी केंद्रे उभी केली आहेत. आता ही त्यांनी ५०-६० वर्षापूर्वी घेतलेली ४५ हजार स्क्वेअर किलोमीटरची जागा एका दिवसात किंवा सरकार बदलल्यावर परत आणू शकतो हे काही व्यवहार्य वाटत नाही. आज त्यादृष्टिने प्रयत्न केले पाहिजेत. पण ते प्रयत्न निगोशिएशनने व्हायला हवेत. जगातील अन्य देशांच्या मार्फत चीनवर दबाव आणून हा प्रश्न सोडवला पाहिजे.

**संजय राऊत : आपल्या २० जवानांची हत्याही चीनने**

**आपल्या हद्दीत घुसून केली आहे. हा चिंतेचा विषय आहे...**

**शरद पवार :** याबद्दल आपल्याला निश्चितच कडक भूमिका घ्यावी लागणार आहे आणि ती भूमिका आपण वेळच्या वेळीच घेण्याची आवश्यकता असते. ती या परिस्थितीत घ्यायला कदाचित विलंब लावला की काय असं वाटतं. मी म्हणतो, की यात राजकारण आणू नका. त्याचं कारण एकच आहे, की हा प्रश्न इतका गंभीर आहे आणि उद्या आपण सांगितले की फोर्स पाठवा, हल्ले करा. करू शकतो. पण त्या हल्ल्याला जे उत्तर दिले जाईल आणि त्याची किंमत जी संपूर्ण देशाला द्यावी लागेल तीसुद्धा दुर्लक्षित करू नये. आणि त्यामुळं हल्ल्याचा वेळप्रसंग आला तर विचार करता येईल. पण हल्ला करण्याच्याऐवजी निगोशिएशनच्या माध्यमातून, डिप्लोमॅटिक चॅनेलने जगातल्या अन्य देशांचे प्रेशर त्यांच्यावर आणून, यूनायटेड नेशनसारख्या संस्थांचा दबाव आणून जर याच्यातून काही मार्ग निघत असेल तर तो प्रयत्न पहिल्यांदा करणं शहाणपणांचं आहे.

## मुलाखत : भाग तीन

**संजय राऊत : प्रियांका गांधी यांना राहत्या घरातून मोदी सरकारने बाहेर काढले. हा माणुसकीचाच पराभव आहे, असं नाही वाटत?**

**शरद पवार :** असं आहे की, सत्ता हातात असली तर ती विनयाने वापरायची असते. सत्तेचा दर्प जर का एकदा तुमच्या डोक्यात गेला की, मग अशा प्रकारच्या गोष्टी होतात. काही झालं तरी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, जवाहरलाल नेहरू यांचे योगदान स्वातंत्र्य चळवळीत मोठेच होते. लोकशाहीच्या मार्गाने देश नेण्याचा रस्ता आपल्याकडे त्यांनी वर्कआऊट केला हे योगदान आहेच. त्यांच्या कन्या इंदिरा गांधी यांनी देशासाठी बलिदान दिले. इंदिराजींचे पुत्र राजीव गांधी यांनीही देशासाठी बलिदान दिले. देशासाठी बलिदान देणारे एका कुटुंबातील दोन लोक आणि त्याच्या आधीच्या पिढीने संपूर्ण आयुष्य देशासाठी दिले. अशा कुटुंबातील मुलगी म्हणजे प्रियांका. राजीव गांधींची हत्या झाल्यानंतर पुन्हा एकदा आपल्या पक्षाचे किंवा सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यासाठी सोनियाजी किंवा ती प्रयत्न करतेय. ठीक आहे. पोलिटिकली वादविवाद असतील. पण याचा अर्थ माझ्या हातात सत्ता आहे, त्या सत्तेचा गैरवापर करून तुम्हाला आम्ही त्रास देऊ शकतो, त्या सत्तेचा वापर तुमच्याविरूद्ध करू शकतो, यात काही शहाणपणा नाही. एका माजी पंतप्रधानाच्या मुलीला दिलेलं घर तुम्ही काढून घेता आणि त्यांना आता कुठेतरी लखनौला जाऊन राहण्याची वेळ आली. मला स्वत:ला यात सुसंस्कृतपणा वाटत नाही.



**संजय राऊत : एक सूडाचं राजकारण अशा प्रकारे केलं जातंय असं तुम्हाला वाटतं का?**

**शरद पवार :** क्षुद्रपणाचं राजकारण आहे हे, होय क्षुद्रपणाचंच.

**संजय राऊत : कारण ममता बॅनर्जींचा आरोप नेहमी असतो आणि असे अनेक नेते असतील, की मोदी सरकार आमच्याशी कायम सूडानं वागतंय. त्यांच्या विचारांची सरकारं ज्या राज्यांत नाहीत त्यांच्याशी नीट वागायचं नाही. त्यांना त्रास द्यायचा. विरोधी पक्षांची सरकारे टिकू द्यायची नाहीत, फोडाफोडी करायची. याचं ताजं उदाहरण म्हणजे मध्य प्रदेश आहे. अशा प्रकारे विरोधकांची सरकारं अस्थिर करण्यासाठी सत्तेचा गैरवापर होतोय का?**

**शरद पवार :** सरळ सरळ होतोय. मी असं बघितलंय की, मनमोहन सिंगांच्या सरकारमध्ये मी होतो. त्यावेळी मोदी साहेब हे गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि काही राज्यं ही भाजपकडे होती. अनेकदा मी असं बघायचो, की मुख्यमंत्र्यांची परिषद असेल तर त्याच्या आदल्या दिवशी किंवा दोन-तीन दिवस आधी यांची वेगळी बैठक असायची. त्यांच्या पक्षाच्या किंवा त्याच्या सरकारच्या मुख्यमंत्र्यांची वेगळी



बैठक घेतली हे मी समजू शकतो. त्या बैठकींचे नेतृत्व मोदी साहेबांकडे असायचे. त्या बैठकींमधले त्यांचे भाषण इतकं कठोर असायचं मनमोहन सिंगांबद्दल, की काही विचारू नका आणि नंतर मग मिटिंगला यायचे आणि त्यांचे प्रश्न मांडायचे. तो त्यांचा अधिकार होता. त्याबद्दल माझं काही म्हणणं नाही. पण देशाच्या प्रधानमंत्र्यांबद्दल राज्याचा एक मुख्यमंत्री किती टोकाची भूमिका मांडतो हे आम्ही त्याच वेळेला पहिल्यांदा पाहिलं. याआधी असं कधी घडत नव्हतं.

**संजय राऊत : आज काय परिस्थिती आहे?**

**शरद पवार :** आज इथे उलट परिस्थिती आहे. आज काही राज्यं त्यांच्याबरोबर नाहीत. त्यांनी अशी टोकाची भूमिका कधी घेतली नाही. ते केंद्राशी जमवून घेत आहेत. मनमोहन सिंगांनी कधी आपल्यावर कोणी टीका केली म्हणून आकस बाळगला

हिंदुस्थानातल्या सगळ्या राज्यांची जपणूक करण्यासाठी इथे बसलो आहोत. त्यामुळे पवार साहेब जे करतात ते योग्य आहे, ते त्यांनी केलं पाहिजे. ते मनमोहन सिंगांचं धोरण आणि आज आम्ही बघतोय, ते धोरण वेगळं आहे. याचं सरकार पाड, त्याचं पाड. आता राजस्थानच्या सरकारमध्ये आणखी करता येईल तर कर या सगळ्या चर्चा आहेत.

**संजय राऊत : पण याच्यामध्ये आपल्या राज्याचा नंबर येईल असं वाटतंय का? महाराष्ट्राचा?**

**शरद पवार :** असं बोलतात. अनेकदा बोलतात. म्हणजे काही लोक बोलतात त्यांच्या पक्षातले. पण त्यांना जनमानसांत किती किंमत आहे आणि तिथे किती किंमत आहे हे मला माहित नाही. पण ते बोलतात.

**संजय राऊत : तुमचं पुलोदचं सरकारसुद्धा नंतर बरखास्त**



नाही. मोदी तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते. ते सातत्याने मनमोहन सिंगांवर टीका करत. पण मनमोहन सिंगांनी कधी त्याचा राग गुजरातवर काढला नाही. मी शेती खात्याचा मंत्री होतो. मला सतत सगळ्या राज्यांत जावं लागायचं. शेती उत्पादन वाढववायच्या दृष्टिनं आणि मी गुजरातमध्ये सुद्धा त्यावेळी बराच फिरलो. मोदी साहेबांच्या सोबत मी गुजरातमध्ये फिरलो. तिथल्या शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी अनेक योजना राबवल्या. त्यावेळी काँग्रेसच्या काही मंडळींनी आमच्या मंत्रिमंडळावर टीका केली, की मोदी एवढी टीका करतात आणि आपले शेती मंत्री त्यांच्याकडे जाऊन सगळी मदत करतात. तेव्हा मनमोहन सिंगांनी मिटिंगमध्ये सांगितलं, की गुजरात हा या देशाचा भाग आहे. आपण सगळे

**केलं. कारण तुम्ही वेगळ्या विचारांचे होता.**

**शरद पवार :** इंदिरा गांधींनी त्यावेळी सगळी सरकारं बरखास्त केली आणि त्याला कारण काय दाखवलं? त्याच्यानंतर ८०ची निवडणूक झाली आणि तिथे काँग्रेसची सत्ता सगळीकडे आली. जिथे विरोधी सरकारं होती, तिथेही काँग्रेसची मेजॉरिटी आली. म्हणून हा लोकांचा कौल आहे असं सांगून इंदिरा गांधींनी सगळी सरकारं बरखास्त केली. आज तशी स्थिती नाहीये.

**संजय राऊत : हे ऑपरेशन कमळ काय आहे?**

**शरद पवार :** ऑपरेशन कमळ याचा अर्थ सरळ सरळ सत्तेचा गैरवापर करून लोकांनी निर्माण केलेली सरकारं दुबळी करणं, डिस्टॅबिलाईज करणं आणि त्याच्यासाठी केंद्राच्या सत्तेचा

पुरेपूर गैरवापर करणं.

**संजय राऊत : महाराष्ट्रामध्ये ऑक्टोबर महिन्यात ऑपरेशन कमळ होईल असं सातत्यानं पसरवलं जातंय.**

**शरद पवार :** पहिल्यांदा तीन महिन्यांत सांगत होते. नंतर आता सहा महिने झाले. आता सहा महिने झाल्याच्या नंतर सप्टेंबरचा वायदा आहे. काही लोक ऑक्टोबरचा करतायंत. माझी खात्री आहे, की पाच वर्षे हे सरकार उत्तमरितीने राज्याचा कारभार करेल आणि ऑपरेशन कमळ असो की आणखी काही, त्याचा काहीही परिणाम उद्धव ठाकरे यांच्या सरकारवर होणार नाही.

**संजय राऊत : देवेंद्र फडणवीस यांनी दोन गंभीर आरोप आपल्यावर केले मधल्या काळात. ते म्हणतात हा गौप्यस्फोट आहे. त्यात त्यांनी जो पहिला आरोप केला, की २०१४ साली तुम्हाला भाजपबरोबर सरकार बनवायचं होतंच. सुरूवातीच्या काळात तुम्ही पाठिंबा जाहीर केलात. त्यानंतर सरकार शिवसेनेबरोबर बनलं हे खरं. पण मधल्या काळात तुम्ही आणि भाजपचे वरिष्ठ नेते हे महाराष्ट्रात सरकार बनवण्यासंदर्भात चर्चा करीत होते असे त्यांनी ठामपणे परवा सांगितलेलं आहे.**

**शरद पवार :** त्यांनी सांगितलं, माझ्याही वाचनात आलं. पण गंमत अशी आहे की, हे त्यावेळी कुठे होते हे मला माहित नाही. डिसिजन मेकिंग प्रोसेसमध्ये यांचं काय स्थान होतं? हे मुख्यमंत्री झाल्यानंतर लोकांना माहित झाले. त्याच्या आधी विरोधी पक्षातला जागरूक आमदार म्हणून त्यांचा लौकिक होता. पण सबंध राज्याच्या किंवा देशाच्या नेतृत्वामध्ये बसून निर्णय घेण्याचा अधिकार त्यांना होता असं कधी मला जाणवलं नाही. ते म्हणतात त्याप्रमाणे त्या काळामध्ये मी एकदा कॉन्शिअसली स्टेटमेंट केलं ते शिवसेना आणि भाजपचे सरकार बनू नये म्हणून.

**संजय राऊत : हे कशासाठी केलंत?**

**शरद पवार :** माझी पहिल्यापासूनची मनापासून इच्छा होती की, शिवसेनेने भाजपबरोबर जाऊ नये. ते जातील असे ज्यावेळी दिसले तेव्हा मी जाणीवपूर्वक स्टेटमेंट केले की, आम्ही तुम्हाला म्हणजे भाजपला बाहेरून पाठिंबा देतो. हेतू हा होता, की शिवसेना त्यांच्यापासून बाजूला व्हावी. हे घडलं नाही. त्यांनी सरकार बनवलं आणि चालवलं. त्याच्याबद्दल वाद नाही. पण आमचा हा सतत प्रयत्न होता, की भाजपच्या हातात सरकार चालवू देणं हे शिवसेनेच्या हिताचं नाही. का? दिल्लीची सत्ता त्यांच्या हातात. राज्याची सत्ता म्हणजेच मुख्यमंत्री त्यांच्या हातात. यामुळे



शिवसेना किंवा अन्य पक्षांना लोकशाहीमध्ये त्यांच्या पक्षाचं काम करण्याचा अधिकार आहे हेच मुळात त्यांना मान्य नाही आणि त्यामुळे ते आज ना उद्या या सर्वांना निश्चितपणानं धोका देणार आहेत. आणि म्हणून आमची ही एक राजकीय चाल होती.

**संजय राऊत : बरं...म्हणजे फडणवीस जे सांगतात ते तुम्हाला मान्य नाही.**

**शरद पवार :** अजिबात मान्य नाही. पण त्यांच्यात व शिवसेनेत हे अंतर वाढावं यासाठी आम्ही जाणीवपूर्वक पावले टाकली हे मी कबुल करतो.

**संजय राऊत : हे अंतर तर आता वाढलं. दुसरा आरोप त्यांनी असा केला, की २०१९चं जे तीन पक्षांचं सरकार आता**

**बनलेलं आहे, त्या सरकार स्थापनेच्या दरम्यानसुद्धा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा असा त्यांनी उल्लेख केलाय, तेच भाजपबरोबर सरकार बनवण्यासंदर्भा अंतिम टप्प्यात चर्चा करत राहिले आणि नंतर पवार साहेबांनी यू-टर्न घेतला अचानक.**

**शरद पवार :** नाही. हे बरोबर नाही. साधी, सरळ गोष्ट आहे, की शिवसेनेला आम्हाला बरोबर घ्यायचं नाही. तुम्ही त्यात येऊन स्थिर सरकार बनवायला आम्हाला साथ द्या असे भाजपचे काही नेते आमच्या लोकांशी बोलत होते. आमच्यातल्या काही सहकाऱ्यांशी, माझ्याशीही एक-दोनदा बोलले. बोलले नाही हे खरे नाही. ते बोललेच, एकदा नाही, दोनदा नाही, तीनदा बोलले आणि त्याच्यामध्ये त्यांची अशी अपेक्षा होती, की प्राईम मिनिस्टरचे आणि माझे चांगले संबंध आहेत आणि त्यामुळे प्राईम मिनिस्टरने यात हस्तक्षेप करावा आणि मी त्याला संमती द्यावी आणि म्हणून माझ्या कानावरसुद्धा हा निरोप आला. आणि त्या वेळेला तो निरोप आल्यानंतर देशाचे प्रधानमंत्री आहेत, प्रधानमंत्र्यांकडे आपल्याबद्दल किंवा आपल्या पक्षाबद्दल चुकीची माहिती जाऊ नये म्हणून मी स्वत: पार्लमेंटमध्ये त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन त्यांना सांगितलं, की आम्ही तुमच्याबरोबर येणार नाही. जमलं तर आम्ही शिवसेनेसोबत सरकार बनवू किंवा विरोधी पक्षात बसू. पण आम्ही तुमच्याबरोबर येऊ शकत नाही. आणि




हे मी सांगायला जाताना एक गृहस्थ पार्लमेंटमध्ये माझ्या शेजारी होते. त्यांचं नाव संजय राऊत. त्यांना मी सांगून गेलो, की हे मी पंतप्रधानांना सांगायला जातोय. मी परत आलो त्यावेळी राऊत तिथेच होते. त्यांच्या कानावरही मी पंतप्रधानांबरोबरची चर्चा घातली.

**संजय राऊत : या सरकारबाहेर अनेक व्यक्ती आहेत, की त्या हस्तक्षेप करतात. खास करून राज्यपाल अशी आपली एक भूमिका आपण एका बैठकीत प्रधानमंत्र्यांच्या कानावर घातलीत. राज्यपालांनी सरकारमध्ये किती लक्ष घालावं?**

**शरद पवार :** मी असं बोललो ते केवळ महाराष्ट्रातल्या राज्यपालांपुरतं सीमित नव्हतं. माझं स्टेटमेंट असं होतं, की राज्यामध्ये सेंटर ऑफ पॉवर जर दोन व्हायला लागल्या तर गडबड होते. काही राज्यांमध्ये ते झालं. जसं काश्मीरमध्ये तिथे एक राज्यपाल होते. तिथल्या मुख्यमंत्र्यांना त्यांनी काम करणे जवळपास अशक्य करून टाकले होते. त्याच्या नंतर पश्चिम बंगालमध्ये तिथंही असा प्रकार झाल्याचं कानावर येत होतं. खरं म्हटलं तर लोकशाहीच्या बहुमतासंबंधीचे संख्या असलेले सरकार असल्यानंतर राज्यपालांना हस्तक्षेप करण्याचे काही कारण नाही आणि अधिकारही नाहीत. पण जर त्याच्यामध्ये हस्तक्षेप करत बसले तर अशा प्रकारची सत्तेची एकापेक्षा अधिक केंद्रे हे लोकशाहीच्या दृष्टिने आणि संसदीय पद्धतीच्या दृष्टिने योग्य नाहीत. हे माझं मत त्यावेळेला मी प्रधानमंत्र्यांना सांगितले आणि हे जनरल मत होतं. एका राज्यापुरतं नव्हतं.

**संजय राऊत : काँग्रेसचे जे नेते राज्य मंत्रिमंडळात आहेत, त्यांची अशी पहिली तक्रार आहे, की समन्वयाचा अभाव आहे. त्यांची दुसरी तक्रार अशी आहे, की राष्ट्रवादीला झुकतं माप**









मिळतं सरकारमध्ये.

**शरद पवार :** एक गोष्ट खरी आहे की, उद्धव ठाकरे यांची काम करण्याची पद्धत आहे, जी मी बघतोय ती आम्हा सगळ्यांच्या पेक्षा वेगळी आहे आणि त्याचं कारण उद्धव ठाकरे यांची कामाची पद्धत ही शिवसेनेच्या कामाची पद्धत आहे. शिवसेनेमध्ये मी अनेक वर्षांपासून पाहतो, अगदी शिवसेनेच्या स्थापनेपासून. आदेश येतो आणि तो आदेश आल्यानंतर चर्चासुद्धा होत नसते. काँग्रेस किंवा राष्ट्रवादी आम्ही ज्या विचाराने वाढलोय, आम्ही वरिष्ठांच्या मताचा आदर करतो. पण वरिष्ठांकडूनच आदेश येतो असं नाही आणि समजा एखादं मत मांडलं तर त्यावर आम्ही चर्चा करू शकतो. ही आमच्या कार्यकारिणीच्या कामाची पद्धत आहे. शिवसेनेमध्ये एकदा नेतृत्वाने भूमिका घेतल्यानंतर त्या रस्त्याने आपण जायचं आणि त्याची अंमलबजावणी करायची. ही पद्धत अगदी लहानथोर सगळ्यांच्यामध्ये आहे. या विचाराने तो पक्ष चालला आणि यशस्वीसुद्धा झाला. सध्याचे मुख्यमंत्री त्याच पठडीतले आहेत व कामाची पद्धत तीच आहे. त्याबद्दल माझी काही तक्रारच नाही.

**संजय राऊत : मग तुम्हाला काही अडचणी दिसत आहेत काय?**

**शरद पवार :** अडचण अजिबात नाही. सरकार आघाडीचे आहे. शिवसेनेसोबत आम्ही दोघेजण आहोत. आमच्या कामाची पद्धत ही नाही आणि आताचं जे सरकार आहे ते एकट्याचं नाही. हे तिघांचं आहे आणि या तिघांच्या मध्ये दोघांची काही मतं असतील तर मतं जाणून घेण्याच्या संबंधीचीसुद्धा एक आवश्यकता आहे आणि म्हणून आमच्या लोकांची एक सूचना असते, आग्रह असतो, की आपण डायलॉग ठेवा. संसदीय लोकशाहीमध्ये डायलॉग हा कायम ठेवला पाहिजे. तो डायलॉग ठेवला तर अशी चर्चासुद्धा होणार नाही. कारण ठाकरेंच्या कामाच्या पद्धतीमध्ये आम्हाला काही उणं दिसत नाही. फक्त डायलॉग दिसत नाही.

**संजय राऊत : संवाद पाहिजे.**

**शरद पवार :** होय, तो तर हवाच.

**संजय राऊत : अनेक ठिकाणी वाचतो किंवा काँग्रेसचे काही मंत्री जाहीरपणे बोलतात की, प्रशासनामध्ये थोडी अस्वस्थता आहे किंवा सरकार चालवण्यामध्ये प्रशासनाचा जास्त जोर आहे. बाळासाहेब त्याला नोकरशाही म्हणायचे. लाल फीतशाही. असं आपल्याला जाणवतं का?**

**शरद पवार :** नाही. आता कसं आहे माहितेय का. हा जो कोरोनाचा काळ होता ना, म्हणजे अजूनही संपला आहे असं नाही. या काळामध्ये हे चॅलेंज होतं. आव्हानच होतं आणि या आव्हानामध्ये बाकीचे सगळे प्रश्न बाजूला ठेऊन या कोरोनाचा सामना करायचा हे आव्हान मुख्यमंत्र्यांपुढं होतं आणि त्यामुळं साहजिकच मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्यावर ही जबाबदारी जास्त होती आणि आता आपण एकत्रित रात्रंदिवस प्रयत्न करून कोरोनाचे युद्ध जिंकलेच पाहिजे ही भूमिका आहे आणि या भूमिकेला सगळ्यांचाच पाठिंबा आहे आणि त्याच्यामुळे एकतर संवाद किंवा कामाच्या पद्धती या सगळ्या गोष्टींच्यामुळे थोडं थोडं परकोलेट होतंय ही गोष्ट खरी आहे. पण याचा अर्थ ते कायमच राहील असे वाटत नाही. प्रशासन यंत्रणेची आज त्यासाठी मदत घेतली आणि ती घेण्याची आवश्यकताही होती. आता मनोहर जोशींचे सरकार, तेही मुख्यमंत्री शिवसेनेचे होते. तेव्हा कधी अशी चर्चा झाली नाही. त्यावेळी मनोहर जोशींच्या काळात शिवसेना आणि भाजप एकत्र होते. आता शिवसेना आणि भाजपच्या ऐवजी शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी यांचं सरकार आहे

आणि त्यामुळे मनोहर जोशींच्या काळामध्ये ज्या पद्धतीने सरकार चालवलं तसे इथेही सरकार चालवेल जाईलच, पण आज चॅलेंज आहे ते कोरोनाचं.

**संजय राऊत : महाराष्ट्रामध्ये गेली काही वर्षे सातत्याने एक सामाजिक प्रश्न संघर्षाचा उभा राहिला, तो म्हणजे जातीय आरक्षणाचा. विशेषत: मराठा समाजाचे आरक्षण आहे, धनगर समाजाचे आरक्षण आहे. हे दोन्ही समाज आरक्षणाच्या मुद्यावर एकमेकांच्या विरूद्ध उभे राहिलेले दिसतात.**

**शरद पवार :** सरकारने दोन्ही समाजांच्या आरक्षणासंबंधी जी भूमिका घ्यायची ती घेतलेली आहे. पाठीमागचे सरकार असो किंवा आताचे सरकार, आरक्षण दोघांनाही दिलेलं आहे. प्रश्न फक्त आरक्षण न्यायालयात टिकवण्यासंबंधीचा आहे. दोन गोष्टी आहेत. धनगर समाजाची मागणी आणखी दोन पावले पुढे जाऊन अशी आहे की, आदिवासींच्या संबंधीची आरक्षणाची जी भूमिका आहे ती ॲप्लिकेबल करावी आणि त्याच्यामागे कारणंही अनेक आहेत की, धनगर समाजातला एक वर्ग असा आहे, की तो मेंढ्या राखतो. एकदा पावसाळा संपला की, तो आपल्या मेंढ्या घाटावरनं कोकणात घेऊन जातो आणि पाऊस सुरू होण्याआधी परत आपल्या भागामध्ये येतो. हा एक ट्राईब जसा एका गावातून दुसरीकडे जातो, त्या पद्धतीने धनगर समाजाचा हा वर्गसुद्धा त्या पद्धतीनं राहतो आणि त्यामुळं एका दृष्टिनं हे आदिवासींचे जसे घरदार नसते, निवारा नसतो, जसजसं खायला मिळेल तसतसा तो पुढे जात असतो. स्थिरता नाही. अशा कुटुंबांच्या संदर्भात आपण ट्रायबलच्या बाबतीतही वेगळी भूमिका घेतली. तीच भूमिका घेऊन तशाच सवलती इथे दिल्या पाहिजेत ही मागणी धनगर समाजाची आहे. हे एकदमच काही दुर्लक्षित करण्यासारखे नाही. आदिवासींसारख्या ज्या सवलती आहेत, त्या द्याव्यात असं त्यांचं म्हणणं आहे. याउलट आदिवासी समाजाच्या नेतृत्वाचं असं म्हणणं आहे की, आमच्या वाट्यात दुसरं कुणी येऊ नये आणि त्यामुळं थोडंसं एक प्रकारचं अंतर आहे. आता हे एका बाजूचं असं अंतर असताना मराठा समाजाचा प्रश्न आला आणि मराठा समाजामध्ये बहुसंख्य लोक जे शेती करतात, नोकरी करतात, शेतमजूर म्हणून काम करणारा वर्ग आहे. महाराष्ट्रात शेती म्हटली तर जवळपास ८० टक्के ही






जिरायती शेती आहे. यंदा पाऊस पडला तर चांगली गोष्ट. पाऊस नाही पडला तर सबंध शेती व्यवस्था उद्‌ध्वस्त होते आणि त्यात हा राबणारा वर्ग उद्‌ध्वस्त होतो. म्हणून या वर्गाला काही सवलती दिल्या पाहिजेत अशी त्यांची मागणी होती. काही प्रमाणात त्या सवलती दिल्यात. आता त्या सवलतींच्या विरोधात काही लोक कोर्टात गेलेत. तो मामला सुप्रिम कोर्टात आज-उद्या आहे. आता महाराष्ट्र सरकारने, म्हणजे उद्धव ठाकरे यांच्या सरकारने देशातले उत्तमोत्तम वकील तेथे दिलेत आणि हा सरकारचा जो निर्णय आहे तो टिकावा यादृष्टिने ते आता काळजी घेत आहेत. कोर्ट काय ठरवेल ते आपण बघायचं. पण उद्या कोर्टाचा निकाल हा उलटासुलटा गेला तर आता मुलांना शिक्षणातल्या, नोकरीतल्या ज्या सवलती मिळतायेत त्याही जातील याची चिंता आहे आणि त्याच्यामुळे याबद्दलचा एक आग्रह आहे.

**संजय राऊत : संपूर्ण देशामध्ये विरोधी पक्षाला फार जाग आलेली दिसत नाही. अनेक प्रश्नांवर विरोधी पक्ष हा विखुरलेला आहे. खरं म्हणजे विरोधी पक्षची भूमिका लोकशाहीमध्ये फार महत्त्वाची आहे. आपणही राज्यात आणि संसदेत विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी सांभाळलीत. विरोधी**


**पक्ष भविष्यामध्ये एकत्र येऊन काही देशासमोर चांगलं काम उभं करणार का? जसं जनता पक्षाच्या काळात सरकारसमोर एक आव्हान उभं राहिलं होतं. अशी आपल्याला काही शक्यता वाटते का भविष्यात?**

**शरद पवार :** मला स्वत:ला असं वाटतं, की कोरोनाचं संकट एकदा कमी झालं आणि पार्लमेंट सुरू झाली की या कामाला गती येईल. देशातील विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांमध्ये एक भावना अशी आहे, की आपण एकत्र बसलं पाहिजे. आपण एकत्र बसून एक निश्चित कार्यक्रम ठरवून देशवासीयांच्या समोर एक पर्याय दिला पाहिजे आणि तो पर्याय देण्याची कुवत आजच्या विरोधी पक्षनेत्यांत आणि त्यांच्या ऐक्यात निश्चितपणे आहे. पण सगळे पक्ष कोरोनाकडे डायव्हर्ट झाल्यामुळे आज हे काम थांबलेलं आहे. कोरोनाचे संकट येण्याच्यापूर्वी देशातले विरोधी पक्षांचे लोक दोनदा एकत्र बसले, चर्चा केल्या. काही गोष्टींची धोरणे ठरवण्याच्या दृष्टिने विचार केला आणि नंतर हे सगळं चित्र बदललं या रोगामुळे. पण माझी खात्री आहे, की एकदा पार्लमेंट सुरू झाल्यानंतर देशातल्या सगळ्या विरोधी पक्षांना एकत्र करणं, त्याबद्दलची भूमिका घ्यावी लागेल.

**संजय राऊत : आपण पुढाकार घेणार आहात का त्यासाठी?**

**शरद पवार :** माझ्यासारखी व्यक्ती त्यात अधिक लक्ष देईल. मला याबाबतीत कमीपणा नाही कोणालाही भेटायला. सगळ्यांना भेटून आपण एका विचाराने आज पर्याय देऊ शकलो तर तो देणं ही राष्ट्रीय गरज आहे. आणि ती राष्ट्रीय गरज पूर्ण करण्यासाठी कशाचीची अपेक्षा न करता मी आणि आणखीन अनेक पक्षांचे सहकारी याबाबतीत या विषयावर विचार करत आहोत आणि त्याची अंमलबजावणी आम्ही सुरू करू.

**संजय राऊत : शेवटचा प्रश्न आपल्याला विचारतो, महाराष्ट्राचा विरोधी पक्ष वेगळा आहे आणि राष्ट्रीय स्तरावरचा विरोधी पक्ष वेगळा आहे. आपण महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये विरोधी पक्षनेता म्हणून काम केले आहे. महाराष्ट्रातील विरोध पक्षाला फार मोठी परंपरा आहे. विधानसभा असेल, विधानपरिषद असेल, विरोधी पक्षाचं नेतृत्व जर पाहिलं, आजच्या महाराष्ट्रातल्या विरोधी पक्षाला आपण काय सल्ला द्याल?**



**शरद पवार :** असं आहे की, एकतर विधानपरिषदेतील विरोधी पक्षाची जी एक टीम आहे ती आपली जी जबाबदारी आहे, त्यासंबंधीचा इम्पॅक्ट करायला फार यशस्वी होतेय असं मला दिसत नाही. विधानसभेचे चित्र वेगळे आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते कमीत कमी फिरतायत, बोलतायत, प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न करतायत. विरोधी पक्षाचं टिकाटिप्पणी करणे हे काम आहे. सत्ताधारी पक्षाची धोरणं कुठं चुकत असतील तर त्याबद्दल बोलण्याचा त्यांचा अधिकार आहे. लोकशाही ज्यांना मान्य आहे त्यांनी हे मान्यच केलं पाहिजे. पण त्यामध्ये एक आकस आहे असं दिसता कामा नये.

**संजय राऊस : तुम्हाला हा आकस जाणवतोय का?**

**शरद पवार :** आज याठिकाणी काय दिसतंय की, एकेकाळी आजचे मुख्यमंत्री आणि त्यांचा पक्ष आणि विरोधी पक्षात काम करणारे लोक हे एकत्र होते. त्यांनी एकत्र सरकार चालवलंय आणि आज त्यांच्याशी एकत्र काम करण्याची भूमिका आजच्या मुख्यमंत्र्यांनी घेतलेली नाही. त्यामुळे आपल्या हातातली सत्ता गेली याचं वैषम्य, त्याची अस्वस्थता ही विधानसभेतल्या विरोधी पक्षाच्या नेत्यांमधून अजिबात गेलेली दिसत नाही. सत्ता येते आणि जाते. लोकांनी दिलेली जबाबदारी सहज सांभाळून पार पाडायची असते. मी मुख्यमंत्री होतो. माझं मुख्यमंत्रिपद ८० साली गेल्यानंतर मी विरोधी पक्षाचा नेता झालो. पण व्यक्तिगत माझा अनुभव असा आहे, की मला विरोधी पक्षाचा नेता म्हणून काम करण्यात अधिक गंमत येत होती. त्याचं एक समाधानही होतं. पण आज काय दिसतंय? विरोधी पक्षनेता आज जर असं म्हणत असेल, की मी मुख्यमंत्री असताना माझं मुख्यमंत्रिपद गेलं. त्यासंबंधीचे सत्य पचवायला मला वेळ लागला. म्हणजे सत्तेशिवाय मी चालू शकतो की नाही असेच ते सांगत आहेत. म्हणून मला स्वत:ला असं वाटतं, की विरोधी पक्षाच्या नेत्याने आता स्वीकारले पाहिजे की, सत्ता हा आता आपला रस्ता नाही. आपण कधीकाळी होतो. पण आज त्याचा यत्किंचीतही विचार करायचं कारण नाही. आज विरोधी पक्षाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी लोकांनी आपल्याला दिलेली आहे, ती आपण समर्थपणानं पार पाडली पाहिजे आणि ती पार पाडण्यासाठी पडेल ते कष्ट केले पाहिजेत आणि त्यासाठी सत्ता माझ्याकडे नाही हे मला डायजेस्ट करता येत नाही, विसरता येत नाही ही भूमिका घेणं हिताचं नाही.


**संजय राऊत : ठाकरे सरकारचं भविष्य काय?**

**शरद पवार :** भविष्य हेच की, हे सरकार पाच वर्षे चांगलं चालेल याच्याबद्दल माझ्या मनात शंकाच नाही आणि अशी व्यवस्थित आम्ही काळजी घेतली तर पुढच्या निवडणुकाही आम्ही एकत्र लढवू.

■■■

# कोरोनाचे निमित्त आणि मनमानी राज्यकारभार

आकाश
नवी दिल्ली



**सर्वसामान्य जनतेला कोरोना कोविड–१९ या रोगाचा प्रतिकार करण्यासाठी विश्वास व हिंमत, धैर्य देण्याऐवजी लोकांना धास्तावून टाकण्यास प्राधान्य देण्यात आले व त्यातून निर्माण झालेल्या सार्वत्रिक भयगंडातून राज्यकर्त्यांना विरोध करणाऱ्या समर्थ शक्ति उरल्या नाहीत आणि ज्यांनी (विवेकी) आवाज उठवण्याचे प्रयत्न केले त्यांची गणना देशद्रोह्यांमध्ये करण्यात आली. सरकारच्या कोणत्याही निर्णयाला विरोध झाल्यास ‘करोनामुळे निर्माण झालेली असाधारण परिस्थिती’ व त्यामुळे सरकारला निर्णय अपरिहार्यपणे करण्याची पाळी आल्याचे कारण सातत्याने पुढे केले जाऊ लागले.**




अशी एक समजूत किंवा मान्यता आहे की एखादी समस्या किंवा पेच किंवा संकट सुटत नसेल तर त्याच्या सोडवणुकीत वेळ घालवण्यापेक्षा त्यामुळे उत्पन्न वातावरणाचा राजकीय लाभ उठवत राहणे. कारण यातून प्रस्थापित राजवट व राज्यकर्त्यांचा एक हितसंबंध तयार होतो. जगात असे अनेक विषय किंवा मुद्दे आहेत ज्यांच्या आड राज्यकर्ते त्यांना हव्या त्या गोष्टी घडवून घेत राहतात. हे करताना संबंधित मुद्यामुळे होणारे नुकसान व हानी हे त्यांच्या दृष्टीने गौण ठरतात. जगभरात दहशतवाद असाच एक मुद्दा बनलेला आहे. महासत्ता अमेरिकेच्या 'ट्विन टॉवर्स'वर आत्मघातकी हल्ले झाल्यानंतर दहशतवादाच्या मुद्याने जागतिक स्वरुप धारण केले. त्यापूर्वी भारतासारखे वैज्ञानिक असो, दहशतवाद आणि त्याचे धोके याच्या विरोधातील ठराव, प्रवचन, मुकाबला व कटिबध्दतेचा निर्धार होऊ लागला. हा एक शिरस्ताच होऊन गेला. पण हे सर्व वरवरचे होते. दहशतवादाच्या मुकाबल्याच्या नावाखाली अनेक स्वतःला निखळ लोकशाही देश मानणाऱ्या राजवटी व राज्यकर्त्यांनीही त्यांची सत्ता व अधिकार यांच्यात वाढ करण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर दहशतवादाचाच हुकमी पत्ता वापरुन नागरी स्वातंत्र्यावर मर्यादा आणण्यास सुरुवात झाली. सरकारी अधिकार अधिक केंद्रित स्वरुपाचे झाले आणि लोकशाही, संघराज्य पध्दतीचे रुपांतर केंद्रित सत्तेत होऊ लागले. काही मूठभर लोकांच्या हाती अधिकार व सत्ता एकवटण्यात आली. राज्यांचे



विकसनशील देश कट्टरपंथीय दहशतवादाचे असंख्यवेळा शिकार झाले तेव्हा हा मुद्दा केवळ चर्चेत राहिला. पण अमेरिकेसारख्या महासत्तेच्या पायाखालीच फटाका फुटल्यानंतर त्यांना त्याची जाणीव झाली आणि मग या मुद्याने विराट रूप धारण केले. त्यानंतर प्रत्येक आंतरराष्ट्रीय मंचावर, भले ती आर्थिक, व्यापारी, अधिकार कमी करण्यात आले. दहशतवादाच्या तपासासाठी नव्या केंद्रीय स्वरुपाच्या संस्था स्थापन झाल्या व त्यात राज्यांना कोणताही अधिकार ठेवण्यात आला नाही. थोडक्यात सांगायचे झाल्यास नाव दहशतवादाचे पण अधिकारांच्या केंद्रीकरणातून सत्ता मूठभरांच्या हाती एकवटण्याचा तो जणू परवानाच मानला गेला.




जी मंडळी लोकशाहीच्या आग्रहाखातर यास विरोध करु लागली त्यांची गणना देशद्रोही व शत्रुराष्ट्रांचे हस्तक म्हणून सरकारी व सरकार पुरस्कृत व उपकृत पाळीव प्रचारयंत्रणे कडून केली जाऊ लागली. हेच मापदंड सध्या सुरु असलेल्या करोना विषाणूच्या साथीमुळे निर्माण परिस्थितीला लावल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होऊ लागतील.

करोना विषाणूमुळे सुरु झालेली साथ व त्यातून निर्माण झालेला धोका निश्चितच भयंकर स्वरुपाचा आहे. परंतु हळूहळू काही गोष्टी स्पष्ट होऊ लागल्या आहेत आणि योग्य खबरदारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास या साथीचा मुकाबला केला जाऊ शकतो हेही आता लोकांना समजायला लागले आहे. त्यानुसार लोकं काळजीही घेऊ लागली आहेत. परंतु ही साथ भयंकर, जीवघेणी आहे अशी भीती घातली कुणी? आठवले तर लक्षात येईल! 'जान है तो जहान है!', 'घर के बाहर लक्ष्मणरेखा खींचे', 'दो गज की दूरी' आणि मग देशभरात पूर्ण लॉकडाऊन! आधी २५ मार्च ते १५ एप्रिल आणि मग त्यानंतर दर पंधरा दिवसांनी वाढत गेलेली ही राष्ट्रीय टाळेबंदी. संपूर्ण देशाला घरांमध्येच बंदिस्त करण्यात आले. सर्वसामान्य जनतेला या रोगाचा प्रतिकार करण्यासाठी विश्वास व हिंमत, धैर्य देण्याऐवजी लोकांना धास्तावून टाकण्यास प्राधान्य देण्यात आले व त्यातून निर्माण झालेल्या सार्वत्रिक भयगंडातून राज्यकर्त्यांना विरोध करणाऱ्या समर्थ शक्ति उरल्या नाहीत आणि ज्यांनी (विवेकी) आवाज उठवण्याचे प्रयत्न केले त्यांची गणना देशद्रोह्यांमध्ये करण्यात आली. सरकारच्या कोणत्याही निर्णयाला विरोध झाल्यास 'करोनामुळे निर्माण झालेली असाधारण परिस्थिती' व त्यामुळे सरकारला निर्णय अपरिहार्यपणे करण्याची पाळी आल्याचे कारण सातत्याने पुढे केले जाऊ लागले.

करोनाच्या भयगंडामुळे काय घडत आहे? सुरुवात जनतेची सर्वोच्च प्रातिनिधिक संस्था संसदेपासून करता येईल. संसदेचे पावसाळी अधिवेशन साधारणपणे जुलैच्या मध्यास किंवा तिसऱ्या आठवड्यात सुरु होते आणि ऑगस्टच्या मध्यास संपते. साधारणपणे महिन्याच्या कालावधीसाठी हे अधिवेशन असते. अर्थसंकल्पी अधिवेशनानंतर आणि नव्या आर्थिक वर्षाची पहिली तिमाही संपल्यानंतर हे अधिवेशन होत असल्याने अर्थसंकल्पाच्या प्राथमिक परिणामाचा आढावा या अधिवेशनाच्या निमित्ताने

घेणे शक्य होते. याखेरीज नवीन विधेयके सादर करणे किंवा प्रलंबित विधेयकांना मंजुरी देण्याची कामेही या अधिवेशनात होत असतात. याखेरीज लोकमहत्वाचे तातडीचे विषय चर्चेला येत असतातच. याखेरीज सरकारला काही अतिमहत्वाचे व अतितातडीचे कायदे करायचे असतील किंवा जारी केलेल्या वटहुकमांना मंजुरी देण्याचे कामही अधिवेशनात होत असते. करोना भयगंडामुळे आता हे अधिवेशन कसे घ्यायचे, कोणत्या स्वरुपात घ्यायचे यावर भरपूर चर्वितचर्वण सुरु आहे. त्याचे तपशील लांबलचक आहेत. करोनामध्ये व्यक्ती-व्यक्तींमध्ये शारीरिक दूरीकरणाची बाब सर्वात महत्वाची मानली गेली आहे. त्यामुळे लोकसभेचे ५४५ सदस्य आणि राज्यसभेचे २३५ सदस्य यांच्यासाठी शारीरिक दूरीकरणाचा निकष लावून अधिवेशन घेण्याची कसोटी आहे. यासाठी लोकसभेचे कामकाज सेंट्रल हॉलमध्ये, राज्यसभेचे कामकाज लोकसभेच्या सभागृहात करायचा पर्याय तपासून पाहण्यात आला. विज्ञान भवनात अधिवेशन घेण्याबाबतही विचार झाला. एक दिवसाआड सभागृहांच्या बैठका घ्यायच्या म्हणजे दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची एकदम गर्दी होणार नाही अशा प्रस्तावावरही चर्चा करण्यात आली. व्हर्च्युअल म्हणजे झूम ॲप्लिकेशनसारख्या माध्यमाचा वापर करुन बैठका करायच्या काय याची शक्यताही पडताळून पाहण्यात आली. परंतु अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. ताज्या माहितीनुसार एक दिवसाआड किंवा दोन्ही सभागृहांच्या वेळा बदलून कामकाज घ्यायचे तसेच लोकसभेचे सदस्य लोकसभेच्या सभागृहात, प्रेक्षककक्षात आणि राज्यसभेत व तेथील प्रेक्षककक्षात बसतील आणि या पध्दतीने कामकाज करण्याचा प्रस्ताव आहे. त्याच्या शक्याशक्यतेवर चर्चा सुरु आहे.

यातही आणखी एक मेख आहे. आता होणारे अधिवेशन हे केवळ पावसाळीच नसेल तर हिवाळी पण असेल अशी चर्चा ऐकायला मिळते. संसदेच्या दोन अधिवेशनादरम्यान जास्तीतजास्त सहा महिन्यांचा कालावधी असतो. म्हणजेच एक अधिवेशन संपल्यानंतर पुढील अधिवेशन सहा महिने पूर्ण होण्यापूर्वी घेण्याचे घटनात्मक बंधन असते. संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशन २३ मार्च रोजी संपले होते आणि २३ सप्टेंबरला सहा महिने पूर्ण होतात. त्यामुळे संसदेचे आगामी अधिवेशन कोणत्याही परिस्थितीत २३ सप्टेंबर किंवा त्यापूर्वी सुरु होणे अत्यावश्यकच राहील. अन्यथा कायदेशीर, घटनात्मक पेच उत्पन्न होऊ शकतो. परंतु अधिवेशन सप्टेंबर महिन्यात सुरु होऊन ऑक्टोबर महिन्यात संपल्यास हिवाळी अधिवेशनाची गरज भासणार नाही. हिवाळी अधिवेशन सर्वसाधारणपणे नोव्हेंबरच्या मध्यापासून ते डिसेंबर मध्यापर्यंत असते. त्यामुळे लगेच महिनाभरात सरकार हिवाळी अधिवेशन बोलावेल अशी शक्यता दिसत नाही. तसेच सहा महिन्यांच्या मुदतीचा विचार करता सरकार थेट पुढील वर्षीचे अर्थसंकल्पी अधिवेशन बोलवू शकेल. अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला सादर



करण्यात येत असल्याने अर्थसंकल्पी अधिवेशन जानेवारीच्या अखेरीलाच सुरु केले जाते. थोडक्यात सरकार एक अधिवेशन वगळू शकते. आता मेख काय आहे ते लक्षात येईल. एका वर्षात संसदेची तीन अधिवेशने होतात. परंतु करोना साथीमुळे निर्माण झालेल्या असाधारण परिस्थितीमुळे सरकार संसदेच्या एका अधिवेशनाला गोळी देऊ शकते. युरोपातही करोनाची लागण आहे आणि आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार ब्रिटनमध्ये संसदेचे अधिवेशन घेण्यात आले आहे. पोर्तुगालमध्ये ‘व्हर्च्युअल’ म्हणजेच इंटरनेटच्या माध्यमातून आभासी संसदीय अधिवेशन घेण्यात आले. जनतेसाठी कायदे करणे, जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करणे यासाठी संसद असते आणि सध्या देशापुढे अशा अनेक समस्या आहेत ज्यावर संसदेत सर्वपक्षीय चर्चा होऊन त्या समस्यांवर कदाचित काही तोडगाही काढणे शक्य होऊ शकते. सरकारला देखील या चर्चांमधून काही मार्गदर्शन मिळू शकते. असे कोणते मुद्दे आहेत ज्यावर संसदेत चर्चा होणे अपेक्षित आहे? करोना साथ आणि त्यातून उत्पन्न परिस्थिती, ती परिस्थिती हाताळण्यातील सरकारची कामगिरी, स्थलांतरित कष्टकऱ्यांची ससेहोलपट, भारत-चीन दरम्यान गलवान खोऱ्यात झालेला संघर्ष आणि वीस जवानांचा मृत्यु, चिनी सेना खरोखर माघारी गेल्या आहेत किंवा नाहीत, नेपाळसह काही शेजारी देशांबरोबर बिघडलेले संबंध, ढासळलेली अर्थव्यवस्था, अर्थव्यवस्था सावरणे आणि पूर्वपदावर आणण्याबाबत सरकारला आलेले अपयश, वाढती बेकारी, लोकांची वेतनकपात आणि सर्वसामान्यांपुढे निर्माण झालेला





उदरनिर्वाहाचा प्रश्न, केंद्र-राज्य संबंध यासारखे अनेक अतिमहत्वाचे विषय आहेत ज्यावर संसदेसारख्या सर्वोच्च व्यासपीठावर सर्वपक्षीय चर्चा होणे आवश्यक आहे. परंतु सरकारला खरोखर चर्चा हवी आहे काय हाही

# वटहुकमी राजवट

▪ लॉकडाऊन सुरु झाल्यानंतर लगेचच ३१ मार्च रोजी सरकारने टॅक्सेशन आणि तत्संबंधीच्या कायद्यांबाबतचा वटहुकूम जारी केला.

▪ एप्रिल महिन्यात सरकारने एकंदर पाच वटहुकूम जारी केले. त्यातच साथीच्या रोगविषयक वटहुकूम-२०२०चाही समावेश होता.

▪ जून महिन्यातही सरकारने पाच वटहुकूम जारी केले. त्यात जीवानावश्यक वस्तु विषयक कायद्याशी संबंधित तसेच, कृषि उत्पन्न बाजार समिती विषयक, दिवाळखोरी व बँकांना बुडविण्यासंबंधी वटहुकूम यांचा समावेश होता.

▪ केंद्रीय मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांच्यात वर्षभरासाठी सरसकट ३० टक्के कपात.

▪ संसद सदस्यांचे वेतन व भत्ते यांच्यात सरसकट ३० वर्षे कपात २ वर्षांसाठी.

▪ बँक नियमन कायद्यात दुरुस्ती


▪ शेतकरी हक्करक्षण कायदा.

▪ केंद्रीय होमिओपॅथी परिषदेची स्थापना.

▪ करसंकलन व तत्सम तरतुदींमध्ये सवलती.





एक प्रश्न आहे. कारण चर्चेत काही अप्रिय मुद्दे उपस्थित होणार आणि सरकारला त्यांची उत्तरे देण्यात अडचणी येऊ शकतात. मग संसदेचे अधिवेशन खरोखर घ्यायचे काय असाही मुद्दा उपस्थित होऊ शकतो. अद्याप संसदेचे अधिवेशन कोणत्या स्वरुपात घ्यावयाचे हेच निश्चित झालेले नाही. त्यामुळेच यासंदर्भातील अनिश्चितता कायमच आहे.

या अनिश्चिततेचाही लाभ घेतला जात आहे. संसदेचे अधिवेशन होत नसल्याने देशासाठी जे विविध महत्वाचे निर्णय आहेत त्यासाठी एका पाठोपाठ वटहुकूम जारी करुन त्यांची तत्काळ प्रभावाने अंमलबजावणीही सरकारने सुरु केलेली आढळते. आतापर्यंत जवळपास १२-१३च्या आसपास वटहुकूम जारी करण्यात आले आहेत. एखादा तातडीचा निर्णय घ्यायचा असेल आणि त्यावेळी संसदेचे अधिवेशन नसेल तर वटहुकूम काढण्याची प्रथा आहे. कारण वटहुकूम जारी केल्यानंतर त्यास त्यानंतर लगेचच होणाऱ्या संसदीय अधिवेशनात मंजुरी घेण्याचे घटनात्मक बंधन असते. वटहुकमांची मुदत सहा महिने असते आणि सहा महिन्यात अधिवेशन न झाल्यास व त्यास मंजुरी न घेतल्यास ते रद्दबाल ठरतात. अर्थात अतिशय तातडीच्या निर्णयांसाठी हा मार्ग वापरला जातो. सध्या सरकारने जे वटहुकूम जारी केले आहेत त्यामागील तातडीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकते. म्हणजेच परिस्थिती सुरळीत झाल्यानंतर व संसदेच्या माध्यमातून म्हणजेच नियमानुसार विधेयके सादर करुन व त्यावर चर्चा करुन या वटहुकमांच्या विषयांवर कायदे करणे शक्य होते. परंतु सरकार आपला 'अजेंडा' राबविण्यासाठी एवढे घाईला आले आहे की त्यांना संसदेच्या अधिवेशनाची किंवा परिस्थिती सुरळीत होईपर्यंत वाट पाहण्याचा दम निघेनासा झाला आहे. यापुढील काळात संसदेचे अधिवेशन ज्या स्वरुपात होईल त्यामध्ये सार्थक चर्चांना कसा वाव मिळू शकणार आहे याबाबत शंका आहेच परंतु वटहुकमांना मंजुरी घेतानाही त्यावर किती साधकबाधक चर्चा होऊ शकेल याचेच कुतुहल आहे. शक्यतोवर चर्चा कशाबशा उरकून वटहुकमांना मंजुरी मिळविण्याकडे कल राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही.




करोना संकटकाळातच सरकार असे काही निर्णय करीत आहे ज्याचे परिणाम दूरगामी असतील. रेल्वेच्या खासगीकरणाचा निर्णय हा त्यातील एक आहे. याखेरीज सरकारने संरक्षण क्षेत्र, अंतराळ क्षेत्र देखील खासगीकरणासाठी खुले करण्याचे निर्णय केलेले आहेत. या सरकारला खासगीकरणाचे जणू व्यसन लागले आहे. सरकारला अर्थव्यवस्थेची घसरण थांबवता येत नाही आणि सरकारला गुंतवणुकीची इच्छा नाही असे चित्र दिसून येते. परिणामी या सर्व आजारांवर एकच 'अक्सीर इलाज' म्हणजे खासगीकरण! या अनियंत्रित खासगीकरणाला आळा घालण्यासाठी संसद पुढाकार घेऊ शकते. परंतु संसद आहे कुठे असा प्रश्न पडतो. करोनाचे निमित्त करुन या देशाचे पंतप्रधान सरळसरळ स्वतःचा वेगळा असा निधि स्थापन करतात आणि देशातल्या सर्व उद्योगपतींना त्यात देणग्या द्यायला फर्मावतात. एवढेच नव्हे तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातूनही सक्तीने या निधीसाठी पैसे






कापून घेतले जातात या मनमानीचा जाब संसदेतच विचारला जाऊ शकतो. या निधीच्या निर्मितीमध्ये पारदर्शकतेचा अभाव आहे. लोकांनी जेव्हा याबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यास सुरुवात केल्यावर सरकारने मौन पाळणे पसंत केले. माहिती अधिकाराखाली विचारण्यात आलेले अर्ज केराच्या टोपलीत फेकण्यात आले. अखेर काही कार्यकर्ते कोर्टात गेले आणि आता त्याबाबत पंतप्रधान कार्यालयाकडे विचारणा सुरु झाली आहे. परंतु सर्वशक्तिमान पंतप्रधान कार्यालयाकडून माहिती मिळवण्यात कोर्टाला कितपत यश मिळेल हाही एक शंकेचा मुद्दा आहे. या अशा वेगळ्या निधीची गरज नाही आणि या निधीतील पैसा पंतप्रधानांच्या नैसर्गिक आपत्ती निवारण निधीत जमा करण्याची मागणी कोर्टापुढे करण्यात आल्यानंतर सरकारने ती फेटाळून लावली आहे. पंतप्रधानांचे वेगवेगळे निधी अस्तित्वात असताना या वेगळ्या निधीची आवश्यकता कोठून, कशातून निर्माण झाली हा प्रश्न अनुत्तरित आहे आणि पंतप्रधान तर 'मौनीबाबा' झाले आहेत. कळीच्या प्रश्नावर तोंडात मूग गिळून गप्प बसण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांनी या निधीचे नावही 'पीएम केअर्स फंड' असे ठेवले आहे. 'प्राईम मिनिस्टर्स सिटिझन्स असिस्टन्स अँड रिलिफ इन इमर्जन्सी सिच्युएशन फंड' असे लांबलचनक नाव या निधीचे आहे. अत्यंत ओढूनताणून ते तयार करण्यात आले आहे.

नावाचे काही नाही पण मुळात अशा वेगळ्या निधीची आवश्यकता का पडली हा प्रश्न आहे. या निधीचे ऑडिट सरकारी संस्थांतर्फे न करता खासगी संस्थेतर्फे केले जाणार आहे. या निधीचे विश्वस्त अर्थ, गृह व संरक्षण या खात्याचे वर्तमान मंत्री आहेत. पंतप्रधान प्रमुख आहेत. हे सर्व आचंबित करणारे आहे. या निधीतून पंतप्रधान म्हणे व्हेंटिलेटर्सना वगैरे मदत देणार आहेत. तशा काही बातम्याही प्रसिध्द झाल्या. पण या निधीचे संचालन कसे होत आहे, कोण करीत आहे हे गूढ कायम आहे. म्हणूनच संसदेत याबाबत प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. एवढेच काय संसदेच्या विविध समित्यांतर्फे या निधीचा दखल घेतली जाऊ शकते. परंतु हे तेव्हा होऊ शकते जेव्हा संसदेचे कामकाज सुरळीतपणे सुरु होईल आणि त्यासाठी प्रथम देशातली परिस्थिती सुरळीत व सर्वसाधारण होण्याची आवश्यकता आहे. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणे खरोखर राज्यकर्त्यांना परिस्थिती पूर्वदावर लवकरात लवकर यावी अशी इच्छा आहे काय? त्यासाठी ते काय प्रयत्न करीत आहेत? जनतेच्या मनात या विषाणूच्या विरोधात सामना करण्याची इच्छाशक्ति जागृत करण्याऐवजी 'करोनाचे संकट संपलेले नाही' अशी भीती का घातली जात आहे? या आणि याचसारख्या इतर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी काही व्यासपीठांची गरज आहे. संसद हे सर्वोच्च व्यासपीठ आहे आणि तेथे सरकारला जाब द्यावा लागेल.





Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
• CBSE व ICSE
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
A project by
MAGARPATTA CITY



# भारत-चीन सीमा संघर्ष : वास्तव काय?

गहिनीनाथ





**भारत–चीन दरम्यान लडाख भागातील सीमा विवादास तीन महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. १५ व १६ जूनच्या रात्री झालेल्या शारीरिक झटापटीत वीस भारतीय सैनिक मृत्युमुखी पडले. चीनचे किती सैनिक मारले गेले त्याची संख्या कळलेली नाही. त्यानंतर सुरु झालेल्या वाटाघाटी व चर्चेच्या प्रक्रियेत लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवर चार ते पाच फेऱ्या, वर्किंग मेकॅनिझमच्या तीन फेऱ्या, राजनैतिक पातळीवरील चर्चेच्या विविध फेऱ्या व संपर्क आणि उभय देशांच्या विशेष प्रतिनिधींची एक बैठक यांचा समावेश आहे. अद्याप या चर्चांमधून तोडगा निघू शकलेला नाही. याठिकाणी काही कटु वास्तवाचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. भारत–तिबेट–चीन संबंधांचे एक अभ्यासक आणि तज्ज्ञ क्लॉड आर्पी यांनी एका ताज्या लेखात भारत–चीन सीमारेषेच्या संदर्भातील नकाशांची अनुपलब्धता ही एक मोठी समस्या असल्याकडे लक्ष वेधले आहे.**

भारत-चीन दरम्यान लडाख परिसरात सुरु असलेली कोंडी फुटण्याची चिन्हे अद्याप धूसर आहेत. भारताने या परिसरातून चिनी सैन्याच्या माघारीवर भर दिलेला आहे. विशेषतः चीनने या परिसरात लष्करी वरचष्मा प्रस्थापित करण्याच्या सुरु केलेल्या हालचाली थांबवाव्यात ही भारताची प्रमुख मागणी आहे. यासंदर्भात सध्या सुरु असलेल्या चर्चेत दोन संज्ञा प्रामुख्याने वापरल्या जात आहेत. त्यांचा अर्थ प्रथम समजावून घेतल्यास भारताची भूमिका स्पष्ट होणे शक्य होईल. 'डिसएंगेज' आणि 'डी - एस्कलेशन' या त्या दोन संज्ञा आहेत. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या दोन्ही डिक्शनऱ्यांच्या आधारे या दोन संज्ञांचा अर्थ पाहिला असता 'डिसएंगेज' म्हणजे (उभय बाजूच्या) सैनिकांची माघार आणि सैनिकांकडून कोणतीही कारवाई किंवा कृति न करण्याची स्थिती असा आहे. 'डी-एस्कलेशन'चा अर्थ आहे, संघर्षाची किंवा संभाव्य हिंसक परिस्थितीची तीव्रता कमी करणे. सध्याची परिस्थिती विचारात घेता या दोन्ही संज्ञांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमुळेच तणाव निवळणार आहे. परंतु भारत सरकार अंतर्गत स्थापित 'चायना स्टडी ग्रुप' या चीनविषयक धोरणनिश्चिती करणाऱ्या प्रामुख्याने विविध संबंधित मंत्रालयांच्या सचिव पातळीवरील अध्ययन गटाच्या ताज्या बैठकीत भारताने 'डिसएंगेजमेंट' म्हणजे सैन्य माघारीस प्राधान्य दिल्याची माहिती मिळते. भारत-चीन दरम्यान लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवर सुरु असलेल्या वाटाघाटींमध्ये भारताकडून 'डी-एस्कलेशन'ची मागणी केली जात नसल्याची माहितीही सूत्रांनी सांगितली. भारत आणि चीनने या परिसरात प्रत्येकी चाळीस हजार सैनिकांची जमवाजमव केलेली आहे. म्हणजेच या परिसरात आताच्या घडीला एकंदर ऐंशी हजार सैनिक तैनात आहेत. असे असूनही भारतीय बाजू ही 'डी-एस्कलेशन'ला म्हणजेच संघर्षाची तीव्रता कमी करण्यात किंवा संभाव्य हिंसक स्थिती निर्माण होण्याच्या शक्यतेबाबत फारशी आग्रही नाही. असे का हा एक प्रश्न यातून निर्माण होतो आणि त्याचे उत्तर मिळणे अवघड आहे.


भारत सरकारच्या पातळीवर एक स्वतंत्र असा 'चीन अध्ययन गट' (चायना स्टडी ग्रूप) आहे. चीनविषयक भारत सरकारच्या भूमिकेची निश्चिती या गटातर्फे केली जाते. मूलतः हा अध्ययन गट विविध मंत्रालयांच्या उच्चपदस्थ सचिवांनी मिळून








बनलेला असतो. यामध्ये परराष्ट्र सचिव, गृहसचिव, संरक्षण सचिव आणि तिन्ही सेनादलांचे उप-प्रमुख आणि 'रॉ'(रीसर्च अँड ॲनालिसिस विंग) व 'आयबी'(इंटेलिजन्स ब्यूरो) यांचे संचालक यांचा समावेश असतो. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार या गटाची बैठक बोलावीत असतात.या बैठकांना तिन्ही सेनादलांचे प्रमुख आमंत्रित असतात व ते बैठकांमध्ये उपस्थित राहतात. आवश्यकतेनुसार परराष्ट्रमंत्री देखील या बैठकांमध्ये सहभागी होत असतात. नुकत्याच म्हणजे २८ जुलैच्या आसपास झालेल्या या गटाच्या ताज्या बैठकीत लडाखमधील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या गटाच्या बैठकीला परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल, तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख उपस्थित होते. त्यामध्ये 'डिसएंगेजमेंट'वर भर देण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळेच 'डि-एस्कलेशन'च्या मुद्याला आताच हात न घालण्याचे भारताचे धोरण आहे. सप्टेंबर महिन्यापासून या परिसरात प्रचंड प्रमाणात बर्फवृष्टी होऊ लागते. ती लक्षात घेऊन भारताने सैन्य-तैनाती आणि कडक व तीव्र अशा हिवाळ्याच्या दृष्टीने सैन्य सुसज्जता केलेली आहे. या परिसरातून चीनचे सैन्य प्रत्यक्ष आणि दृष्य स्वरुपात माघारी जाणे भारताला हवे आहे आणि ती स्थिती निर्माण होत नाही तोपर्यंत 'डि-एस्कलेशन'ची म्हणजेच संभाव्य संघर्ष किंवा हिंसक कृतीच्या तीव्रतेत घट होणार नाही.



या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षातील स्थितीचे आकलन करणेही आवश्यक आहे. १४-१५ जुलै रोजी लष्करी अधिकाऱ्यांच्या दरम्यान झालेल्या वाटाघाटीत या परिसरातील परंपरेने आणि गलवान संघर्ष होण्यापूर्वीपर्यंतच्या कायमस्वरुपी स्थितीनुसार सैन्य माघारीस चीनने मान्यता दिली आणि त्यानुसार चीनने 'फिंगर' विभागातून(पँगाँग त्सो जलाशय) सैन्य माघारीस सुरुवातही केली परंतु दोन-तीन दिवसांनंतर माघारीची प्रक्रिया थांबवण्यात आली. या परिसरात चार स्थानांवर विवाद असल्याचे सांगण्यात येते. पेट्रोलिंग पॉइंट-१४(पीपी-१४), पीपी-१५, पीपी-१७ आणि पीपी-१७(अ) हे ते चार बिंदू आहेत ज्यावर चीन अडून आहे. आता या मुद्यावरील कोंडी कायम असल्याने या परिसरातील सैन्यमाघारही थांबलेली आहे.

लष्कराच्या उत्तर विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल वाय.के.जोशी यांनी २६ जुलै रोजी जारी केलेल्या अधिकृत






निवेदनात, 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील यथास्थिती(स्टेटस को) फेरस्थापित करण्याचे सर्व ते प्रयत्न सुरु आहेत' असे म्हटलेले आहे. या निवेदनाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच भारतीय लष्करी उच्चाधिकाऱ्यातर्फे जारी करण्यात आलेले हे अधिकृत निवेदन होते. याआधी लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवरील वाटाघाटींनंतरही परराष्ट्र मंत्रालय निवेदन जारी करीत असे. हे निवेदन महत्वाचे का ? देशाच्या पंतप्रधानांनी 'चिनी सेना भारतीय हद्दीत घुसलेल्या नाहीत आणि चिनी सेनेने भारतीय हद्दीत तंबू किंवा तत्सम गोष्टी केलेल्या नाहीत' असे विधान केले होते. केवळ जनरल जोशी यांच्या निवेदनानेच पंतप्रधानांच्या विधानाचे खंडन झालेले नाही. प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया(पीटीआय) या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत चीनमधील भारतीय राजदूत विवेक मिस्री यांनी देखील नेमके जोशी यांच्याच आशयाचे उद्गार काढलेले आढळतात.

संरक्षणमंत्री राजनाथसिंग यांनी त्यांच्या लडाखभेटीतही 'जैसे-थे' स्थिती किंवा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर स्थिती पूर्ववत निर्माण करण्यासाठी वाटाघाटी सुरु आहेत परंतु या विवादाच्या सोडवणुकीबाबत काही अंदाज करता येणार नाही असे काहीसे आगतिक उद्गार काढलेले आढळतात. २९ जुलै रोजी चिनी परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने 'बहुतेक स्थानांवरुन चिनी सैनिक माघारी आलेले आहेत आणि आता परिस्थिती सुरळीत होत आहे' असा दावा केला. परंतु भारताने या निवेदनाचा इन्कार केल्याचेही प्रसिध्द झाले आहे. भारत-चीन सीमाभागातील परिस्थितीबाबतची ही ताजी उलटसुलट विधाने आहेत. ती कुणा सामान्य अधिकाऱ्याने केलेली नाहीत. तर उच्चपदःस्थ अधिकारी आणि राजकीय नेतृत्वाने केलेली आहेत. यातून कुणाला काय बोध घ्यायचा तो घ्यावा. परंतु भारत-चीन दरम्यान लडाखमध्ये जी तणातणी सुरु आहे त्याबद्दलच्या वस्तुस्थितीबाबत देश अंधारात आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे राजकीय नेते, लष्करी, परराष्ट्र सेवेतील अधिकारी यांनी केलेल्या निवेदनाचे अन्वयार्थ लावून सीमेवरील परिस्थितीबाबत अंदाजांवर







आधारित आकलन करण्यात येत आहे. अन्यथा सुरक्षेचे कारण पुढे करुन माहिती लोकांसमोर येऊ दिली जात नसल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे पंतप्रधानांनी त्यांचे निवेदन मागे घेतलेले नाही. त्याचा अर्थ चिनी सैनिक भारतीय हद्दीत आले नसल्याचे पंतप्रधानांचे निवेदन अद्याप

कायम आहे. पण मग संरक्षणमंत्री, भारतीय राजदूत किंवा लष्करी उच्चाधिकारी यांच्या निवेदनाचे काय ? त्यांनी तर पंतप्रधानांच्या निवेदनाच्या बरोबर उलट विधाने केलेली असताना कुणाचे निवेदन खरे मानायचे ?

भारत-चीन दरम्यान लडाख भागातील सीमा विवादास तीन महिन्याहून अधिक काळ लोटला आहे. १५ व १६ जूनच्या रात्री झालेल्या शारीरिक झटापटीत वीस भारतीय सैनिक मृत्युमुखी पडले. चीनचे किती सैनिक मारले गेले त्याची संख्या कळलेली नाही. त्यानंतर सुरु झालेल्या वाटाघाटी व चर्चेच्या प्रक्रियेत लष्करी अधिकाऱ्यांच्या पातळीवर चार ते पाच फेऱ्या, वर्किंग मेकॅनिझमच्या तीन फेऱ्या, राजनैतिक पातळीवरील चर्चेच्या विविध फेऱ्या व संपर्क आणि उभय देशांच्या विशेष प्रतिनिधींची एक बैठक यांचा समावेश आहे. अद्याप या चर्चांमधून तोडगा निघू शकलेला नाही. याठिकाणी काही कटु वास्तवाचा उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. भारत-तिबेट-चीन संबंधांचे एक अभ्यासक आणि तज्ज्ञ क्लॉड आर्पी यांनी एका ताज्या लेखात भारत-चीन सीमारेषेच्या संदर्भातील नकाशांची अनुपलब्धता ही एक मोठी समस्या असल्याकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे भारताने सीमा परिसरातील भागांचे किमान भारताशी संबंधित भागांचे नकाशे देखील तयार केले नसल्याचे म्हटले आहे. ही वस्तुस्थिती असेल तर ती गंभीर आहे. विशेष म्हणजे यास पुष्टि करणारी काही विधाने माजी वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांनी देखील केलेली आहेत. हवाईदलाच्या एका



अतिशय वरिष्ठ माजी अधिकाऱ्याने कारगिल संघर्षाची आठवण सांगतानाही याच अडचणीचा उल्लेख केलेला आहे. कारगिल संघर्षाच्या वेळी पाकिस्तानी घुसखोरांनी अत्यंत उंचावरील भारतीय लष्कराची ठाणी काबीज केलेली होती. हिवाळ्यात भारतीय सैनिक कमी उंचीवरील ठाण्यांमध्ये येतात आणि या उंचावरील ठाण्यांवर नियमित गस्त घालून नजर ठेवत असतात. परंतु या ठाण्यांचे स्थान दर्शविणारे उचित नकाशे सेनेकडे उपलब्ध नव्हते. त्यामुळे शत्रु नेमका कुठे आहे याचा अंदाज बांधणे अवघड झाले होते. त्याचप्रमाणे पायदळाच्या गस्ती तुकडीलाच



घुसखोरांनी मारुन टाकल्याने शत्रुच्या संख्येचा अंदाज करता येत नव्हता. त्या परिस्थितीत सुरुवातीच्या मोहिमेसाठी हवाईदलाची मदत घेण्याचे ठरले. प्रथम हवाईदलाच्या विमानांनी या उंचावरील शत्रुच्या ठिकाणांवर बाँबवर्षाव करायचा आणि तोपर्यंत पायदळास तयार करुन पाठवायचे ठरविण्यात आले होते. परंतु बाँबवर्षाव नक्की करायचा कोठे हा प्रश्न होता कारण स्थान दर्शविणारे नकाशे नव्हते. अखेर हवाईदलाच्या बहादूर वैमानिकांनी अंदाजे आणि प्रसंगी कमी उंचीवरील उड्डाणे करुन हे हल्ले करुन शत्रुचे कंबरडे मोडले आणि तोपर्यंत ताज्या दमाच्या सैन्याच्या तुकड्या येऊन त्यांचा पुरता खात्मा केला होता. परंतु हे शौर्य प्रशंसनीय असले तरी त्यासाठी लागणारी आवश्यक ती साधनसामग्री म्हणजे नकाशासारखी मूलभूत साधनेही उपलब्ध नसणे ही बाब लाजरिवाणी आहे. भारत-चीन दरम्यान सध्या सुरु असलेल्या वाटाघाटीत ही एक अडचण असल्याचे क्लॉड आर्पी यांचे म्हणणे आहे.

यातील आणखी एक महत्वाची बाब म्हणजे सीमारेषेबाबत उभय देशातील आकलनात असलेली तफावत ही होय. मुळात










भारत-चीन दरम्यानची सीमारेषा ही स्पष्ट नाही. मॅकमोहन रेषा म्हणून जी ओळखली जाते त्यामुळेच खरे तर हा विवाद आहे कारण ही रेषा आखताना ब्रिटिशांनी सर्व्हेयर्स पाठवून प्रत्यक्ष पाहणी न करता केवळ नकाशांच्या आधारे तिची आखणी केली असल्याचे मानण्यात येते. ही रेषा ज्या भागातून जाते तो भूभाग इतका दुर्गम आहे की सर्व्हे किंवा नकाशासाठी आवश्यक भूमापन आणि अन्य गोष्टी अशक्यप्राय आहेत. परंतु आता उपग्रहांच्या माध्यमातून या दुर्गमतेवर इलाज होऊ शकतो. अर्थात तो वेगळा विषय आहे. मूळ मुद्दा हा आहे की भारत व चीन दरम्यानच्या सीमारेषेच्या तपशीलांबाबत मतभेद आहेत. गलवान खोऱ्याचेच उदाहरण विचारात घ्यायचे झाल्यास १९५९ मध्ये तत्कालीन चिनी पंतप्रधान चौ एन लाय यांनी मान्य व मंजूर केलेल्या सीमारेषेप्रमाणे हे खोरे भारतीय हद्दीत समाविष्ट होते. परंतु तीन वर्षांनंतर चीनने आक्रमण केले आणि दहा दिवसांच्या युध्दानंतर त्यांनी ठिकठिकाणाहून माघार घेतली. अर्थात काही भूभागावरील ताबा त्यांनी सोडला नाही. अक्साई चीन हा प्रमुख भाग होता. १९६२च्या भारत-चीन युध्दानंतर काही ठिकाणी चिनी सैन्य माघारी गेले तर काही ठिकाणी त्यांनी ताबा सोडला नाही. या परिस्थितीत झालेल्या विविध वाटाघाटींच्या फेऱ्यांनंतर उभय देशांच्या सेनांच्या नियंत्रणाखाली असलेल्या भूभागाच्या आधारे 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषा' म्हणजेच 'लाइन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल'(एलएसी)ची संकल्पना पुढे आली. १९९३-१९९६ या वेळी झालेल्या भारत-चीन वाटाघाटींमध्ये या संकल्पनेला औपचारिक स्वरुप देण्यात आले. प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ही गलवना खोऱ्याला लागून जाते किंवा त्याच्या मधून जात असल्याने त्याबाबत संभ्रम होणे स्वाभाविक आहे. परंतु गेल्या अनेक वर्षात या ठिकाणी उभया देशांकडून केवळ नियमित गस्त घालण्याखेरीज दुसरे काहीही होत नव्हते. त्यामुळे कधी या ठिकाणी फारसा तणाव निर्माण झाला नव्हता.

कारगिल संघर्षानंतर भारत-पाकिस्तान सीमेप्रमाणेच भारत-चीन सीमारेषा परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे तसेच नव्या सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला. प्रामुख्याने पक्के आणि सर्व हवामानयुक्त (ऑल वेदर रोड) रस्त्यांच्या निर्मितीला प्राधान्य देण्यात आले. त्याचबरोबर दळणवळणाच्या अन्य सोयीसुविधांच्या आधुनिकीकरणावरही





भर देण्यात आला. त्यासाठी विशेष अर्थसंकल्पी तरतूदही करण्यात येत होती. सीमापरिसरातील काही हवाईपट्ट्यांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यामध्ये काराकोरम खिंडीजवळच्या दौलत बेग ओल्डी (डीबीओ) हवाईपट्टीचा समावेश होता. त्याचप्रमाणे लेहपासून दौलत बेग ओल्डीपर्यंतच्या रस्त्याचे काम सुरु करण्यात आले. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना त्यांच्या कारकिर्दीत हे काम सुरु करण्यात आले हे येथे नमूद करावे लागेल. या रस्त्याच्या दारबुक-श्योक-दौतलत बेग ओल्डी भागाचे काम अलीकडेच पूर्ण झाले. हा रस्ता दौलत बेग ओल्डी येथे संपतो आणि तेथून चीनचा मानबिंदू मानली जाणारी काराकोरम खिंड काहीच किलोमीटरवर आहे. मनमोहनसिंग यांच्या काळातच दौलत बेग ओल्डी हवाई पट्टीवर महाकाय व अवजड अशी हवाईदलाची मालवाहतूक करणारी विमाने उतरविण्यास प्रारंभ झाला. प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून केवळ नऊ किलोमीटर आत भारतीय हद्दीत ही हवाई पट्टी आहे. सामरिक दृष्टीने या हवाई पट्टीचे अनन्यसाधारण महत्व आहे. एकतर ही हवाईपट्टी किंवा विमानतळ जगातला सर्वाधिक उंचीवरील हवाईतळ म्हणून ओळखला जातो. विरळ व लहरी हवामानामुळे येथे विमानांची उड्डाणे किंवा उतरणे ही बाब सोपी नाही. परंतु साहसी भारतीय वैमानिकांनी ते साध्य करुन दाखवले. सियाचेन हिमनदी परिसरही याच्या जवळच येतो. सियाचेनमध्ये असलेले भारतीय लष्कराचे अस्तित्व आणि उंचीमुळे काराकोरम खिंडीसह पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील काराकोरम हायवे, काराकोरम खिंड, पाकिस्तानने चीनला या परिसरात दिलेला भूभाग या सर्व हालचालींवर भारताला नजर ठेवणे यामुळे सोपे झाले आहे तसेच या भागात आगळीक करण्याचा प्रयत्न झाल्यास भारताला उंचीचा सामरिक लाभ मोठा आहे. या सर्व बाबींमुळे चीनमध्ये अस्वस्थता वाढीला लागणे स्वाभाविक होते. त्यातूनच चीनने वेळोवेळी या भागात घुसखोरीचे प्रकार सुरु केले.







दुसरीकडे आंतरराष्ट्रीय राजकारणात वर्तमान भारतीय राज्यकर्त्यांनी उघडउघड अमेरिकेला अवाजवी महत्व देण्यास सुरुवात केली. त्याबरोबर चीनने पाकिस्तानला मदत करण्यापासून भारताला न्युक्लिअर सप्लायर्स ग्रूपमध्ये प्रवेशबंदी करण्यापर्यंत सर्व हालचाली करण्यास सुरुवात केली. हा संघर्ष वाढत गेला. भारत अवाजवी प्रमाणात अमेरिकेच्या कच्छपि लागत असल्याचे पाहून चीनने भारतातबाबतचे सौम्य धोरण आखडते घेण्यास

सुरुवात केली. वर्तमान राज्यकर्त्यांचे अमेरिका-प्रेम हे प्रमाणाबाहेर आहे. राजनैतिक संबंधांमध्ये आणि मुत्सद्देगिरीमध्ये समतोलपणा आवश्यक असतो ते भान राखले गेले नाही. अमेरिकेच्या नको इतके नादी लागण्यात वर्तमान राज्यकर्ते हे भानही विसरले की चीन हा आपला शेजारी देश आहे आणि त्याची सीमा भारताला लागून आहे, अमेरिकेला लागून नाही. त्यामुळे अमेरिकेचा पाठिंबा गृहीत धरुन चीनशी वाकडे घेणे व्यावहारिक ठरणार नाही. चीनच्या अनेक नेत्यांना भारत-अमेरिका ही उतू जात असलेली मैत्री खुपत होतीच. त्यात तथ्यही होते कारण पातळी सोडून वर्तमान राज्यकर्त्यांनी अमेरिकेला महत्व देण्यास सुरुवात केली. अखेर चीनने नखे बाहेर काढली. त्याची फळे आता सर्वांनाच भोगावी लागत आहेत.





गलवान खोरे, लडाखमधील पेचप्रसंग केवळ सीमावादापुरता मर्यादित नाही. त्याचे धागेदोरे व्यापक आहेत. त्याला आंतरराष्ट्रीय राजकारणाचा बाजू आहे. चीनमधील अंतर्गत राजकारणाचा भाग आहे तसेच जागतिक सत्ता म्हणून स्वतःला प्रस्थापित करण्याच्या चीनच्या महत्वाकांक्षी प्रयत्नांची पार्श्वभूमी देखील याला लाभलेली आहे. म्हणूनच मुत्सद्देगिरीत सावधगिरीला सर्वोच्च प्राधान्य असते. तसेच समतोल राखणारी धोरणे भूमिका घेतल्यास त्यास गांभीर्याने घेतले जाते ही बाबही लक्षात ठेवणे आवश्यक असते. अन्यथा फसगत निश्चितच!



Best Compliments

# योगेश्वराचा तनुत्याग

डॉ. सदानंद मोरे

## लोकमान्य टिळक यांचे अखेरचे दिवस



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अग्रणी 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांच्या निधनाला १ ऑगस्ट २०२० रोजी १०० वर्षे पूर्ण झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे उद्गाते म्हणूनच लोकमान्य टिळकांचा उल्लेख केला जातो. ब्रिटिशांविरुद्धचे पहिले आंदोलन लोकमान्यांनी सुरू केले आणि शेवटच्या श्वासापर्यंत ते ब्रिटिशांशी प्रखरपणे झुंजत राहिले. आयुष्याच्या शेवटच्या काळात म्हणजे निधनापूर्वी त्यांच्या मनामध्ये जे विचारांचे काहूर उठलं होतं त्या क्षणाचे वर्णन करणारा हा लेख डॉ. सदानंद मोरे यांच्या 'लोकमान्य ते महात्मा' या ग्रंथातून उद्धृत केला आहे.

गांधी-टिळकांच्या शेवटच्या भेटीचे एक साक्षीदार टिळकांचे नातू गजाननराव केतकर होते. सिंहगडावरील भेटीचा वृत्तांत व त्यानंतरच्या म्हणजे टिळकांच्या निधनापूर्वी पंधराएक दिवसांपूर्वीच्या भेटीची हकिगत डॉ. भटांनी आणि गजाननरावांनीही सांगितली आहे. त्यातून स्पष्ट होणारे चित्र असे, या वेळी मौलाना शौकत अलीही गांधींसमवेत होते. असहकारितेविषयी गांधी-टिळकांत काही मतभेद झाले. 'असहकारिता मतदारांपेक्षा प्रतिनिधींनी केल्यास अधिक परिणामकारक होईल,' हे टिळकांचे मत त्यांच्या कौन्सिल प्रवेशाविषयीच्या धोरणास धरूनच होते. 'असहकारिता सनदशीर आहे,' असे समर्थन गांधी करू लागले. टिळकांच्या लेखी तो मुद्दा महत्त्वाचा नव्हताच. मी सशस्त्र बंडसुद्धा सनदशीर

असहकारितेचा झंझावाती प्रचार त्यांनी केला. २२ जुलै रोजी कराची येथील ईदगाह मैदानावरील गांधींच्या सभेचे अध्यक्ष होते साधू टी. एल. वासवानी. शौकत अली, डॉ. किश्चलू आणि लोकमल चेलाराम सेठ यांची भाषणे झाली. गेल्याच वर्षी आपण विनाअट सहकाराचा पुरस्कार केला, याचा उल्लेख करून गांधी म्हणाले, "परंतु साम्राज्याचे सध्याचे प्रतिनिधी अप्रामाणिक आणि तत्त्वशून्य झाल्याचे आढळल्यामुळे मला आश्चर्य आणि चिंता वाटते. त्यांना भारतीय लोकांच्या इच्छेची खरी कदर नाही आणि भारताच्या सन्मानाला ते क:पदार्थ मानतात.''

गांधींना आलेला हा अनुभव टिळकांना यापूर्वीच आलेला असल्यामुळे ते पूर्ण सहकारितावादी कधीच नव्हते. याबद्दल त्यांनी गांधींना इशारा यापूर्वीच्या एका भेटीत दिलेला होता. ही



ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जन्मशताब्दीनिमित्त झालेल्या समारंभाला लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व अन्य ब्रिटिश अधिकारी आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सेनानी उपस्थित होते.

समजतो पण ते शक्य नाही इतकेच. सशस्त्र बंडाला यश येईल, अशी कोणी आठ आणे जरी खात्री दिली, तरी बाकीच्या आठ आण्यांबद्दल परमेश्वरावर विश्वास ठेवून मी बंड पुकारीन; पण आज पाव आण्याइतकीही तयारी व खात्री नाही," असे टिळक म्हणाले. महात्माजी व लोकमान्य यांचे मधोमध शौकत अली बसले होते, ते दोघांचे हात धरून म्हणाले, ''मला तुम्ही दोघेही पाहिजे आहात. मी तुम्हा दोघांमधील दुवा होतो.'' अखेर पुन्हा देशात फिरून आल्यावर आठ-दहा दिवसांनी भेट घेऊन चर्चा करण्याचे ठरले.

या आठ-दहा दिवसांच्या काळात गांधी सिंध-पंजाबच्या दौऱ्यावर होते. १ ऑगस्टला सुरू करण्यात येणाऱ्या


गोष्ट १९१८ मधील आहे. महायुद्धात भारतीयांच्या मदतीसाठी लॉर्ड विलिंग्डननी बोलावलेल्या पुढाऱ्यांच्या बैठकीत काय भूमिका घ्यायची, याबद्दल विचारविनिमय करण्यासाठी काही मंडळींना बोलावले होते. त्यात गांधीही होते. सदाशिवराव सोमणांच्या आठवणीत त्या भेटीचा तपशील दिलेला आढळतो. महात्मा गांधींनी लोकमान्यांना 'तुमचे मार्ग Devilish दुष्टपणाचे आहेत, वगैरे पुष्कळ कठोर वाक्यप्रहार केले. लोकमान्यांनीही त्यांना 'आमची बोटे या कामी जितकी जळली आहेत, त्याच्या शतांश जर तुमची जळली असती, तर तुम्ही आमच्यापुढे चाळीस हात उडी माराल, अशी माझी खात्री आहे,'' वगैरे गोष्टी तितक्याच स्पष्टपणे पण मृदू शब्दांनी सांगून सरतेशेवटी


दुसऱ्या दिवशीच्या सभेत काहीतरी बोलावयाचे वचन गांधींकडून मिळवले होते. सर्व मंडळी परत जाताना लोकमान्य फक्त महात्मा गांधींनाच लिफ्टपर्यंत पोहोचवावयास गेले होते व मोठा भाऊ लहान भावाच्या पाठीवरून हात फिरवून पाठ थोपटतो, त्याप्रमाणे ते गांधींच्या पाठीवरून हात फिरवून थोपटीत त्यांच्याशी काही बोलत होते. आपल्याला तोंडावर शिव्याच देणाऱ्याशी इतक्या प्रेमाने व मृदुपणाने बोलणाऱ्या लोकमान्यांच्या मनाचा मोठेपणा अन्यत्र कोठे सापडणार?"

उपरोक्त आठवणींतील टिळकांचे गांधींबद्दलचे भाकीत खूपच लवकर खरे होऊ लागले. टिळक प्रतियोगी का होईना, सहकारितेचाच पुरस्कार करीत असताना गांधींनी आता पूर्ण सहकारितेवरून पूर्ण असहकारितेकडे असे वळण पूर्ण केले. ही उडी निश्चितच चाळीस हातांची मानावी लागते.

२४ तारखेला हैदराबाद (सिंध) येथील खिलाफत परिषदेत आणि २५ तारखेला तेथील जाहीर सभेत गांधींची भाषणे झाली. भारतातून अफगाणिस्तानात हिजरत करणाऱ्या मुसलमानांना अनुलक्षून त्यांनी 'हिजरत हा अखेरचा पर्याय असून अद्याप तशी वेळ आली नसल्याचे' बजावले. हैदराबादहून ते मुंबईकडे रवाना झाले. खिलाफतीच्या प्रश्नावरून १ ऑगस्टला सुरू होणाऱ्या चळवळीचे 'हेडक्वार्टर' मुंबईच होते. गांधी मुंबईत दाखल झाले, तेव्हा टिळक 'सरदारगृहा'त मृत्यूशी झुंज देत होते. २९ तारखेला गांधींची खिलाफतविषयी जाहीर सभाही झाली. १ तारखेच्या चळवळीचे धोरण ते स्पष्ट करीत होते. – मुंबईत गांधी टिळकांना अखेरचे भेटायला आले, त्या प्रसंगाचे वर्णन पुंडलिकजी कातगडे आणि स्वत: गांधी यांनी कसे केले, ते आपल्याला ठाऊक आहे. गजाननराव केतकरही तेव्हा 'सरदारगृहा'त टिळकांच्या आसपास होते. ते लिहितात, टिळक अत्यवस्थ होते. शुद्धीवर नव्हते. त्यांनी नुसता नमस्कार केला व 'When did you come?' (तुम्ही केव्हा आला?) असा प्रश्न केला. पुढे काही बोलण्याचा प्रयत्न ते करीत होते; पण त्यांस बोलता आले नाही.

**ऑगस्ट क्रांतिदिनाच्या मुंबईत झालेल्या सभेत महात्मा गांधी, आचार्य कृपलानी, सरहद्द गांधी, सरोजिनी नायडू आणि मौलाना आझाद**








**लंडन येथील ब्रिटिश पार्लमेंटच्या दरवाज्यात उभे असलेले बिपीनचंद्र पाल, दादासाहेब खापर्डे आणि लोकमान्य टिळक.**

नंतर डॉक्टरांच्या सांगण्यावरून गांधी बाहेर आले. पुन्हा त्यांनी बाबूराव गोखले यास आत पाठवून 'मला काही निरोप सांगावयाचा आहे काय?' असे विचारावयास सांगितले व तसे आत येऊन बाबूरावांनी विचारलेही; पण टिळक उत्तर देऊ शकले नाहीत.' .

टिळकांच्या आजाराचे गांभीर्य गांधींना अर्थातच जाणवल्याशिवाय राहिले नाही व हा बहुधा त्यांचा अखेरचाच आजार असल्याचेही त्यांच्या लक्षात आले. डॉ. नानासाहेब देशमुखांनी वासूकाकांसारख्या निकटवर्तीयांना तसे जवळजवळ

सांगून त्यांची मानसिक तयारीही करवली होती. तरी ते आपल्यापरीने उपचारांची शर्थ करीत होतेच. टिळक मात्र त्यांच्या औषधांना व इंजेक्शन्सना विरोध करीत होते. या उपचारांमुळे 'उद्या मरायचे ते (तुम्ही) आजच माराल,' असे म्हणू लागले. 'इंजेक्शन द्यायला वेळ लागणार नाही, चटकन होते,' असे डॉक्टरांनी म्हणावे, त्यावर टिळकांनी 'माणसाला मारता पटकन येते, वेळ मुळीच लागत नाही,' असे म्हणावे. डॉक्टरांची अशी अवस्था पाहून धोंडोपंत तथा बाबा विद्वांस म्हणाले, दादा, असे काय करता? तुम्हांला सगळे ठाऊक आहे ना. नानासाहेबसुद्धा असेच सांगतात. ते तर आपल्या सगळ्यांत शहाणे आहेत ना?" त्यावर टिळकांनी बाबांनाच ते खरे; पण तू मला सपोर्ट का करीत नाहीस?" असा प्रतिप्रश्न केला. या दरम्यान डॉ. देशमुखांनी इंजेक्शन देण्याचे काम आटोपून घेतले....

टिळकांच्या अखेरच्या दिवसांबाबत केतकरांनी दिलेली माहिती अत्यंत विश्वसनीय आहे. केतकर हा माणूस विलक्षण स्पष्ट, सरळ, निर्भीड होता. स्वतंत्र बाण्याचा व शक्यतो बुद्धिनिष्ठता न सोडणारा होता. दिवाण चिमणलाल यांनी टिळकांना मोटारीतून समुद्रकिनारी फेरफटका मारावयास नेले. त्या दिवशी केतकरांना टिळकांकडून पत्रे लिहिण्यासाठी बोलावण्यात आले होते. त्यानुसार केतकर दुपारीच गेले. त्यांनी पुष्कळ वाट पाहिली; परंतु टिळक संध्याकाळी सहानंतरच आले आणि केतकरांना 'मला थोडीशी तापाची कणकण वाटते आहे, मी आता निजतो, पत्रे उद्या लिहू,' असे म्हणून आतल्या खोलीत जाऊन निजले, तो सडकून ताप भरला. तो मलेरियाचा नसून न्यूमोनियाचा ठरला व खऱ्या अर्थाने उतरलाच नाही. त्यांच्या प्रकृतीचे वृत्त ऐकून समाचाराला आलेल्या वासूकाका जोशींना त्यांनी 'तू विलायतेस जाणार असलास, तर आपण मिळून जाऊ,' असे सांगितले. ते त्यांच्या असहकारितेविषयीच्या भावी धोरणाशी सुसंगतच होते.

केतकरांनी सांगितल्याप्रमाणे शेवटच्या काळात लोकमान्यांची नेहमीची बोलण्याची विनोदी पद्धती व हात हलवण्याची पद्धती कायम होती. २८ जुलैला दुपारपासून त्यांची शुद्ध नाहीशी झाली. त्याच्यापूर्वी आपण या दुखण्यातून बरे होणार, असा त्यांना पूर्ण विश्वास होता.त्यांच्या मुली ज्या वेळी प्रथम त्यांना भेटावयास आल्या, त्या वेळी ते त्यांच्या नेहमीच्या

विनोदी पद्धतीस अनुसरून म्हणाले, पुन्हा सगळ्या जमल्या का तुम्ही? तुम्हांला उठल्यासुटल्या माहेरी यायची सवयच आहे. त्याचप्रमाणे चि. श्रीधरपंत जेव्हा पुण्याहून आले, तेव्हा टिळक म्हणाले, "मी मुळीच आजारी नाही. तुला उगीच चार दिवस मुंबईस घालवावयाचे होते म्हणून माझ्या आजाराचे निमित्त करून आलास, असे वाटते." २७ जुलैला दुपारी धोंडोपंतांनी टिळकांनी घरच्या व्यवस्थेसंबंधी काही बोलावे म्हणून काही सूचक प्रश्न केले. त्यांचा भावार्थ टिळकांनी जाणला व ते म्हणाले, "अरे तू वेडा आहेस. मी अजून पाच वर्षे खास मरत नाही. गोपाळरावांनी दिलेल्या औषधांचे दोन घोट घेतल्यावर 'आता पुरे' असे टिळकांनी म्हटल्यावर 'थोडे राहिले आहे, घ्या,' असे सांगणाऱ्या गोपाळरावांना "अहो, पुष्कळ पोटात गेले म्हणून थोडे राहिले, असे त्यांनी ऐकवले.

शेवटच्या चारेक दिवसांतील बेशुद्धीच्या अवस्थेत ते खाजगी सांसारिक गोष्टींविषयी एक शब्दही बोलले नाहीत. त्यांच्या डोक्यात सार्वजनिक गोष्टीच घोळत होत्या. 'अंतकाळच्या बेशुद्धीतसुद्धा आपल्या अंगीकृत कार्याशिवाय इतर कोणतीही गोष्ट मनात न येणे ही कर्मयोगातल्या समाधीची पराकाष्ठा होय,' असे केतकरांनी म्हटले आहे, ते योग्यच होय. केतकरांनी टिळकांची अशी काही वाक्ये दिली आहेत

ता. २८ जुलै रोजी रात्री..... १८१८ साली असे झाले–परवा हे १९१८ साल आले A hundred years' history– आम्ही हे असे हीन झालो.' !

'पंजाब Matter मध्ये तुम्ही काय करणार? पटेल यास तार केली काय? आम्ही Special Congress भरवणार आहोत.'


ता. २९ जुलै रात्री १ वाजता व्याख्यानाच्या थाटात... 'माझी अशी खात्री आहे आणि आपणही विश्वास बाळगा की, हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाही.'

रात्री २ वाजता व्याख्यानाच्या थाटात 'आपण व जनता यांनी जे परिश्रम केले, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.'

ता. ३० पुढे त्यांचे बोलणे अस्पष्ट होऊ लागले व ते अगदी जवळच्या माणसासदेखील समजेनासे झाले.

डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले यांनीही या दिवसांचा वृत्तांत दिला आहे. त्यानुसार २८ तारखेला सकाळी खिन्न अंत:करणाने व म्लान वदनाने सभोवती बसलेल्या मंडळींना टिळक म्हणाले, 'तुम्ही अशी काळजी का करता? I will not succumb. माझा हा नवज्वराचा ताप आहे. Crisis निघून गेला. आता मला उद्यापासून बरे वाटू लागेल.' पण त्याच दिवशी दोन प्रहरांपासून त्यांची प्रकृती जास्त बिघडू लागली व त्यास भ्रम पडून ते बेशुद्ध होऊ लागले. २८ला रात्री व २९ला सकाळी तर जास्त काळजी वाटू लागली. सकाळी ब्राह्मणांना बोलावून त्यांच्याकडून गीतापठणादी धार्मिक कृत्ये करवून घेतली. टिळक तसे बेशुद्धावस्थेतच होते; परंतु हाक मारली,

**लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर मुंबईतील त्यांच्या सरदार गृहापुढे जमलेला समुदाय व निघालेली भव्य अंत्ययात्रा.**





**लोकमान्य टिळक यांनी होमरूल लीगच्या प्रचारासाठी १० मार्च १९१८ रोजी भिवंडीत जाहीर सभा घेतली. तेव्हा त्यांच्यासमवेत तात्यासाहेब केळकर व धोंडोपंत विद्वांस आणि अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अलीसाहेब फक्की होते.**

तर विचारलेल्या प्रश्नास उत्तर म्हणून एखाददुसरे वाक्य मोठ्या कष्टाने बोलत असत. तेथे जवळच भगवद्गीतेची पोथी होती. त्यातील भगवान श्रीकृष्णाचे चित्र समोर धरून एका गृहस्थांनी 'हे काय आहे?' असे टिळकांना विचारले. त्या चित्राकडे बराच वेळ पाहिल्यानंतर ते म्हणाले, "हे श्रीकृष्णाचे चित्र आहे. त्याच्या चरित्राचे सर्वांनी अनुकरण करावे.' नंतर 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्' हा संपूर्ण श्लोक

तोंडाने म्हणून त्या चित्रास त्यांनी नमस्कार केला. नंतर लागलीच डोळे झाकले गेले व हात खाली पडले. त्यानंतर दोन दिवस ते काहीच बोलले नाहीत. कर्मवीर अशा या थोर विभूतीचे अर्थातच हेच शेवटचे शब्द होते.


स्वयंसेवकाच्या भूमिकेत 'सरदारगृहा'त प्रवेश मिळवून टिळकांच्या शुश्रूषेची संधी मिळवणारे पुंडलिकजी सांगतात की, 'सरदारगृहा पुढील रस्ता टिळकांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी जमलेल्या लोकांनी रात्रंदिवस फुललेला असे. शेकडो लोक रात्री फूटपाथवरच उभे किंवा बसलेले दिसून येत असत. माडीवरून कोणी सहज वाकून पाहिल्यास किंवा थुंकण्यासाठी त्या बाजूला वळल्यास खाली उभे असलेल्या लोकांपैकी कितीतरी लोक हाताच्या इशाऱ्याने आता प्रकृती कशी काय आहे,' असे त्यांना विचारीत असत. माडीवरील मनुष्याकडून शब्दाने किंवा हाताच्या इशाऱ्याने उत्तर न मिळाल्यास खाली उभे असलेले लोक अगदी निराश व चिंतामग्न होत असत. पुढे पुढे तर माडीवरील जो मनुष्य खाली वाकून पाहील किंवा खाली जाईल, त्याच्या चेहऱ्याच्या कमी-अधिक उदासीनतेवर लोकमान्यांच्या प्रकृतिमानाचे प्रमाण लोक बसवीत असत. खाली उभे असलेल्या लोकांच्या गलक्याचा आवाज होऊन लोकमान्यांना त्रास होत आहे, असे खाली कोणीतरी बोलले. त्याचा परिणाम एवढा झाला की, सरदारगृहा'च्या आजूबाजूच्या रस्त्यांवरही स्तब्धता झाली."

३० तारखेला टिळकांच्या तब्येतीचा समाचार घेऊन गेलेल्या गांधींनी राष्ट्राच्या भावना अचूक शब्दांत व्यक्त केल्या. "लोकमान्यांच्या आजाराने गंभीर वळण घेतल्याच्या दु:खद बातमीने सहस्रावधी भारतीयांची अंत:करणे चिंतेने धडधडत आहेत. राष्ट्रजागृतीतील योगदान, स्वातंत्र्याची निर्भय ऊर्मी आणि त्याग यांनी त्यांना लोकदैवतच बनवले आहे. लाखो लोक त्यांच्या शब्दाला कायदा मानतात. या देशाचे स्वातंत्र्य हे त्यांचे जीवनकार्य आहे. या अशा आणीबाणीच्या वेळी लोक त्यांच्या वियोगाच्या वेदना सहन करायच्या स्थितीत नाहीत. आज लोकांना आपल्या सर्वच नेत्यांकडून सेवा आणि मार्गदर्शनाची अपेक्षा आहे. लोकमान्य हे त्यांच्यामधील पहिल्या प्रतीचे नेते होत." गांधींनी शेवटी ईश्वराला साकडे घातले. "ईश्वर त्यांना बरे करो, दीर्घायुष्य देवो आणि स्वराज्यप्राप्ती झालेली त्यांना पाहायला मिळो! . गांधींच्या या प्रार्थनेला ईश्वराने प्रतिसाद दिला

नाही. कदाचित ईश्वराच्या मनातून ही जबाबदारी गांधींच्याच शिरावर टाकायची असेल!

३१ जुलैच्या रात्री (म्हणजे खरे तर १ ऑगस्टच्या पहाटे) दोन ते चार ही वेळ स्वयंसेवक पुंडलिकजींच्या देखरेखीची व सेवेची होती. त्यामुळे ते व इतर सात जण त्याआधी 'सरदारगृहा'च्या मालकांच्या बिहाडी म्हणजे शेवटच्या मजल्यावरील मंदिरात झोपले होते; परंतु रात्री बाराच्या सुमारास लोकमान्यांची प्रकृती अत्यवस्थ झाली व त्यांना घोर लागला. त्याचबरोबर त्या सर्वांनाच जागे करण्यात आले. पुंडलिकजींनी लिहिले आहे, टिळकांबरोबर त्यांच्या बऱ्या-वाईट प्रसंगांमध्ये काम करीत आलेले त्यांचे सहकारी, पुढारी एका हॉलमध्ये जमून चिंताग्रस्त स्थितीत काही बोलत उभे होते. दुसऱ्या बाजूला आठ-दहा डॉक्टर मंडळी वाटाघाटी करीत होती. शेवटी लोकमान्यांच्या पाठीचा एक मणका फोडून त्यातून काही पातळ पदार्थ काढल्यास हा लागलेला घोर नाहीसा होईल, असे सर्वानुमते ठरले; परंतु हे काम करण्याचे कोणीच डॉक्टर विश्वासाने अंगावर घेईना. डॉ. देशमुख यांनीच ते काम करण्याची जबाबदारी आपल्यावर घेतली. मी त्या वेळी एक दिवा-स्टँड हातात धरून दाखवीत होतो; परंतु एक हत्यार त्यांच्या मणक्यामध्ये डॉक्टर देशमुख ठोकून घालीत असताना माझ्या हातातील दिवा आपोआप वाकडा होऊ लागला. म्हणून जवळच असलेल्या कोणी मनुष्याने माझ्या हातातील दिवा काढून घेतला. पाठीच्या कण्यातील मणक्यामध्ये हे हत्यार जात असताना एकदा लोकमान्यांनी आपले दोन्ही पाय झाडले होते. हत्यार मणक्यामध्ये पूर्णपणे गेल्यावर त्यातून आपोआप एक प्रकारचा पातळ पदार्थ हत्याराच्या दुसऱ्या तोंडून बाहेर पडू लागला. त्यामुळे त्यांना लागलेला घोर थोडा कमी झाला. तेवढ्याने लोकांना कितीतरी आशा वाटू लागली.

दुर्दैवाने लोकांना वाटू लागलेली ही आशा फसवी आणि अल्पजीवी होती. तार मिळाली म्हणून अमरावतीहून त्वरेने मुंबईला आलेले खापर्डेही तेथेच होते. त्यांनी या दिवसाचे वर्णन 'आयुष्यातील एक अत्यंत दुर्दैवी काळाकुट्ट दिवस' असे केले आहे. रात्री नऊ ते दहाच्या दरम्यान ते बिछान्यावर थोडे आडवे झाले असताना त्यांना वर बोलावण्यात आले. नानासाहेब देशमुखांनी केव्हा काय होईल, हे सांगता येत नसल्याची कल्पना दिली. गोपाळराव देशमुख आणि साठे या डॉक्टरांनीही त्याला दुजोरा दिला. डॉ. रामकृष्ण भडकमकर यांनीही असेच मत व्यक्त केले. टिळकांचा अंत जवळ आला, अशी सर्वांचीच खात्री झाली. खापर्ड्यांनी त्यांना आल्याच्या रसातून हेमगर्भाची मात्रा दिली. मणक्यातून पाणी काढण्याचा पुंडलीकजींनी वर्णिलेला प्रसंग मात्रेच्या सेवनानंतरचा होय. पाणी काढल्यावर खापर्डे परत एकदा हेमगर्भाची मात्रा चाटवू पाहत होते; पण ती वेळ आलीच नाही. तेथे उपस्थित असणारे सदाशिव विष्णू बापट सांगतात, मुंबईतील प्रख्यात डॉक्टरांकडून उपाय करण्यात येत होते; पण देवाघरची दोरी तुटणार, अशी चिन्हे दिसू लागली व म्हणता म्हणता वेळ जवळ येत चालली. शेवटी सर्व डॉक्टर मंडळींनी आशा सोडली. या ब्रह्मर्षींचा पलंगावर शेवट होऊ नये म्हणून जमिनीवर ब्रह्मवृंदाने दांचे उच्चासन उभारले. त्यावर शेवटचा श्वास या मंत्रसिद्ध आसनावर व्हावा, असे ठरले. आम्हांस तशी खूण होताच मी लोकमान्यांच्या मानेखाली हात घातला व 'केसरी'चे सहसंपादक भुस्कुटे यांनी त्यांच्या मांड्यांखाली हात घालून हा महापवित्र देह अलगद मंत्रसिद्ध आसनावर ठेवताच हे ब्रह्मर्षी ब्रह्मरूप झाले! हे पाहून जवळ उभे असलेले दादासाहेब खापर्डे हात वर करून 'दुसरे रामदास स्वामी गेले,' असे मोठ्याने बोलले. दुःखाचा हाहाकार झाला. मी मात्र दुःखाने क्षणभर बेशुद्ध झालो!"





"या चार-आठ दिवसांत मुंबईतील बहुतेक सर्व स्नेही डॉक्टर मंडळींनी आपली नित्याची कामे जवळजवळ टाकून दिली होती व त्यांच्याभोवती तज्ज्ञ माणसांचा जागता पहारा





ठेवला होता. कोणत्याही गोष्टीचे उणे पडू नये म्हणून स्वयंसेवक मंडळींनी वरच्या मजल्यापासून खालच्या मजल्यापर्यंत आपली माळ चोवीस तास अखंड ठेवली होती. 'सरदारगृहा'च्या मंडळींनीही मेहनत घेतली असेल, हे सांगावयास नकोच. तात्पर्य, सर्वांनीच आपल्या श्रमाची व उद्योगाची पराकाष्ठा केली; पण शेवटी दैवाला 'तूच डाव जिंकलास,' असे म्हणून त्यांना टिळकांना मृत्यूच्या स्वाधीन करणे प्राप्त झाले," असे वर्णन काहीसे अलिप्तपणाने केळकरांनी । केलेले आहे. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांबद्दल 'इंदुप्रकाश'ने लिहिले, त्या रात्रीचा घोर प्रसंग टळावा म्हणून डॉक्टर वर्गाने जिवापाड प्रयत्न चालवले होते. वयोवृद्ध डॉक्टर नानासाहेब देशमुख, डॉ. भडकमकर, डॉ. गोपाळराव देशमुख, डॉ. साठे, डॉ. वेलकर, डॉ. आठवले, डॉ. एरूळकर प्रभृती वैद्यवरांनी आपले ज्ञानसर्वस्व टिळकांच्या जीवात्म्याला रोगाच्या मिठीतून सोडवण्यासाठी खर्ची घातले."

टिळकांच्या मृत्यूचे काव्यात्म वर्णन करण्यात अग्रेसर होते त्यांचेच, परंतु त्यांच्याशी वाकुडेपण घेतलेले शिष्य अच्युतराव कोल्हटकर. अच्युतरावांनी लिहिले, महाराष्ट्राचे दैव फुटले आणि परमपवित्र, परमथोर, परममंगल, परमप्रिय आणि परमदुर्लभ हे दिव्य रत्न लो. बाळ गंगाधर टिळक यांना (शनिवार ३१ जुलै १९२०ची) मध्यरात्र उलटताच बरोबर बारा वाजून पन्नास मिनिटांनी स्वर्गातील भाग्यवान देवांनी आपल्याला या महापुरुषाचा सहवास घडावा या मत्सरी इच्छेने या जगातून कायमचे उचलून नेले. श्री शिवरायांचा मृत्यू, राजारामाचे अकाली मरण, पानिपतचा रणसंग्राम, नारायणराव पेशव्यांचा वध, सवाई माधवरावांची आत्महत्या अथवा नाना फडणिसांचा स्वर्गवास या महाराष्ट्राच्या इतिहासातील ज्या भयंकर विपत्ती, त्यांच्याहून अणुमात्रही कमी नसलेली भयंकर वेळ आज महाराष्ट्रावर आलेली असून तिने महाराष्ट्रातून आज बाळ गंगाधर टिळक यांना ओढून नेले आहे." '

'टिळकभारत'कार शि. ल. करंदीकर यांनी टिळकांच्या मृत्यूचे वर्णन 'योगेश्वराचा तनुत्याग' असे केले आहे. योगेश्वर ही संज्ञा 'महाभारत'कारांनी श्रीकृष्णासाठी उपयोजिली आहे. श्रीकृष्णाच्या गीताग्रंथावर 'गीतारहस्य' लिहिणाऱ्या टिळकांना करंदीकरांनी योगेश्वर म्हणावे, हे साहजिकच आहे. पण 'योगेश्वर' शब्दातील योग कोणता, असा प्रश्न विचारला, तर टिळकांच्या बाबतीत कर्मयोग, हेच उत्तर द्यावे लागते. टिळकांची समाधी ही कर्मसमाधी होती. ध्यानसमाधी, ज्ञानसमाधी किंवा गानसमाधी नव्हे. तसेच समाधीतून ज्या ब्रह्माशी ऐक्य साधले जाते, ते ब्रह्म टिळकांच्या संदर्भात तरी देशब्रह्म होते. ते तनमनधनाने भारताच्या इच्छा-आकांक्षांशी, भावभावनांशी आणि भवितव्याशी एकरूप झालेले होते.

'जेथे योगेश्वर कृष्ण आणि धर्नुधर अर्जुन असतील, तेथे श्री विजय, भूती आणि शाश्वत नीती असतात,' असे संजयाने धृतराष्ट्राला सांगितले होते. टिळक योगेश्वर असतील, तर त्यांना धनुर्धराच्या रूपात कोण मिळणार, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून होत्या.

९ ऑगस्ट १९४२ च्या आंदोलनात काही आंदोलकांनी डाकखाने व रजिस्ट्रारच्या कचेऱ्या यांवर डाके घातले होते. काही ठिकाणी त्यांनी आगीही लावल्या होत्या. पण सुरुवातीला त्यांना पैसे मिळून सुद्धा त्यातला एक रुपयाही त्यांनी घेतला नाही असे म्हणतात. त्यावेळी चांदीचे रुपये तर फारसे दिसतच नव्हते. बहुदा कागदाच्या नोटाच असत. आंदोलन त्या नोटा 'आग्नेय स्वाहा' करीत त्यांचा स्वतःसाठी किंवा आंदोलनासाठी उपयोग करण्याचा विचारही कोणाच्या मनाला शिवला नाही. सुरुवातीला आंदोलनाचा जोर होता तेव्हा तर सरकारी अधिकारीच लोकांना लूट करायला आमंत्रण देत होते!....... सुरुवातीला अनेक ठिकाणच्या पोलिस चौक्यांवरच्या लोकांनीही जनतेला साथ दिली. जमाव येताक्षणी ते स्वतःच चौकीवर झेंडा लावीत आणि लोकांबरोबर घोषणा देत होते, असे खुद्द डॉ. राजेंद्र प्रसाद यांनीच त्यांच्या आत्मकथेत लिहून ठेवले आहे.







# छोडो भारत

डॉ. गणेश राऊत







छोडो भारत आंदोलन जन्माला येण्यास दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आणि क्रिप्स योजनेचे अपयश जबाबदार होते. जनतेमधील उत्साह टिकविण्यासाठी काँग्रेसने आपल्या अनुयायांस पुढील संदेश दिला- शत्रूच्या आज्ञा मानू नका. त्यांच्याकडून कोणतेही बक्षिस किंवा लाच स्वीकारू नका. आक्रमक फौजेने तुमच्या घराचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला तर प्राणपणाने त्याचा प्रतिकार करा. अर्थात प्रतिकार शांतिपूर्ण मार्गाने केला पाहिजे. शत्रूशी संपूर्ण असहकार हा एक असा मार्ग आहे. अर्थात असा नुसताच संदेश देऊन भागणार नाही, याची काँग्रेसमधील कर्त्या-धर्त्या नेत्यांना कल्पना होती. मात्र, चोहोबाजूंनी कोंडी झाल्याचे वातावरण होते. मार्ग सापडत नव्हता. या परिस्थितीचे वर्णन श्रीपाद केळकर यांनी 'छोडो भारत' ग्रंथात अगदी अचूकपणे केले आहे. ते लिहितात, काँग्रेसची त्या भूमिकेवर गांधीजींप्रमाणे श्रद्धा नव्हती व जनतेतही गांधीजींची 'शूरांची अहिंसा' बाणलेली नव्हती. अशा अवस्थेत महात्म्याचा आतला आवाज काय संदेश देणार याचीच प्रतिक्षा सगळ्यांना होती. गांधीजींना वैयक्तिक सत्याग्रहाच्या पुढचे पाउल टाकायचे होते.




गांधीजी आपल्या चिंतनात मग्न असतानाच सोमवारी (मौन दिवस) त्यांना एक कल्पना सुचली, किंबहुना स्फुरली. 'भारतातून ब्रिटिशांनी आपली सत्ता काढून घ्यावी असे आपण त्यांना सांगावे' अशी कल्पना गांधीजींच्या मनात स्फुरली. २२ एप्रिल १९४२ रोजी गांधीजींनी आपले एक ब्रिटीश मित्र होरेस अलेक्झांडर यांना पत्र लिहून ही कल्पना कळविली. गोऱ्यांनी आमचा देश सोडून जावा असे गोऱ्यांनाच सर्वप्रथम कळविण्याचे गांधीजींचे धाडस पहा. २२ एप्रिलच्या पत्रानंतर २६ एप्रिल १९४२ रोजी गांधीजींनी 'हरिजन' साप्ताहिकात लेख



आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली निघालेली सत्याग्रहाची पहिली तुकडी.



महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे.

लिहिला. या मागणीमागचा गांधीजींचा युक्तिवाद समजून घेणे सुद्धा महत्वाचे आहे. ‘इंग्लंड युरोपात लोकशाहीच्या रक्षणार्थ लढत असेल तर आशियातील लोकशाहीचे काय?’ या प्रश्नाला इंग्लंडकडे उत्तर नव्हते. म्हणूनच गांधीजी इंग्लंडला असे आवाहन करीत होते की त्यांनी ‘आशिया आणि आफ्रिकेतील आपल्या सर्व वसाहतींमधून ब्रिटीशांनी निघून जावे’, येथे एक महत्वाचा मुद्दा आपण लक्षात घेणे आवश्यक आहे की गांधीजी ब्रिटिशांना फक्त भारतातून जायला सांगत नव्हते तर आशिया आफ्रिका खंडातून जायला सांगत होते. गांधीजी ‘विश्वमानव’ पदाला का पोहोचले ते आपणांस येथे समजून येते.

१९४२ मध्येच गांधीजी सर्वप्रथम ब्रिटिशांना या देशातून चालते व्हा असे सांगत नव्हते तर ही कल्पना कितीतरी वर्षे त्यांच्या मनात घोळत होती. ज्या ऐतिहासिक भाषणाचा अपरिहार्य परिणाम म्हणजे गांधीजी आणि विनोबांची भेट झाली त्या १९१६ च्या बनारस हिंदू विश्वविद्यालयातील ऐतिहासिक भाषणातच त्यांनी या भूमिकेचे सूचन केले होते. १९१६ मध्ये गांधीजी त्या भाषणात म्हणाले, हिंदुस्तानच्या कल्याणासाठी इंग्रजांनी निघून जाणे किंवा त्यांना घालवून देणे आवश्यक आहे असे मला वाटले तर त्यांनी गेले पाहिजे असे सांगायला मी कचरणार नाही, आणि त्या निर्णयाच्या पूर्ती साठी मी मृत्यूही पत्करायला तयार होईन अशी मला आशा आहे.





बनारस हिंदू विश्वविद्यालयातील १९१६ साली महात्मा गांधींनी भाषण केले. त्यावेळी त्यांच्या समवेत पंडित मदनमोहन मालवीय आणि सरोजिनी नायडू.

याचा अर्थच असा की गांधीजींच्या मनात ही कल्पना पावशतक घोळत होती. योग्य वेळ येताच या कल्पनेने मूर्त रूप घेतले आणि 'छोडो भारत' या पंचाक्षरी मंत्राचा उच्चार झाला. गांधीजींचे सेक्रेटरी प्यारेलाल यांनी 'लास्ट फेज – खंड १' मध्ये 'छोडो भारत' या संदर्भात वेगळी माहिती दिली आहे. त्यांच्या शब्दात सांगायचे तर 'छोडो भारत' या कल्पनेचे जनक गांधीजी आणि घोषणेचा जनक अमेरिकन पत्रकार आहे. गांधीजींना भेटायला आलेल्या एका अमेरिकन पत्रकाराने संभाषणाच्या ओघात सहज सहजस्फूर्तपणे 'क्विट इंडिया' या घोषणेला जन्म दिला.


अर्थात, पुढचा प्रवास अधिक अवघड होता. गांधीजी या आंदोलनाच्या निर्णयाप्रत येण्यास आसपासची परिस्थिती जेव्हढी कारणीभूत होती तेवढीच इंग्रज राजवटीच्या संदर्भात बदलत चाललेली त्यांची मनोभूमिका सुद्धा होती. गांधीजी म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्याची व स्वातंत्र्य आंदोलनाची मुस्कटदाबी होते, तेव्हा आत्मसंयम हा गुण नव्हे, दोष ठरतो. राष्ट्रीय आकांक्षांचा लोप होईल इतक्या थरांपर्यंत आत्मसंयम ताणता येणार नाही. या वेळी गांधीजींनी वयाची सत्तरी पार केली होती हे लक्षात घ्यायला हवे. हाच लढा अंतिमाकडे नेणार आहे असे त्यांना वाटत होते.

२७ एप्रिल १९४२ पासून अलाहाबाद येथे काँग्रेस कार्यकारिणी आणि अखिल भारतीय काँग्रेस महासामितीची बैठक झाली. गांधीजी या बैठकीस अनुपस्थित होते. त्यांनी आपली भूमिका मीराबेन यांच्याबरोबर पाठवून दिली आणि काँग्रेस सदस्यांना त्या संदर्भात मोकळेपणाने चर्चा करता यावी म्हणून स्वतः अनुपस्थित राहिले. गांधीजींनाअपेक्षित होते तसेच घडले. तीन दिवस गांधीजींच्या भूमिकेवर घमासान चर्चा झाली. काहीही झाले तरी गांधीजींची खरी मदार नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांवर होती. देशभरातील गांधीवादी कार्यकर्ते, अखिल भारतीय चरखा संघ, नयी तालीम संघ, हरिजन सेवक संघ आणि अशाच स्वरूपाच्या प्रांतिक, जिल्हा, तालुका पातळीवर पसरलेल्या संस्थांमध्ये गांधीजींचे बळ होते. जून ४२ मध्ये गांधीजींनी सेवाग्राम आश्रमातून 'आंदोलन येऊ घातले आहे' असा नारा दिला. हळू हळू वातावरण निर्मिती होत होती. अखिल भारतीय पातळीवर वातावरणाचा अंदाज यावा म्हणून गांधीजींनी मीराबेन, खुर्शिदबेन, डॉ लोहिया, रामानंदन मिश्र यांसारख्या कित्येक अनुयायांना देशातील विविध भागात पाठविले.


याच्या पुढचा टप्पा ७ ते १४ जुलै १९४२ मध्ये गाठला गेला. वर्धा येथे सलग सात दिवस काँग्रेस कार्यकारिणीची बैठक चालली. या बैठकीतील एक वाक्य अगदी परिणामकारक होते. ते म्हणजे, तुम्ही कोणी येणार नसाल तर मी एकटा पुढे जाईन.गांधीजींच्या या भूमिकेवरून वारे कोणत्या दिशेला वाहात आहे याचा अंदाज सगळ्यांना आला. शेवटी ऑगस्ट १९४२ मध्ये मुंबई येथे अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन बोलाविण्याचे ठरले. ब्रिटिशांनी आमची मागणी मान्य केली नाही तर काँग्रेसला गांधीजींच्या नेतृत्वाखाली व्यापक अहिंसक आंदोलन सुरु करणे भाग पडेल. असा इशारा काँग्रेसने दिला. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारिणीने 'छोडो भारत' ठराव पास करून ऑगस्टमध्ये तो मुंबई अधिवेशनात ठराव मांडण्याचे ठरविले.

७ ऑगस्ट रोजी अधिवेशन सुरु झाले. दुसऱ्या दिवशी ८ ऑगस्ट रोजी गांधीजी म्हणाले 'करेंगे या मरेंगे'. या वाक्याने भाषणाचा शेवट करून गांधीजींनी अचूक 'टायमिंग' साधले. मुंबईतील हे अधिवेशन सर्वार्थाने वेगळे होते. मौलाना आझाद अधिवेशनाचे अध्यक्ष होते. ३५ हजार चौरस फूट मांडव. आठ हजार प्रेक्षक, काँग्रेस महासमितीचे २५० सदस्य, पत्रकारांमध्ये ३५० देशी-विदेशी पत्रकार (इंग्लंड, अमेरिका, चीन, रशिया


**मीरा बेन**


**रामानंदन मिश्र**


**डॉ. राम मनोहर लोहिया**


**प्यारेलाल नायर**



**८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात महात्मा गांधींनी 'करेंगे या मरेंगे' चा नारा देऊन याच वाक्याने भाषणाचा शेवट केला.**

इत्यादी), ३ हजार स्वयंसेवक व्यवस्थेसाठी सुसज्ज होते.

मौलाना आझादांचे दीड तासापेक्षा मोठे प्रदीर्घ भाषण, गांधीजींचे छोटेखानी भाषण यानंतर पं. नेहरूंनी 'छोडो भारत' चा मुख्य ठराव मांडला. त्याला सरदार पटेल यांनी अनुमोदन दिले. ठराव पास झाल्यावर गांधीजी तब्बल दोन-अडीच तास बोलले. 'बयालिसका विद्रोह' या पुस्तकात गोविंद सहाय यांनी या भाषणाचे वर्णन पुढील शब्दात केले आहे. अडीच तास संपूर्ण सभामंडपात कमालीची स्तब्धता होती. गांधीजींच्या ओजस्वी व सारगर्भित शब्दांचा जादूसारखा प्रभाव पडत होता. त्यांच्या वाणीतून निघणारा एक एक शब्द श्रोत्यांच्या हृदयास भिडत होता. रोमांचित करत होता. भाषणाच्या ओघात गांधीजी म्हणाले, स्वातंत्र्य मिळवायचे आहे असा आजपासून निश्चय करा. स्वतंत्र झालो नाही तर मरू. भेकडांसाठी स्वातंत्र्य नसते. गांधीजींनी सगळ्यांचीच मानसिक तयारी केली. जनतेला आवाहन केले.


इंग्रज सरकार संधीची आणि आदेशाची वाटपहात होते. ८ ऑगस्ट १९४२ रोजी रात्री सांकेतिक शब्दाद्वारे सर्व प्रांतिक सरकारांना दिल्लीकडून काँग्रेस नेत्यांना अटक करण्याचा आदेश मिळाला. ८ ऑगस्टला मध्यरात्री गांधीजींच्या मुंबईतील निवासस्थानाचा फोन कट करण्यात आला. ९ ऑगस्टच्या पहाटे ५ वाजता सरकारी कारवाई सुरु झाली. नेत्यांसह प्रमुख कार्यकर्ते अशा दोन हजार भारतीयांस अटक झाली. कमिशनर बटलर गांधीजींच्या निवासस्थानी धडकले. गांधीजी, महादेवभाई देसाई आणि मीराबेन यांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक करण्यात आली. गांधीजींनी कस्तुरबांवर सेवाग्राम आश्रमाची जबाबदारी टाकली. पहाटे ६:३० वाजायच्या आतच सरकारने ही कारवाई पूर्ण केली. म. गांधीजींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्ये तर पं. नेहरू, सरदार पटेल आणि अन्य वरिष्ठ नेत्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात नेण्यात आले. भारतीय नेत्यांना अटक केल्याची बातमी काही भारतीयांनी जपानी रेडिओ केंद्रावरून ऐकली. गांधीजींनी या आंदोलनाच्या संदर्भात जी महत्वाची सूचना केली होती ती म्हणजे, या आंदोलनामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला स्वतःच स्वतःचे मार्गदर्शक व्हावे लागेल. या वाक्याचा अर्थ पुढे सहभागींनी स्वतःच्या सोयीप्रमाणे लावला.



छोडो भारत चळवळी संदर्भात सरदार पटेलांची भूमिका

एकदम रोकठोक आणि समजायला सोपी होती. ते म्हणाले, काँग्रेसजनांपुरतीच भावी चळवळ मर्यादित राहणार नाही. शेतकरी, विद्यार्थी व काँग्रेसेतर संघटना तिच्यात भाग घेऊ शकतील. कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाची वाट पहात बसू नये. १९१९ ते १९४१ पर्यंतच्या आंदोलनात जे जे कार्यक्रम व आंदोलनाचे तंत्रउपयोगात आणले गेले, त्या सर्वांचा उपयोग आगामी आंदोलनात केला जाईल- करबंदी, हरताळ, मीठ, कायद्यांचा भंग, सरकारी आज्ञांचा भंग, सरकारी सत्तेला विरोध वगैरे हिंदुस्तानातील ब्रिटीश माणूस ही बेकायदेशीर व्यक्ती आहे हे त्याला समजावे यासाठी सर्व काही केले जाईल. १९२० प्रमाणे चौरीचुरासारखी हिंसा झाली तरी आंदोलन थांबणार नाही. सरदारांचा निग्रहच जणू यातून दिसतो.

गांधीजींनी सर्वसामान्य माणसाला पेटवेल असा कार्यक्रम दिला होता. पहिला टप्पा म्हणजे 'युद्धविरोधी सभा व मिरवणुका, परदेशी कापड आणि बँका, कारखाने वगैरेंवर बहिष्कार, ताडी-दारू गुत्त्यावर निरोधन; सरकारी नोकरांचे सामुदायिक राजीनामे, शाळा-कॉलेजात विद्यार्थ्यांचा हरताळ; मीठ कायद्यांचा भंग, मिठागरांवर आक्रमण, ताडीमाडीची झाडे तोडणे; सर्व सरकारी व युरोपियन कारखान्यांत कामगारांचा संप; जोरदार करबंदी मोहीम; नजरबंदीचे हुकुम व जेलमधील नियमांचा भंग तुरुंगात उपोषण. दुसऱ्या टप्प्यात- धावत्या गाडीत साखळ्या ओढणे, सर्व सार्वजनिक वाहतूक साधनांचा तिकीट न काढता उपयोग. सरकारी वाहतुकीत अडथळे; टेलिफोन-टेलिग्रामच्या तारा तोडणे असा कार्यक्रम सुचविला होता. गांधीजींच्या या कार्यक्रमाचे सार एकाच वाक्यात म्हणजे 'अहिंसेच्या मर्यादेत राहून कोणीही काहीही करू शकेल. करेंगे या मरेंगे.



**मीठ उचलून सविनय कायदेभंगाच्या चळवळीला महात्मा गांधी प्रारंभ करताना.**

सगळेच महत्वाचे नेते तुरुंगात व त्यातील काही भूमिगत त्यामुळे आंदोलनाची प्रत्यक्ष सूत्रे स्थानिक पातळीवरील नेत्यांच्या हातात गेली. त्यामुळे आंदोलन फार काळ अहिंसक पद्धतीने चालवणे अवघड झाले.

स्थानिक पातळीवर आंदोलन पसरल्यामुळे त्यास जनआंदोलनाचे स्वरूप आले. शहरांपेक्षा ग्रामीण भागात या आंदोलनाला जोरदार प्रतिसाद मिळाला याचा अपरिहार्य परिणाम पत्री सरकार, स्वराज्य सरकार किंवा आझाद सरकार निर्माण होण्यात झाला. नि:शस्त्र भारतीयांचा जन उठाव एक उच्च बिंदुला पोहोचला.

छोडो भारत चळवळीत काय घडले, महाराष्ट्रात पत्री सरकार कसे कार्यरत राहिले, भूमिगत आंदोलन कसे चालले हे आपण इतिहासाच्या शालेय पाठ्यपुस्तकांमधून वाचले आहे. यामुळे येथे एक अगदी वेगळाच संदर्भ दिला आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी या चळवळीकडे कसे पाहिले हे त्यांच्याच शब्दांत वाचूयात.

डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या 'आत्मकथा' या जवळपास ७०० पृष्ठांच्या आत्मचरित्रातून या चळवळीचे एक वेगळेच दर्शन घडते. ४२ च्या चळवळीत त्यांना ९ ऑगस्ट १९४२ ते ५ जून १९४५ या कालावधीत तुरुंगात ठेवण्यात आले होते. १९४२ चे 'छोडो भारत' मुंबईत छेडले जात असताना डॉ. राजेंद्रप्रसाद आजारी होते. ते सदाकत आश्रमात होते. सरकारने आर्चर नावाच्या पोलिस अधिकाऱ्यांस राजेंद्रबाबूंना अटक करण्यास पाठविले. डॉ. साहेबांची तब्येत बरी नसल्यामुळे सरकारने त्यांना जवळच्याच बांकीपूर तुरुंगात नेले. या अटकेविरुद्ध सूर उमटू लागले. 'छोडो भारत' चळवळी अंतर्गत पटणा शहरात उग्र निदर्शने सुरु झाली. सरकारी कचेऱ्या बंद पडल्या. तत्कालीन गव्हर्नरच्या घरावर एक मोर्चा गेला. सचिवालयावर तिरंगा लावायचा असे लोकांनी ठरविले. त्या प्रमाणे मोर्चा गेला असता सरकारने गोळीबार केला. त्यात ८-९ लोक मरण पावले. या सगळ्या बातम्या राजेंद्रबाबूंना तुरुंगात भरती होणाऱ्या नवनव्या कैद्यांकडून समजत

होत्या. ४०-५० विद्यार्थ्यांना पकडून तुरुंगात टाकण्यात आले. लोकांनी पाटणा शहरातील टेलिफोन यंत्रणा बंद पाडली. सरकारी अधिकाऱ्यांना कोठेही संपर्क करता येत नव्हता. बिहारमधील सर्व तुरुंग भरून गेले होते.

विद्यार्थ्यांना बांकीपूर तुरुंगातून लष्करी जेल मध्ये नेण्यासाठी सरकारने मोठे ट्रक आणले होते. पहिला ट्रक विद्यार्थ्यांना घेऊन पुढे जाताच लोक त्या ट्रकवर तुटून पडले. जमावाने सर्व विद्यार्थ्यांची सुटका केली. यामुळे तुरुंगातील अधिकारी शहाणे झाले त्यांनी लष्करास पाचारण केले आणि परिस्थिती आटोक्यात आणली. कैद्यांना दूर हजारीबाग तुरुंगात न्यावे तर लोकांनी आगगाडी दळणवळण बंद पाडले होते. तुरुंगात असताना राजेंद्रबाबू 'पटना डेली न्यूज' हे वृत्तपत्र वाचत असत. त्यात सरकारने कोणत्या जिल्ह्यावर किती सामुदायिक



कर बसविला आहे हे कळायचे. ४२ च्या चळवळीच्या काळात २६ लाख रुपये दंड बसवला होता. बांकीपूरच्या तुरुंगात बाबूजींचा नातू (अडीच वर्षे वय) त्यांना भेटायला यायचा. खाऊ मागायचा आणि घरी परत जाताना तुरुंगातले सुंदर फुल तोडून घरी घेऊन जायचा. या तुरुंगात बाबूजींना कायद्याचे चांगले ज्ञान असल्याने त्यांच्याकडे फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्या दयेचे अर्ज लिहून देण्याचे काम होते. बाबूजींचे आणखी एक महत्वाचे निरीक्षण म्हणजे ४२ चे आंदोलन ऐन भरात असताना बिहारमध्ये चोऱ्या, दरोडे बंद होते.

आंदोलकांनी काही डाकखाने व रजिस्ट्रारच्या कचेऱ्या यांवर डाके घातले होते. काही ठिकाणी त्यांनी आगीही लावल्या होत्या. पण सुरुवातीला त्यांना पैसे मिळून सुद्धा त्यातला एक रुपयाही त्यांनी घेतला नाही असे म्हणतात. त्यावेळी चांदीचे रुपये तर फारसे दिसतच नव्हते. बहुदा कागदाच्या नोटाच असत. आंदोलक त्या नोटा 'आग्नेय स्वाहा' करीत त्यांचा स्वतःसाठी किंवा आंदोलनासाठी उपयोग करण्याचा विचारही कोणाच्या मनाला शिवला नाही. सुरुवातीला आंदोलनाचा जोर होता तेव्हा तर सरकारी अधिकारीच लोकांना लूट करायला आमंत्रण देत होते!....... सुरुवातीला अनेक ठिकाणच्या पोलिस चौक्यांवरच्या लोकांनीही जनतेला साथ दिली. जमाव येताक्षणी ते स्वतःच चौकीवर झेंडा लावीत आणि लोकांबरोबर घोषणा देत.

राजेंद्रप्रसाद यांनी छोडो भारत चळवळी संदर्भात जे भाष्य केले आहे त्यावर म्या पामराने काय भाष्य करावे.



**याच बाराबंकी तुरुंगात डॉ. राजेंद्र प्रसाद यांना स्थानबद्ध करण्यात आले होते.**



# राज्याच्या महसूलावर परिणाम पण सरकारच्या इच्छाशक्तीवर नाही

## उपमुख्यमंत्री अजितपवार यांची राष्ट्रवादीच्या मुलाखतीत ग्वाही

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक बांधवांना सर्वप्रथम पक्षाच्या वर्धापनदिनाच्या, स्वातंत्र्यदिनाच्या मी मनापासून शुभेच्छा देतो. संपूर्ण जग आज कोरोनाशी लढत आहे. राज्यातील महाविकास आघाडी सरकारही कोरोनाविरोधात पूर्ण शक्तिनिशी रणांगणात उतरलं आहे. आपल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे असंख्य कार्यकर्ते या लढाईत सरकारच्या बरोबरीनं लोकांचे जीव वाचवण्यासाठी अमूल्यं योगदान देत आहेत.या सर्व कार्यकर्त्यांचा पक्षाला अभिमान असून त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. आभार मानतो.

कोरोना संकटामुळे पक्षाचा वर्धापनदिन आपण मर्यादित स्वरुपात साजरा केला. स्वातंत्र्यदिनही संपूर्ण सुरक्षितता बाळगून साजरा करायचा आहे. कोरोनाविरुद्ध ही लढाई प्रत्येकाला लढायची आहे, परंतु ती लढताना पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी पहिल्यांदा स्वत:ची, कुटुंबाची, समाज बांधवांची काळजी घ्यावी. स्वत:चा व इतरांचा जीव कोरोनापासून वाचवावा,असं माझं आवाहन आहे. गेल्या काही काळात पक्षाच्या अनेक सहकाऱ्यांना कोरोनामुळे जीव गमवावा लागला, मी त्या दिवंगत सहकाऱ्यांना श्रद्धांजली वाहतो. त्यांच्या कुटुंबाबद्दल सहसंवेदना व्यक्त करतो.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं २१ वा वर्धापनदिन साजरा केला.पक्षाची २१ वर्षांची वाटचाल निश्चितच गौरवशाली आहे. या वाटचालीत अपवाद वगळता जनतेनं सातत्यानं आपल्यावर विश्वास व्यक्त केला. विरोधी पक्षात असतानाही शेतकरी, कष्टकरी जनतेचा न्यायासाठी आपल्यावरच विश्वास होता. त्यावेळी जनतेच्या प्रश्नांसाठी पक्ष कार्यकर्त्यांनी प्रचंड संघर्ष केला. त्या संघर्षाला यश आलं आणि पक्ष सत्तेवर आला. पक्षानं आजवर मिळवलेलं यश हे संघर्षातून मिळवलं आहे. हे यश

म्हणजे पक्षाच्या ध्येयधोरणांचं, नेतृत्वाच्या दूरदृष्टीचं, कार्यकर्त्यांच्या परिश्रमांचं, जनतेच्या विश्वासाचं प्रतिक आहे, असं मला वाटतं.



आपण गेली ५ वर्षे विरोधी पक्षात होतो. विरोधी पक्षात असताना तत्कालिन सरकारच्या चुकीच्या धोरणांवर आपण सातत्याने टीका केली. चांद्यापासून बांद्यापर्यंत आंदोलनं केली. यात्रा काढल्या.गावोगावी फिरलो. लोकांना विश्वास दिला. जनतेसाठी रस्त्यावर सरकारविरोधात संघर्ष केला. तुरुंगात गेलो. त्या संघर्षातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. पक्षाला मिळालेली सत्ता जनतेच्या भल्यासाठी वापरायची आहे. आपलं आजचं सर्वात पहिलं ध्येय हे कोरोनाला हरवण्याचं आहे. राज्यातील जनतेला कोरोनापासून मुक्त करण्याचं आहे.रुग्णांना उत्तम आरोग्यसेवा, आवश्यक मदत देऊन कोरोनामुक्त करण्यासाठी ताकद पणाला लावायची आहे. राज्य सरकार यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचं पाठबळही सरकारला मिळत आहे. हा समन्वय कायम ठेवायचा आहे.

मला आनंद आहे की, राज्याचे आरोग्यमंत्री सन्माननीय राजेशजी टोपे असतील, गृहमंत्री सन्माननीय अनिलजी देशमुख असतील, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच मंत्री उत्तम काम करीत आहेत. कोरोना संकटकाळात पक्षाच्या मंत्र्यांनी प्रशासकीय कौशल्य, राजकीय अनुभव, सामाजिक बांधिलकी सिद्ध केली आहे. त्याबद्दल मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचं मी अभिनंदन करतो. सन्माननीय राजेश टोपे मातृवियोगाचं दु:ख विसरुन कोरोना योद्ध्यांच्या खांद्याला खांदा लावून लढत आहेत. केवळ मंत्री नव्हे तर राज्य, जिल्हा, तालुका, गाव पातळीवर काम करणारे पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्तेआपापल्या कार्यक्षेत्रात लोकांना कोरोनामुक्त ठेवण्यासाठी झोकून काम करत आहेत. त्यांचंही मी अभिनंदन करतो. आभार मानतो.

आपल्याला माझी पुन्हा विनंती आहे की, लोकांची काळजी घेताना, तुम्ही सर्वांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घ्या. स्वत:चा जीव वाचवूनंच कोरोनाविरुद्धची लढाई जिंकायची आहे. स्वत:चा जीव वाचवणं ही या लढाईतील यशाची पहिली पायरी आहे, याचं भान सर्वांनी ठेवलं पाहिजे.

कोरोना संकटामुळे सरकारसमोर अनेक आव्हाने आहेत. आर्थिक आव्हान मोठं आहे. उद्योग, व्यापार, रोजगार जवळपास ठप्प झाल्यामुळे महसुलावर परिणाम झाला आहे. महसुलावर परिणाम झाला असला तरी सरकारच्या इच्छाशक्तीवर बिलकूल परिणाम झालेला नाही. सरकारची इच्छाशक्ती भक्कम आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीचा जीव आमच्यासाठी महत्वाचं असून तो वाचवण्याला आमचं प्राधान्य आहे. त्यासाठी आरोग्ययंत्रणा भक्कम करण्यात आली आहे. डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल स्टाफ, सफाई कर्मचारी, पोलिस, अंगणवाडीताई, आशाताई, शासकीय, निमशासकीय संस्थांचे, स्थानिक स्वराज संस्थांचे



अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य राजकीय पक्षांचे, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते सगळेच जोखीम पत्करुन कोरोनाच्या लढाईत योगदान देत आहेत. त्यांच्या प्रयत्नांना यशही मिळत आहे. या सर्वांचं मी मनापासून आभार मानतो. कोरोनाविरोधात राज्यातील समस्त नागरिक सक्रीय सहभाग देत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहकाऱ्यांना, राज्यातील जनतेला मी विश्वास देतो की, राज्याचा सर्वांगीण विकास आणि सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाच्या वाटेवर चालत राहणं हे महाविकास आघाडी सरकारचं मुख्य ध्येय आहे. राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर वित्तमंत्री नात्याने मी विधीमंडळात अर्थसंकल्प सादर केला. त्या अर्थसंकल्पातून राज्याच्या विकासाची दिशा स्पष्ट केली. त्या अर्थसंकल्पाचं सर्वांकडून स्वागत झालं. परंतु, अधिवेशन सुरु असतानाच कोरोनाचं संकट उभं राहिलं आणि प्राधान्यक्रम बदलले गेले. गेले चार महिने आपण कोरोना विरोधात लढत आहोत. हे कोरोनाचं संकट लवकरच संपेल आणि राज्याच्या विकासाचा गाडा लवकरंच पुन्हा एकदा रुळावर येईल, असा मला विश्वास आहे. माझ्या विश्वासामागे कारण आहे. मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या महानगरात, धारावीसारख्या झोपडपट्टीत कोरोना नियंत्रणात आणण्यात आपल्याला मोठं यश मिळालंय. या यशाची नोंद जागतिक पातळीवर घेण्यात आली आहे. वैद्यकीय, प्रशासकीय यंत्रणांचे नियोजनबद्ध प्रयत्न तसंच लोकसहभागातून कोरोना नियंत्रणात येऊ शकतो, हे सिद्ध झालं आहे. कोरोनाविरुद्ध आपली सामुहिक प्रतिकारशक्ती वाढत असल्याचंही समोर आलं आहे. ही देखील सकारात्मक बाब आहे.



एका बाजूला कोरोनाविरुद्ध लढाई सुरु असताना राज्य सरकारनं 'मिशन बिगेन अगेन' सुरु केलं आहे. राज्यातील उद्योग, व्यापार, व्यवहार सावधपणे, सुरक्षितपणे पुन्हा सुरु करण्याचा आपला प्रयत्न आहे. राज्याचा गाडा लवकरच पुन्हा रुळावर येईल, असा विश्वास आहे. तोपर्यंत राज्याचे, सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन व्यवहार सुरु राहिले पाहिजेत. शेतकरी, कष्टकरी, दुर्बल, वंचित घटकांच्या विकासाच्या योजना सुरु राहिल्या पाहिजेत. राज्याच्या प्रगतीला खीळ बसता कामा नये, यासाठीही शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी आपण अनेक निर्णय घेतले.

शेतकऱ्यांसाठी महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमाफी योजना लागू करुन मर्यादित वेळेत तिची यशस्वी अंमलबजावणी केली. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कापूस, धान, मका, सोयाबीन खरेदी योजना प्रभावीपणे राबवली. यंदा कापसाची विक्रमी खरेदी करण्यात आली. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी २०० कोटींहून अधिक रक्कम खर्च करुन त्यांच्याकडील दुध खरेदी करण्यात आले. 'निसर्ग' चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत उपलब्ध करुन दिली. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी १ हजार २७३ कोटी तातडीने वितरीत केले. एसटी महामंडळासाठी ५५० कोटी देण्याचा निर्णय घेतला. मराठा समाजबांधवांच्या 'सारथी' संस्थेला तातडीने ८ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. आरोग्य विभागासाठी १७ हजार कर्मचारी, राज्य पोलिस दलात १२ हजार तरुणांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रुग्णांसाठी १ हजार रुग्णवाहिका खरेदी केल्या जात आहेत.

डॉक्टर, पोलिस आदी कोरोना योद्ध्यांसह नोंदणीकृत माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक यांनाही ५० लाख रुपयांचं विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात आलं आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत कोरोनावरील उपचारांची सोय नागरिकांना मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शिवभोजन योजना तसेच कम्युनिटी किचन संकल्पनेंतर्गत नागरिकांना भोजन उपलब्ध करुन देण्यात आले. नाशिक-पुणे रेल्वेमार्गाच्या कामाला गती देण्यात आली आहे. पुणे शहर व जिल्ह्यातील कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. राज्याचं शासन, प्रशासन, संपूर्ण जनता कोरोना संकटाशी एकजुटीनं, निर्धारानं लढत असताना राज्याची आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक परिस्थितीही पूर्वपदावर आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत.

यंदा स्वातंत्र्यदिनी पक्षाचे सर्व मंत्री, महाविकास आघाडीतील सर्व पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी मिळून, एक एल्गार करुया... राज्याला कोरोनामुक्त करण्याचा निर्धार करुया. आपल्या सर्वांचे पुनःश्च अभिनंदन. स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

■■■

Best

Compliments

# राष्ट्रवादीत परत येणाऱ्यांसाठी दरवाजे खुले

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे राष्ट्रवादी मासिक मुलाखतीतील उद्गार

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २१ वा वर्धापनदिन नुकताच संपन्न झाला. १० जून १९९९ रोजी मा. शरद पवार साहेब, मा. पी. अे. संगमा आणि श्री. तारिक अन्वर या तिघांनी एकत्र येऊन मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली होती. याला आता २१ वर्षे पूर्ण होऊन पक्षाने २२ व्या वर्षांत पदार्पण केले आहे. मागील २१ वर्षांत अनेक चांगले-वाईट प्रसंग घडले आहेत. त्या सर्वांमधून पक्ष तावून सुलाखून निघाला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक श्री. शरद पवार साहेब यांना मानणारा व त्यांच्या विचारांवर गाढ श्रद्धा असणारा फार मोठा वर्ग या देशात आहे. त्यांचा जवळपास ५५ वर्षांचा राजकीय-सामाजिक जीवनातला प्रदीर्घ अनुभव पक्षाला व आम्हांला निश्चित उपयोगी पडतो आहे. राष्ट्रहिताचा व देश उभारणीचा ते प्रथम विचार करतात. त्यामुळे त्यांच्या विचार व चिंतनाला नेहमीच एक वेगळी खोली व धार असते. अशा



मार्गदर्शनामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा संख्येने लहान असला तरी देशातील सर्व राजकीय पक्षांना पवारसाहेब आणि त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एखाद्या प्रश्नावर काय भूमिका घेतो व कसा विचार करतो हे जाणून घेण्यात मोठे औत्स्युक्य असते. किंबहुना आता देशातील सर्व विरोधी पक्ष मोठ्या आशेने पवार साहेबांकडे पाहात असून त्यांनी देशातील सर्व विरोधी पक्षांना संघटित करून त्यांचे नेतृत्व करावे व भाजपला समर्थ पर्यायी विरोधी पक्ष देशात उभा करावा अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत. देशातील कोरोनाचे संकट संपल्यानंतर पवारसाहेब या कामात लक्ष घालतील अशी आम्ही अपेक्षा करतो.

मध्यंतरी विविध कारणांनी अनेक नेते व कार्यकर्ते पक्षापासून लांब गेले, दुरावले. विपरीत परिस्थितीत काहींनी विपरीत निर्णय घेतले. नंतर त्यांना निर्णयाचा पश्चात्ताप झाला व फेरविचार करावा असे वाटू लागले. त्याबाबत ते आमच्याशी



बोलून भावना व्यक्त करू लागले. त्यामुळे पक्षानेही मोठ्या मनाने बाहेर गेलेल्यांना पुन्हा पक्षात यायचे असेल तर दारे उघडी ठेवली आहेत. पक्ष संघटना वाढत असताना मतमतांतरे होऊ शकतात. काही वेळा किरकोळ मतभेद आणि गैरसमजातूनही पक्षांतराचा निर्णय होऊ शकतो. तथापि पवार साहेबांच्या विचारांवर व कार्यावर श्रद्धा असणारी असंख्य मंडळी आहेत. त्यांनी अनेक वर्षे पवार साहेबांबरोबर काम करून त्यांना साथ दिली आहे. पक्ष वाढविण्यास हातभार लावलेला आहे. परंतु मागील दोन वर्षात ज्यांची मने विचलीत झाली होती, अशा अनेकांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात येण्याची इच्छा व्यक्त केली आहे. भाजपचे खरे रूप त्यांना आता कळून चुकले आहे. त्यामुळे झालेली चूक ते पुन्हा दुरुस्त करू इच्छितात. पक्ष नेतृत्वानेही त्यांची चूक पोटात घालून त्यांना घरात घेण्याचे ठरविले आहे. पक्ष सोडून गेलेल्यांमधील बहुसंख्य लोकांना सामावून घेण्याची भूमिका मा. पवार साहेबांशी चर्चा व विचार विनीमय करून पार पाडली जाईल. याबाबतचा त्यांचा निर्णय अंतिम असेल. मा. पवार साहेबांनी कायम बेरजेचे राजकारण केले. त्यांचा राजकारणापेक्षा समाजकारणावर अधिक भर आहे. त्यामुळेच त्यांनी पक्षाच्या कामाचे सूत्र ठरविताना ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण असेच ठरवून ते धोरण अंमलात आणित आहेत.

कोरोना कोविड १९ च्या संकटामुळे विकासाची प्रक्रिया थोडी मंदावलेली असली तरी जीवनमान सुरू असल्यामुळे अनेक प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांची सोडवणूक करावीच लागते. सरकारच्या तिजोरीत येणारे उत्पन्न घटलेले असल्यामुळे सरकारच्या खर्चावर मर्यादा आल्या आहेत. लोकांच्या अपेक्षा मात्र खूप वाढलेल्या आहेत. त्या सर्व पूर्ण करणे ही फार अवघड गोष्ट आहे. कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असते तरी त्याची हीच अवस्था झाली असती. त्यामुळे कार्यकर्ते आणि जनता या दोघांनीही थोडा संयम ठेवून वागले पाहिजे व प्राधान्याने एकजुटीने कोरोना संकटाचा सामना केला पाहिजे. आणखीन काही काळ तरी या कोरोनासोबत आपल्याला राहावे लागेल असे चित्र दिसते आहे. महाआघाडीचे सरकार हे तीन पक्षांचे असल्यामुळे आपल्या कार्यकर्त्यांनी देखील उर्वरीत मित्र पक्षाच्या कार्यकर्त्यांना सामावून घेतले पाहिजे व त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवले पाहिजेत.



**अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी पट्टा असलेल्या कर्जत जामखेड भागाच्या पाणीप्रश्नाबाबत जलसंपदा मंत्री ना. जयंत पाटील यांनी मंत्रालयात आढावा बैठक घेऊन पाण्याच्या नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी स्थानिक आमदार रोहीत पवार देखील उपस्थित होते.**



**सातारा जिल्ह्याचे वैद्यकीय आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या सातारा मेडिकल कॉलेजच्या जागेचा प्रश्न जलसंपदा मंत्री ना. जयंत पाटील यांनी निकाली काढला असून नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला ६० एकर जागा हस्तांतरित करण्याची तत्वता मान्यता त्यांनी दिली आहे. या निर्णयाबद्दल खा. श्रीनिवास पाटील यांनी जलसंपदा मंत्र्यांचे आभार मानले, त्यावेळी शेजारी आमदार शशिकांत शिंदे.**

घंटाकर्ण




# सुब्रह्मण्यन स्वामींचे बदलते रंग?

अयोध्येत राम मंदिर उभारणीचा भूमिपूजन समारंभ होण्यापूर्वीच भाजपचे नेते आणि राज्यसभेचे सदस्य सुब्रह्मण्यन स्वामी यांनी आपल्याच पक्षावर नव्हे तर देशाचे(खरंतर विश्वाचे), पक्षाचे सर्वोच्च, सर्वशक्तिमान नेते जे भारताचे पंतप्रधानही आहेत त्यांच्याच विरोधात हल्लाबोल केला आहे.

राममंदिर भूमिपूजन सोहळा पंतप्रधानांच्या हस्ते होण्याला स्वामी यांनी तीव्र हरकत घेतली. त्यांनी एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना स्पष्ट सांगितले की अयोध्या प्रकरण आणि राममंदिर मुद्यात पंतप्रधानांचे काही योगदान नाही आणि त्यामुळे त्यांना भूमिपूजन करण्याचा कोणताही अधिकार नाही.

स्वामी यांनी आणखी बाँब टाकताना म्हटले की यासंदर्भात खरे योगदान आहे ते राजीव गांधी, पी.व्ही.नरसिंह राव आणि अशोक सिंघल यांचे! या तिघांमुळे आजचा हा दिवस पाहण्यास मिळत आहे.

राजीव व नरसिंह राव हे तर काँग्रेसचे पंतप्रधान होते व अशोक सिंघल हे विश्व हिंदू परिषदेचे प्रमुख होते.







स्वामी केवळ एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी राममंदिराच्या विलंबाला भाजपचेच पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयींना देखील दोषी मानले. वाजपेयींनी राममंदिर उभारणीत 'अडंगे' घातले असा धडधडीत आरोपच त्यांनी केला. हा आरोप करताना त्यांनी दिवंगत अशोक सिंघल यांचा हवाला दिला. सिंघल यांनीच आपल्याला





ही माहिती दिल्याचे त्यांनी सांगितले. आता शहनिशा करायची कशी? कुणाकडे करायची?

पंतप्रधानांना भूमिपूजनाचा अधिकार नाही हे त्यांचे म्हणणे असले तरी त्यांच्याऐवजी कुणाच्या हस्ते हा समारंभ झाला पाहिजे हे काही स्वामींनी सांगितले नाही. त्यांनी ज्या तीन नेत्यांची नावे घेतली ते तिघेही आज हयात नाहीत. लालकृष्ण अडवानी व मुरलीमनोहर जोशी यांना त्यांच्या वयामुळे तेथे हजर राहणे अशक्य आहे. उमा भारती याही यात सक्रिय होत्या परंतु त्यांनी काहीशा उपहासाने म्हटले आहे, 'ज्याप्रमाणे सर्व नद्या सागरात जाऊन विलीन होतात त्याचप्रमाणे देशाच्या पंतप्रधानांनी भूमिपूजन करणे याचा अर्थ त्यामध्ये आम्हा सर्वांचाच सहभाग गृहीतच धरावा लागेल व त्यामुळेच मला तेथे हजर राहण्याची आवश्यकता वाटत नाही व मी त्या समारंभात सहभागी होणार नाही.'






स्वामींच्या आणखी एका सूचक हालचालीचीही दखल घ्यावी लागेल. सोनिया गांधी यांच्या शैक्षणिक पात्रते संदर्भात त्यांनी जी तक्रार संसद आणि निवडणूक आयोगाकडे केली होती ती त्यांनी परत मागे घेतली आहे. स्वामींची गांधी कुटुंबाबद्दलची भूमिका सौम्य होणे हे काही फारसे सुचिन्ह नाही.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारचा पाठिंबा जयललिता यांनी काढून घ्यावा यासाठी स्वामींनी प्रयत्न केले होते आणि त्यांनीच जयललिता व सोनिया गांधी यांची भेटही घडवून आणली होती. यानंतर वाजपेयी सरकार पडले.

आताचे सरकार कुणाच्या पाठिंब्यावर अवलंबून नाही. त्यामुळे स्वामी कोणता नवा खेळ खेळू इच्छितात याकडे लक्ष ठेवावे लागेल.

एकंदरीतच जे चित्र समोर येत आहे त्यानुसार राममंदिर उभारणीच्या प्रारंभाचा हा समारंभ गुण्यागोविंदाने होताना आढळत नाहीये. संघ परिवारातच यावरुन जुंपल्यासारखे वाटू लागले आहे.

बघू या प्रभु रामचंद्र या सरकारला पावतात काय?

तोपर्यंत जय श्रीराम!!!!!!!!!!!




# खोट्या शैक्षणिक पात्रतेचे वाढते घोटाळे?

वर्तमान सरकार आणि शिक्षण व विशेषतः शैक्षणिक पदव्या यांचे काहीतरी वाकडे असावे असे वाटायला लागले आहे. २०१४ मध्ये हे सरकार प्रथम सत्तेत आले तेव्हा शिक्षण खाते ज्या महिला नेत्याकडे देण्यात आले होते त्यांच्या शैक्षणिक पात्रतेवरुनच गोंधळ सुरु झाला आणि अद्याप तो शमलेला नाही.

खुद्द पंतप्रधानांच्या पदवीबद्दलचा गोंधळ कायमच आहे.

काँग्रेसच्या बाजूकडे पाहिले तर सोनिया गांधी यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत काहीकाळ शंका उत्पन्न झाल्या होत्या पण त्यांचे निराकरण झाले.

आता भाजपचे एक आघाडीचे खासदार - लोकसभा सदस्य व प्रभावी वक्ते निशिकांत दुबे यांच्या 'एमबीए' पदवीबाबत वाद सुरु झाला आहे.

दुबे यांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेमध्ये दिल्ली विद्यापीठातून त्यांनी एमबीएची पदवी घेतल्याचे नमूद केले आहे. दुबे हे झारखंडमधील गोड्डा या मतदारसंघातून सतत निवडून आलेले आहेत. माहिती अधिकारविषयक एका कार्यकर्त्याने त्यांची पदवी खोटी असल्याचा दावा करुन पोलिसात तक्रार केली होती. झारखंडमध्ये सध्या बिगर भाजपचे आणि भाजपच्या विरोधातील झारखंड मुक्ति मोर्च्याचे सरकार सत्तारूढ आहे. त्यांनीही तत्काळ या प्रकरणाच्या सीआयडीतर्फे चौकशीचे आदेश दिले.




सीआयडीने दिल्ली विद्यापीठाकडून मिळविलेल्या माहितीत दुबे यांच्या माहितीला पुष्टि मिळू शकली नाही.

दुबे यांनी 1993मध्ये ही पदवी मिळाल्याचे म्हटलेले आहे. परंतु दिल्ली विद्यापीठाने या काळात निशिकांत दुबे या

नावाच्या व्यक्तीला पदवी दिली नसल्याची माहिती दिली.

ही माहिती मिळताच खुद्द मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीच या प्रकरणी ट्वीट करुन त्याची माहिती जाहीर केली.

या प्रकरणाने भाजपमध्ये चिडचिड होणे स्वाभाविक आहे.

परंतु मूळ मुद्दा राहतोच की दुबे यांच्या पदवीच्या खरेखोटेपणाचे काय?

ती खरी आहे की बनावट?

उत्तर कोण देणार?

# गृहमंत्र्यांना करोना

द्वितीय पोलादी पुरुष व सर्वशक्तिमान गृहमंत्री अमित शहा यांना करोनाची बाधा झाली. त्यांनी स्वतःच ट्वीट करुन ही माहिती जाहीर केली. यानंतर ते स्वतःच रुग्णालयात दाखलही झाले.

अमितभाई कोणत्या रुग्णालयात दाखल झाले याबाबत सुरुवातीला उलटसुलट माहिती येत होती.

आधी कळले की ते सरकारीच म्हणजे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेत (एम्स) दाखल झाले.

परंतु मागाहून खुलासा झाला की ते गुडगांवच्या मेदांता रुग्णालयात दाखल झाले आहेत. राजकीय नेत्यांमध्ये हे रुग्णालय विलक्षण लोकप्रिय आहे.

येथे सर्व सोयी पंचतारांकित व अत्याधुनिक असल्याचे सांगितले जाते.

भाजपच नव्हे तर इतर पक्षांचे नेते देखील हे रुग्णालय पसंत करताना आढळतात.




काहीच दिवसांपूर्वी भाजपचे वाचाळ व बोलघेवडे प्रवक्ते संबित पात्रा यांनाही करोनाची बाधा झाल्यानंतर तेही याच रुग्णालयात दाखल झाले होते.

हे रुग्णालय लोकप्रिय आहे खरे! अगदी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे देखील एकदा याच रुग्णालयात दाखल झाले होते आणि तेथील उपचार त्यांनी घेतले होते. परंतु अचानक अमितभाईंच्या या करोना लागणीचे रहस्य काय?


राजकीय वर्तुळात याचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत.

अयोध्येत राम मंदिर उभारणी समारंभात अमितभाईपण जाणार होते. परंतु व्यासपीठावर केवळ पाचच लोकांना स्थान देण्याचे ठरले होते. पंतप्रधान, राज्यपाल(आनंदीबेन पटेल), मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, रा.स्व.संघ सरसंघचालक मोहन भागवत आणि राममंदिर ट्रस्टचे अध्यक्ष. यात अमितभाईंना कसे 'ॲडजस्ट' करणार?

ते होत नसल्याने त्यांना करोना झाला असावा अशी कानोकानी आलेली चर्चा आहे.

खरे खोटे 'राम जाने!'



# करोनाप्रमाणेच 'व्हर्च्युअल'ची वाढती साथ?




या देशात टीव्हीने एक गोष्ट निश्चितपणे आणली!

कोणती?

टीव्ही कॅमेऱ्यांच्या सुळसुळाटामुळे टीव्हीवर आपल्या छबीचे दर्शन झळकविण्याची हौस समाजात वेगाने पसरलेली दिसते. आनंदी किंवा सुखद प्रसंगांचे प्रदर्शन होणे हे एकवेळ समजण्यासारखे आहे. परंतु आता दुःखाचे देखील जाहीर प्रदर्शन सुरु झाले आहे. त्यातून सहानुभूतीची प्राप्ती होतेच परंतु राजकीय हेतु देखील सिध्दीस जाणे शक्य होते.

लॉकडाऊनपासून या 'व्हर्च्युअल' सभा-बैठकांची साथ सुरु झाली.

या राष्ट्रीय कार्यक्रमाचे नेतृत्व अर्थातच ब्रह्मांडनायकांकडेच होते.

त्यांनी 'व्हर्च्युअल' बैठकांचा असा काही सपाटा लावला की बस्स! 'व्हर्च्युअल'चा अर्थ 'आभासी' असा आहे. कारण मनुष्य समोर दिसतो, तो बोलतो आणि संभाषण व विचारांचे आदानप्रदान होत राहते पण शरीराने फक्त दूरत्व असते.

त्याला 'आभासी' म्हणतात.




या आभासी मायाजालात देश सध्या पूर्ण अडकलेला आहे.

जो उठतो तो व्हर्च्युअल बैठका करु लागला आहे. हे पेव असे फुटले आहे उठसूट तुम्हाला कुणीतरी कळवतो की अमुक वाजता व्हर्च्युअल म्हणजेच झूम किंवा तत्सम माध्यमातून परिसंवाद - सेमिनार घेतला जाणार आहे. आता या 'सेमिनार'चे रुपांतर 'वेबिनार' मध्ये झाले आहे.

अनेक केंद्रीय मंत्री आता या माध्यमाचा सर्रास वापर करु लागले आहेत.

करोनाचा विषय सर्वव्यापी असल्याने अनेक खात्याचे मंत्री हे त्यांच्या खात्याच्या राज्यांमधील मंत्र्यांबरोबर आभासी बैठका करुन परिस्थितीचा आढावा घेत असल्याचा एक परिपाठच होऊन बसला आहे.

या मालिकेत लोकसभा आणि राज्यसभेचे मुख्य पीठासीन अधिकारीही पिछाडीवर नाहीत.

लोकसभा अध्यक्षांनी राज्यांच्या विधानसभा अध्यक्षांबरोबर आभासी संपर्क साधून परिषद घेतली आणि राज्याराज्यांमधील करोना साथीच्या संदर्भातील ताजी माहिती घेतली.

राज्यसभेचे सभापति व उपराष्ट्रपति वैंकय्या नायडू यांनी या माध्यमाचा फारच अभिनव उपयोग केला. त्यांनी या माध्यमातून राज्यसभेच्या सर्व सदस्यांशी आभासी संपर्क साधून त्यांची व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची विचारपूस केली.

एवढेच नव्हे तर त्यांनी आजी-माजी राष्ट्रपति, माजी पंतप्रधानांबरोबरही संपर्क साधून त्यांच्या आरोग्याची चौकशी केली.

या मालिकेत त्यांनी प्रणव मुखर्जी, प्रतिभा पाटील या माजी राष्ट्रपतींची तर एच.डी.देवेगौडा आणि मनमोहनसिंग या






माजी पंतप्रधानांशी संपर्क केला. विद्यमान राष्ट्रपति व पंतप्रधानांच्या प्रकृतीचीही त्यांनी चौकशी केली.

अनेक मंत्री आपापल्या मतदारसंघात किंवा राज्यात जातात आणि



तेथून मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांबरोबर आभासी संपर्क करुन आदेश देतात आणि आभासी बैठकाही करीत असतात.

यामुळे अधिकारीवर्ग व कर्मचारीवर्ग यांना बऱ्याच अडचणीही येत असल्याचे कळते आणि ते काहीसे वैतागूनही गेलेले आढळतात. कधी एकदा करोनावर नियंत्रण मिळेल आणि पुन्हा एकदा समोरासमोरच्या व प्रत्यक्ष स्वरुपाच्या भेटी व बैठका सुरु होतील असे ते बोलू लागले आहेत. काही मंत्री तर सुटीच्या दिवशी देखील अशा बैठका घेत असल्याची माहिती मिळते.






यामुळे नोकरशाहीला अक्षरशः चोवीस तास व सातही दिवस काट्यावर उभे रहावे लागत असल्याचे चित्र आहे. कुणी हरकतही घेत नाही कारण सध्या नोकरीची शाश्वतीही उरलेली नाही आणि विनाकारण राग ओढवून घेण्याची कुणाची तयारी नाही.

पण मंडळी वैतागली आहेत खरी!

करणार काय?

आलिया भोगासी????????

......... असावे सादर!

## बाबूंच्या अडचणीत अडचणी की हो?

सहज जाता जाता कानावर आलेली ही चिडचिड!

करोनामुळे सर्व मंत्रालये, सरकारी कार्यालये यामधील प्रवेशावर अनेक प्रतिबंध - निर्बंध आले आहेत.

कुणालाही सहजासहजी प्रवेश मिळणे अशक्य झाले आहे. कामाखेरीज कुणालाच प्रवेश दिला जात नाही अशी स्थिती आहे. लॉकडाऊन उठविल्यानंतरही सरकारी कार्यालये व मंत्रालयात म्हणावी तशी उपस्थिती नाही. ज्यांना घरुनच काम करणे शक्य आहे त्यांना तशी मुभा देण्यात आलेली आहे.

पण.....................!

या प्रतिबंध-निर्बंधांच्या चक्रात या सर्व मंडळींची फारच मोठी अडचण होऊन बसली आहे. कानोकानी आलेल्या खबरीनुसार पूर्वीप्रमाणेच कामांसाठी लोकांचा राबता एकदमच कमी झाल्याने अगदी दारवान, प्रवेशद्वारावरील शिपायापासून अगदी वरपर्यंतच्या मंडळींना कामाला येणाऱ्यांचे प्रेम व लोभ पूर्वीसारखा मिळेनासा झाला आहे. करोनामुळे एकमेकाला भेटणेही दुरापास्त झाले आहे. शारीरिक दूरीकरणाच्या निकषामुळे तर गाठीभेटी आणि त्यातून होणाऱ्या देवाणघेवाणीला देखील अगदी पार मुकावे लागते आहे.

अशा या कोंडीत सापडलेली भारतीय बाबूशाही आता करोना आणि त्यातून येणारे निर्बंध यांना आता पार वैतगून गेली आहे. कधी एकदा पुन्हा लोकांचा राबता सुरु होतोय आणि त्याबरोबर ते घेऊन येणाऱ्या प्रेमाचा लाभ मिळतोय यासाठीच्या त्यांच्या आतुरतेने तीव्रतेची परिसीमा गाठली आहे. जय हो!




## अपशकुनच अपशकुन!

राजधानी दिल्लीत पाऊस कमीच पडतो.

पण कधीकधी पडला तर झंझावातासारखा पडतो.

मग काय?

रस्त्यांवरील झाडे पडणे ही नित्याचीच बाब!

रस्त्यावर पाणी तुंबणे, वाहनांची कोंडी, वाहने बंद पडणे अशा सर्व गोष्टी होतात.

नवी दिल्ली स्टेशनात गाडी(मुंबईहून आलेली) शिरण्यापूर्वी एक पूल लागतो.

त्या पुलाचे मूळ नाव 'मिंटो ब्रिज' पण तेथे छत्रपतींचा पुतळा उभारण्यात आल्यानंतर त्यास 'शिवाजी पूल' म्हणून संबोधले जाते. परंतु सवयीचा भाग म्हणून अद्याप लोकं त्याला 'मिंटो ब्रिज'च म्हणतात.

तर दिल्लीत जोरदार पाऊस झाला रे झाला की या पुलाखाली असलेल्या खोलगट भागात पाणी साठायला सुरुवात होते.

तासाभराच्या पावसाने तेथे पुलाखालील कमानी पाण्याने पार भरुन जातात.

इतक्या की त्यात स्थानिक डीटीसीची बस पूर्ण बुडून जाते.

अलीकडेच झालेल्या अशा जोरदार पावसात तेथे पाणी साचले आणि एक



रिक्षेवाला त्यात अडकला व त्यास प्राण गमवावा लागला.

हा पूल दोन कमानींचाच व लहानसा आहे आणि 1933 मध्ये बांधण्यात आला.

दिल्लीतील स्थानिक माणसांच्या बोलण्यानुसार त्यांच्या आठवणीप्रमाणे 1950 पासूनच या पुलाखाली पाणी तुंबण्याचे प्रकार सुरु झाले आणि ते आजतायागायत सुरु आहेत.

पण केवळ पाणी तुंबण्याचीच दिल्लीला सवय आहे असे नाही.

दिल्लीत बघताबघता पावसात रस्ते खचण्याचे प्रकारही नित्य होतात. पूर्वी प्रमाण अधिक होते आणि आता ते तुलनेने कमी झाले आहेत.

परंतु नुकत्याच झालेल्या पावसात तर कहरच झाला की हो ?



जगातला सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचे कार्यालय जेथे होते (खरे तर अजुनही आहे पण त्याचा वापर मर्यादित करण्यात आला आहे) त्या अशोक रोडवरच रस्ता खचून हा भलामोठा खड्डा पडला.

तोही नेमका भाजपचे नुकतेच निवृत्त झालेले राज्यसभा सदस्य व दिल्ली भाजपचे बडे नेते विजय गोयल यांच्या घरासमोरच पडला.

या अशोक रोडचे वैशिष्ट्य म्हणजे भाजपच्या या कार्यालयाच्या आसपास असलेले सर्व बंगले हे भाजपच्या नेत्यांकडेच आहेत. विजय गोयल आहेत. विनय सहस्रबुध्दे आहेत. गृहराज्यमंत्री किशन रेड्डी आहेत अशी इतरही नावे आहेत.

त्यामुळे हा अशोक रोडचा भाग 'भाजप रोड' म्हणूनच मानला जातो.

या खड्ड्यामुळे या रस्त्यावरची वाहतूक पूर्ण बंद करण्यात आली आहे. त्यामुळे कॅनॉट प्लेस किंवा त्या परिसरात जाणाऱ्यांना लांबचा वळसा मारावा लागत आहे.


परंतु देशाचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वशक्तिमान नेते व द्वितीय पोलादी पुरुष आणि गृहमंत्री अमित शहा कृष्ण मेनन मार्गावरील ज्या बंगल्यात राहतात त्या बंगल्याकडे जाणारे काही मार्ग व खुद्द कृष्ण मेनन मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सुमारे वर्ष होऊनही हा रस्ता चालू करण्यात आलेला नाही.

या रस्त्यावरुन जाणाऱ्या बसेसचे मार्गही बदलण्यात आले आहेत. त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत व बंदोबस्तात अतोनात वाढ करण्यात आली आहे.

का कुणास ठाऊक ?

परंतु एकेकाळी याच कृष्ण मेनन मार्गावर जॉर्ज फर्नांडिस रहात असत.

सुरक्षा या प्रकाराची त्यांना केवळ ॲलर्जीच नव्हती तर तिरस्कार होता.



त्यांचा एक आवडता सिध्दांत होता व तो त्यांनी एकदा संसदेत बोलताना उच्चारलाही होता....! ते म्हणाले, 'ज्या नेत्यांना स्वतःच्या जिवाचे एवढे भय वाटते आणि त्यासाठी ते एवढी प्रचंड सुरक्षितता घेतात ज्यामुळे सामान्य लोकांना त्रास होतो अशा नेत्यांसाठी एकच सुरक्षित जागा आहे................ आणि ती म्हणजे 'तिहार जेल!' संतापून बोलताना त्यांनी अशा सर्व नेत्यांची रवानगी तिहारला करावी असे भर सभागृहात सांगून गोंधळ उडवून दिला होता.

पण मंडळी काळ बदलला आहे, सावध रहायचे दिवस आलेत!

■■■

# राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून सव्वा लाख फेसशिल्डचे डॉक्टर्स, नर्सेस, आशा वर्कर्स, वॉर्ड बाईज् यांना वाटप




**नीरज महांकाळ यांजकडून**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशातील ज्येष्ठ राजकीय नेते मा. श्री. शरद पवार यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून महाराष्ट्र राज्यातील डॉक्टर्स, आशा वर्कर्स, सिव्हील हॉस्पिटलमधील नर्सेस आणि वॉर्ड बॉय या सर्वांना मिळून सव्वा लाख फेसशिल्डचे मोफत वाटप करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय नर्स दिवसानिमित्त राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून ६७ हजार आशा वर्कर्स, ९ हजार नर्सेस आणि वॉर्ड बॉईज यांना फेसशिल्डचे वाटप करण्यात आले. ट्रस्टमधून वाटण्यात आलेल्या या फेसशिल्ड प्रकल्पाचे समन्वयक म्हणून पक्षाचे खजिनदार हेमन्त टकले यांनी काम पाहिले. या फेसशिल्डचे उत्पादन आणि वितरणाचे काम तेज टकले आणि संजय बोरगे यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या जिल्ह्यातील सर्व डॉक्टरांपर्यंत ही फेसशिल्ड पोहोचविण्यात आली.

सव्वा लाख फेसशिल्ड वितरणाचे काम इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स, इएनटी असोसिएशन आणि इतर संघटनामार्फत करण्यात आले. कोरोना कोविड १९ या संकटाशी सामना करत असलेल्या ५० हजारहून अधिक डॉक्टरांना मदत म्हणून ही फेसशिल्ड देण्यात आली.

जिल्हानिहाय फेसशिल्डचे जे वाटप करण्यात आले त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे :

बीड : ४४३०, लातूर : ४४००, उस्मानाबाद : १४५०, जालना : १०००, हिंगोली ४००, परभणी १३००, औरंगाबाद ६१००, बुलढाणा १४००, अकोला ३५५०, अमरावती २३५०, वाशिम १०५०, यवतमाळ २७००, वर्धा २१५०, नागपूर





१०३५०, भंडारा ७००, गोंदिया ५००, गडचिरोली १५०, चंद्रपूर १४५०, पुणे १५४००, पिंपरी-चिंचवड १५५०, सातारा २३००, सांगली, ४७००, कोल्हापूर २५००, सोलापूर ४२००, एकूण १,२५,०००.

## राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या वतीने पोलिस बांधवांना सॅनिटायजर स्टॅण्डचे वाटप

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २२ व्या स्थापना दिनानिमित्त पश्चिम महाराष्ट्र युवती काँग्रेसच्या वतीने पोलिस बांधवांना सॅनिटायजर स्टॅण्ड आणि सॅनिटायजरचे वाटप करण्यात आले. स्वारगेट पोलिस दवाखाना येथे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विकास वडगावे, स्वारगेट पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संजय रसाळे, विश्रांतीवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस अधिकारी अरुण आव्हाड, पोलिस उपायुक्तालय परिमंडळ-४ येरवडा येथील डीसीपी पंकज देशमुख, पर्वती पोलिस चौकीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शंकर सलगर यांच्याकडे सॅनिटायजर स्टॅण्ड सुपूर्द करण्यात आले.

## औरंगाबादमधील डॉक्टरांना फेसशिल्डचे वाटप

औरंगाबाद : राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी नुकतीच औरंगाबाद येथे कोरोना संकटाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली होती. या बैठकीनंतर राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमार्फत औरंगाबाद जिल्ह्यातील डॉक्टर, नर्सेस, वॉर्ड बॉईज यांना फेसशिल्डचे वाटप करण्यात आले. फेसशिल्डचा बॉक्स डॉक्टरांना प्रदान करताना आरोग्यमंत्री राजेश टोपे, उद्योगमंत्री सुभाष देसाई, खा. इम्तियाज जलिल, मा. शरद पवार व इतर मान्यवर.





# औरंगाबाद जिल्ह्यातील कोरोना प्रादुर्भाव आढावा बैठक



# केंद्राने दिलेली मदत अजून राज्यात आलेली दिसत नाही- शरद पवार

औरंगाबाद दि. २५ जुलै – केंद्राने दिलेली मदत अजून राज्यात आलेली दिसत नाही असे सांगतानाच आता उद्योगधंदा कसा सुरू होईल याकडे लक्ष द्यायला हवे. जसा आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे तसाच राज्याचा आर्थिक प्रश्नही महत्त्वाचा असून राज्याची आर्थिक बाजू बळकट करण्यासाठी औद्योगिक क्षेत्र सुरू करण्याचा आमचा प्रयत्न असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दिली.

औरंगाबाद जिल्ह्यातील कोरोना प्रादुर्भावाचा पालकमंत्री सुभाष देसाई व आरोग्यमंत्री राजेश टोपे आणि जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शरद पवार यांनी आढावा घेतला. कोरोना संकटावर मात करायची तर सर्वांनी एकत्र लढले पाहिजे. देशातील साधारण पाच-सहा राज्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढलेला दिसत आहे त्यापैकी महाराष्ट्र राज्य महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, कल्याण, डोंबिवली, औरंगाबाद या भागातील परिस्थिती काळजी करण्यासारखी आहे असेही शरद पवार म्हणाले.

कोरोना लॉकडाऊन काळात स्थानिक लोकांनी अनेक सण साधेपणाने साजरे करून सर्व समाजाला एक उत्तम उदाहरण दिले आहे. प्रादुर्भावाचा डबलिंग रेट हा १४ दिवसावरून ३० दिवसावर जाणे ही मोठी गोष्ट आहे. त्यामुळे इथली परिस्थिती सुधारण्यासाठी स्थानिकांची नक्कीच मदत मिळेल असा विश्वासही शरद पवार यांनी व्यक्त केला.



कोरोना संकटावर मात करण्यासाठी डॉक्टर, जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, लोकप्रतिनिधी इतकेच नाही तर खुद्द मुख्यमंत्र्यांनीही यात जबाबदारीने लक्ष घातले आहे. मात्र लोकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. ज्या सूचना सरकार करत आहे त्याचे काटेकोर पालन जनतेकडून होताना दिसत आहे अशा शब्दात जनतेचे कौतुकही शरद पवार यांनी केले.

खासगी डॉक्टर रुग्णसेवा देण्यासाठी पुढे येत नाहीत. त्यासाठी जिल्ह्याच्या यंत्रणेला डिझॅस्टर मॅनेजमेंट कायदा आहे त्यातील अधिकारांचा वापर करून खासगी डॉक्टरांना समन्स पाठवण्याचा विचार करावा लागेल अशी शक्यता शरद पवार यांनी व्यक्त केली.


मालेगाव, धारावीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. जे सहकार्य तिथल्या लोकांनी केले तसेच सहकार्य औरंगाबाद शहरातील जनताही करेल आणि संकटावर मात करेल अशी खात्री शरद पवार यांनी व्यक्त केली.



## नाशिक जिल्ह्यातील कोरोना प्रादुर्भाव आढावा बैठक

# राज्यात टेस्टिंग वाढवल्याने कोरोना रुग्णसंख्येत वाढ- शरद पवार

नाशिक दि. २४ जुलै - राज्यात टेस्टिंग वाढवल्याने कोरोना रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. रुग्णांसाठी बेड्सची संख्या वाढवण्याच्यादृष्टीने आरोग्य खात्याकडून पुढील काही दिवसात महत्त्वपूर्ण पावले टाकण्यात येतील. त्यासाठी एक यंत्रणा तयार करण्यात आली आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार हे नाशिक दौऱ्यावर गेले होते. तेव्हा त्यांनी कोरोना पार्श्वभूमीवर नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. नाशिकमधील वाढत्या कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर नियोजन भवन, नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील कोरोना उपाययोजनांचा आढावा शरद पवार यांनी घेतला. तसेच त्यानंतर स्थानिक पत्रकारांशी संवादही साधला. भारतात सध्या महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली आणि कर्नाटक या राज्यात रुग्णसंख्या वाढली आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास मुंबई, ठाणे, पुणे, कल्याण, डोंबिवली, नाशिक, सोलापूर, अकोला याठिकाणी कोरोनाबाधितांची संख्या वाढत आहे. त्यातही मुंबई येथील स्थिती अधिक वाईट आहे. अनेक तज्ज्ञांनी आपल्याला येत्या काळात कोरोनासोबत जगावे लागेल, असे मत व्यक्त केले आहे. राज्यातील ज्या जिल्ह्यात कोरोनाचे रुग्ण वाढत आहेत त्या जिल्ह्यांतील सर्व प्रमुखांची बैठक घेऊन, समस्या जाणून त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मागील काही महिने कोरोनाशी लढण्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेऊन त्याचा अहवाल मुख्यमंत्र्यांना द्यावा हा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने आज नाशिक जिल्हा आढावा बैठक घेण्यात आल्याचे शरद पवार म्हणाले. राज्याचे आरोग्य विद्यापीठ नाशिकमध्ये आहे. पण तेथील डॉक्टर रुग्णसेवा देण्यासाठी पुढे येत नाहीत असे करून चालणार नाही.जिल्ह्याच्या यंत्रणेला डिझास्टर मॅनेजमेंट कायद्यानुसार डॉक्टरांवर अधिकारांचा वापर करावा लागू नये ही सरकारची भूमिका आहे. पण वेळ आल्यास तशी सक्ती करण्याची गरज भासू शकते असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. शरद पवार यांनी नाशिक जिल्ह्यातील गरजू कोरोना रुग्णांसाठी रेमडेसिव्हिर या महागड्या औषधांची उपलब्धता करून ५० औषधे जिल्हाधिकाऱ्यांच्या सुपूर्द केली. याआधी देखील २५ औषधे देण्यात आली होती तसेच गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी नेहमीच पुढाकार घेण्याचे आश्वासन शरद पवार यांनी दिले. आरोग्याप्रमाणे आर्थिक संकटदेखील मोठे आहे. राज्यात नामांकित औद्योगिक केंद्रे आहेत. ही केंद्रे सुरू करून महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती कशी सुधारता येईल याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे असेही शरद पवार यांनी सांगितले. स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा असे आवाहनही जिल्हा प्रशासनाला केले. मात्र कोरोना रुग्णसंख्या वाढेल अशी भूमिका कोणी घेऊ नये. आतापर्यंत विशेषतः महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाने बासी ईद, रमजान ईदच्या वेळेस अतिशय समंजसपणाची भूमिका घेतली. याचे उत्तम उदाहरण मालेगाव आहे. त्यामुळे असेच सहकार्य यापुढेही असेल असा विश्वासही शरद पवार यांनी व्यक्त केला.



मा. शरद पवार, छगन भुजबळ आणि राजेश टोपे यांच्या उपस्थितीत नाशिक येथे राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून डॉक्टरांना फेसशिल्डचे वाटप करण्यात आले.




# कोविड काळात राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे बाधित, उपेक्षित घटक व आरोग्यसेवकांसाठी सव्वा तीन कोटींच्या मदतनिधीचे वाटप

**(हेमन्त टकले यांजकडून)**

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्र पवारसाहेब यांच्या प्रेरणेने व त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतो. यापूर्वी देशात नैसर्गिक आपत्तीच्या संकटात आम्ही अनेक राज्यांमध्ये ट्रस्टच्या मार्फत मदत केलेली आहे. गेल्यावर्षीच्या सांगली, कोल्हापूरच्या महापुरातही राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टने मदत केलेली आहे. हे कार्य सातत्याने सुरू असून अधिकाधिक गरजू लोकांपर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे व तळागाळातील गरजू व्यक्तीपर्यंत जाण्याचा ट्रस्टचा उद्देश आहे.

**कोविड लॉकडाऊन काळात राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टने साधारण देऊ केलेला मदतनिधी पुढीलप्रमाणे :**

१) कोविड लॉकडाऊन काळात तमाशातील संगीतबारीतील अनेक कलावंतांवर या कालखंडात बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. त्यामुळे त्यांना मदतीची नितांत आवश्यकता होती. म्हणून राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे ३५०० हून अधिक लोककलावंताच्या बँक खात्यामध्ये प्रत्येक रुपये ३००० इतकी रक्कम थेट जमा करण्यात आली. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे लोककलावंतांसाठी आतापर्यंत रुपये १,०६,०५,००० इतका निधी वितरित झाला आहे. या गरजू लोककलावंतांपर्यंत मदत पोहचवण्याच्या कामी सन्माननीय श्री. लक्ष्मण माने यांनी मोठेच योगदान दिले.

२) कोविड लॉकडाऊन काळात गडचिरोलीपासून सिंधुदुर्गपर्यंत अथकपणे डॉक्टर्स, परिचारिका, आशासेविका, वॉर्डबाईज हे कोविडयोद्धे कोरोना विषाणूंशी दोन हात करत होते. सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री मा. श्री. राजेश टोपे, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच राष्ट्रवादी डॉक्टर्स सेलचे अध्यक्ष मा. डॉ. नरेंद्र काळे यांच्या सहकार्याने या फ्रंटलाइनर कोविड योद्ध्यांच्या सुरक्षिततेसाठी एकूण सव्वादोन लाख फेस शील्डचे वाटप करण्यासाठी १ कोटी ४० लाख रुपयांचा निधी दिला गेला. ग्रामविकास खात्याचे मंत्रिमहोदय सन्माननीय श्री. हसन मुश्रीफ

यांनी निर्देश दिल्याने ग्रामविकास विभागाने दूरस्थ ग्रामीण भागात आरोग्यसेवेचं कार्य करणाऱ्या ६० हजार आशासेविकांपर्यंत ही फेस शील्ड पोहचवण्यात मोलाची मदत केली.

३) रंगभूमीवर बॅकस्टेजला काम करणाऱ्या रंगमंच कामगारांवरही कोविड लॉकडाऊन काळात हाताला काम नसल्याने बेरोजगारीची वेळ आली. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचाही प्रश्न निर्माण झाला. त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद व संलग्न संस्थांच्या सहकार्याने गरजू १५०० रंगमंच कामगारांपैकी आतापर्यंत १२५० हून अधिक रंगमंच कामगारांच्या बँक खात्यात प्रत्येकी रुपये २५०० प्रमाणे ३१ लाख ५० हजार रुपयांचा निधी राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे जमा करण्यात आला.

४) याच दरम्यान निसर्ग या चक्रीवादळाचा तडाखा कोंकण किनारपट्टीला बसला. या वादळात रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांतील किनाऱ्यालगतच्या गावांतील घरांचे व बागांचे अपरिमित नुकसान झाले. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे सन्माननीय खासदार मा. श्री. सुनील तटकरे व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती अदिती तटकरे यांच्या सहयोगाने आपदग्रस्त गावांमधील घरांसाठी ५० लाख रुपये किमतीचे सुमारे ५ हजार लोखंडी पत्रे व दीड हजार ढापे उपलब्ध करवून दिले गेले.

स्वयंसेवी संस्था म्हणून राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्ट आपले मदतकार्य यापुढेही करत राहणार आहे. या सगळ्या मदतकार्यात अनेक दात्यांनी राष्ट्रवादी वेल्फेअरला सढळ हस्ते मदत केली. आतापर्यंत अनेकांनी या ट्रस्टसाठी आर्थिक सहाय्य केलेले आहे. ट्रस्ट पुन्हा आवाहन करू इच्छिते की कोरोनाचं संकट खूप मोठं असल्यामुळे आणखी काम करण्यासाठी लोकांनी ट्रस्टला सढळ हस्ते अर्थसहाय्य करावे, असे आवाहन खजिनदार हेमन्त टकले यांनी केले आहे.



# चक्रीवादळात नुकसान झालेल्या कोकणातील १२ महाविदयालयांना राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने १०० संगणक वाटप

मुंबई दि.३१ जुलै– पवारसाहेबांचा पहिला आग्रह हा नुकसान झालेल्या भागातील पीडितांना मदत देण्याचा असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या कोकणातील १२ महाविद्यालयात १०० संगणक आज वाटप करण्यात आले असून हा टप्पा इथेच संपत नसून पुढील काळात देखील राष्ट्रवादी काँग्रेस वेल्फेअर ट्रस्टतर्फे अशी मदत केली जाईल अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली.

यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवत रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या ताब्यात संगणकाने भरलेला ट्रक सुपूर्द केला.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या भागात गरजू आणि अत्यंत अडचणीत असलेल्यांना मदत मिळावी म्हणून प्रा. टी.अे.शिवारे सर व संजय शेट्ये यांनी शैक्षणिक विभागात पुढाकार घेतला. यासाठी ट्रस्टच्या माध्यमातून कोकणातील १२ महाविद्यालयात १०० संगणक वाटपाचा उपक्रम आज करण्यात आला. पाच पेक्षा जास्त आणि १० पेक्षा कमी संगणक प्रत्येक महाविद्यालयाला देण्यात येतील असेही जयंत पाटील यांनी सांगितले.

निसर्ग चक्रीवादळाने नुकसान झाल्याने कोकणातील भागात शैक्षणिक क्षेत्रात मदत करण्यासाठी प्रा.टी.अे.शिवारे सर व संजय शेट्ये यांनी मदत मिळण्यासाठी पुढाकार घेतला. यातून मुंबई विद्यापीठाने पहिल्यांदाच ६७ लाख रुपयांचा निधी देऊन मदत केली असल्याचे कोषाध्यक्ष हेमंत टकले यांनी दिली.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून वादळात नुकसान झालेल्या महाविद्यालयाना १०० संगणकाचे वाटप करण्यात येत आहे तसेच याआधी ट्रस्टने पन्नास लाखाचे पत्रे देण्याचे काम केले आहे असेही हेमंत टकले यांनी स्पष्ट केले.

देशात आलेल्या आपत्तीवर नुकसान हे केंद्रबिंदू मानून राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून मदत ही केलीच जाते असेही सांगितले.

यावेळी वेल्फेअर ट्रस्टच्या विश्वस्त खासदार सुप्रियाताई सुळे, कोषाध्यक्ष हेमंत टकले, रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, विल्सन कॉलेजचे प्रा.टी.अे. शिवारे, सहकार भांडारचे चेअरमन संजय शेट्ये,युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख,युवक कार्याध्यक्ष सुरज चव्हाण उपस्थित होते.

मा. शरद पवार यांनी रायगड जिल्ह्यात जाऊन वादळाने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत खा. सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे



# राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टने सामाजिक बांधिलकीचे हित जपूनच संकटात सापडलेल्या जनतेला मदतीची खात्री देण्याचे काम केले

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उद्‌गार



मुंबई दि. २३ जून –राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टची स्थापना झाल्यापासून ट्रस्टने सामाजिक बांधिलकीचे हित जपूनच संकटात सापडलेल्या जनतेला मदतीची खात्री देण्याचे काम कालही केले... आजही करत आहे आणि उद्याही करणार आहे असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे कोरोना संकटाच्या काळात केलेल्या सामाजिक कामाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ते बोलत होते.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टने सामाजिक बांधिलकीने नैसर्गिक आपत्तीत मदतीचा हात...जनावरांच्या छावण्यात पशुखाद्य असेल... पुरपरिस्थितीत अन्नधान्याचे वाटप असेल किंवा कोरोना काळात केलेले काम असेल. या ट्रस्टला अनेक दात्यांनी व स्वयंसेवी संस्थांनी मदत केली आहे त्या सर्वांना अजित पवार यांनी धन्यवाद दिले.

अजित पवार यांनी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात कोरोनाचे संक्रमण वाढण्याची शक्यता वर्तवली जात असल्याचे सांगितले. राज्यातील नागरिकांनी केंद्र व राज्यसरकार आपल्यापरीने प्रयत्न करत आहे. जनतेने प्रतिसाद दिला नाही आणि मास्क व फिजिकल डिस्टन्सिंगची उणीव राहिली तर फार मोठी किंमत मोजावी लागेल अशी भीती व्यक्त केली.

राज्यातील शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित होता तो पवारसाहेब यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा झाल्यावर मार्ग निघाला आहे. शिवाय आशा वर्कर्स यांचे प्रश्न आहेत. त्यांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना संपावर जाण्याची वेळ महाविकास आघाडी सरकार आणू देणार नाही असा विश्वासही अजित पवार यांनी दिला.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे मंजूर केलेल्या निधीचं वितरण करणे, अंशत: अनुदानित शाळांना प्रचलित धोरणाप्रमाणे टप्पा देण्याचा शासननिर्णय जारी करणे, कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांना अनुदानासह मान्यता देणे, अघोषितला घोषित करुन अनुदान देणे आदी मुद्यांबाबत राज्य शासन सकारात्मक असून या मुद्यांवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत विचार करुन निर्णय घेण्यात येईल अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

**अजित पवार व जयंत पाटील यांच्या शुभहस्ते वादळात नुकसान झालेल्या शाळांना राष्ट्रवादी वेलफेअर ट्रस्टमधून पत्रे देण्यात आले. या पत्र्यांचा स्वीकार करताना खा. सुनील तटकरे, शेजारी खा. सुप्रिया सुळे आणि खा. अमोल कोल्हे**





शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी मा. शरद पवार आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथीगृहात झालेली बैठक.

कोरोना संकटामुळे लागू टाळेबंदीचा फटका राज्यातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही बसला असून शिक्षक बांधवांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सह्याद्री अतिथिगृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत आमदार सर्वश्री बाळाराम पाटील, दत्तात्रय सावंत, श्रीकांत देशपांडे, किशोर दराडे आदींनी उपस्थित केलेल्या शिक्षणविषयक प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. राज्यातील शाळांचे अनुदान, वाढीव मान्यता व शिक्षकांच्या संदर्भात मागील सरकारने सप्टेंबर महिन्यात लागू केलेल्या अटी शिथील करुन संबंधितांना मदत करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा तसेच मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरवण्यात आले. बैठकीला शालेय शिक्षण मंत्री वर्षाताई गायकवाड, तसेच वित्त व शालेय शिक्षण विभागाचे सचिव उपस्थित होते.

# अनेक घटकांना राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टतर्फे मदतीचा हात

## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांची माहिती

कोरोना काळात लॉकडाऊन झाल्यावर अनेक घटकांची आर्थिक कोंडी झाली त्यांना मदतीचा हात पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टने दिल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील लोककलावंत व नाटयसृष्टीतील बॅकस्टेजला काम करणाऱ्या कलाकारांना रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा केली तर कोरोना योध्दा, आशा वर्कर्स यांना फेशशिल्ड दिल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले.




राज्यातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने दीड लाख फेशशिल्ड वाटप करण्यात आली आहेत. यासाठी पक्षाचे पदाधिकारी, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, इंडियन मेडिकल असोसिएशन,व मार्डचे अध्यक्ष दिपक मुंडे यांनी सहकार्य केले.

रंगभूमीवर बॅकस्टेजला काम करणाऱ्या जवळपास दीड हजार कामगारांपैकी १२५० कामगारांना प्रत्येकी अडीच हजार रुपये बँक खात्यात जमा करण्यात आले आहेत.

राज्यातील लोककलावंतांच्या खात्यात प्रत्येकी ३ हजार रुपये जमा करण्यात आले. निकड व गरज असलेल्या लोककलावंतांचा शोध माजी आमदार लक्ष्मण माने यांनी घेतल्याचेही जयंत पाटील यांनी सांगितले.

६० हजार आशा वर्कर्सना फेशशिल्ड वाटप करण्यात आली. याशिवाय चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रायगड जिल्हयात ५० लाख किमतीचे ५ हजार घरांचे लोखंडी पत्रे व दीड हजार ढापे देण्यात आले असल्याचेही जयंत पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून घेतलेले निर्णय व काम सर्वांना कळावे शिवाय तीन महिन्यात ज्या लोकांना मदतीची गरज होती त्यासाठी पुढाकार घेऊन ही मदत केल्याचे पत्रकार परिषदेत जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष आणि राज्याचे जलसंपदामंत्री जयंत पाटील, नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार सुनिल तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी, माजी आमदार लक्ष्मण माने, अभिनेते शरद पोंक्षे, ट्रस्टचे विश्वस्त व माजी आमदार हेमंत टकले, मार्डचे अध्यक्ष दिपक मुंडे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ. संतोष कदम आदी उपस्थित होते. यावेळी अभिनेते शरद पोंक्षे, माजी आमदार लक्ष्मण माने, इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ. संतोष कदम यांनी आपले विचार व्यक्त केले. या पत्रकार परिषदेच्या वेळी प्रातिनिधिक स्वरूपात खासदार सुनिल तटकरे यांच्याकडे पत्रा भेट देण्यात आला.

# राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून आपदग्रस्त ७५ शाळांना लोखंडी पत्रे, ढापे देण्यात आले



**खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते शाळांना पत्रे व इतर पूरक साहित्याचे वाटप**

रायगड दि. २७ जून – निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील शाळांना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी आज भेट दिली आणि आपदग्रस्त शाळांच्या व्यवस्थापनाकडे पत्रे व इतर पूरक साहित्य सुपूर्द केले. राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्यावतीने आपदग्रस्त शाळांना पत्रे व इतर पूरक साहित्य वाटप करण्यासाठी आज वेल्फेअर ट्रस्टच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे या मुरुड – नांदगाव येथे आल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील बाधित गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांना धीर दिला होता. शिवाय ज्या शेतकऱ्यांचे व शाळांचे नुकसान झाले त्यांना तातडीने मदत देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार आज खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली नांदगाव येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची पाहणी करण्यात आली. त्यानंतर या शाळेला पत्रे व इतर पूरक साहित्य राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून देण्यात आले.

राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील आपदग्रस्त ७५ शाळांना लोखंडी पत्रे, ढापे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या या एकदिवसीय दौऱ्यात त्यांच्यासमवेत खासदार डॉ. अमोल कोल्हे, राज्याच्या विधी व न्याय राज्यमंत्री आणि रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे व पदाधिकारी उपस्थित होते.

# संकटकाळी कार्यकर्त्यांची मदत

**(पान ४ वरून)** अजूनही खूप मागे आहोत हे पटकन लक्षात येते. असे असले तरीही आपल्या केंद्र व राज्य दोन्ही सरकारांनी तातडीने जी पाऊले उचलली व धोरणात्मक निर्णय घेऊन कठोर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला आणि जनतेनेही त्यासाठी जी मनापासून साथ दिली त्यामुळे अमेरिकेपेक्षा आपल्याकडे संकटाचा जीवघेणा परिणाम सुरुवातीच्या काळात थोडा कमी झाला. पण आता वाढतो की काय अशी भिती रोजच्या वाढणाऱ्या आकड्यांमुळे वाटू लागली आहे. अशा वेळी प्रत्येक माणसाने स्वतःच्या जीवाची काळजी घेणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजना (उदा. नाका-तोंडाला मास्क वा रुमाल लावणे, साबण व सॅनिटायझरने वारंवार हात धुणे, नाका-तोंडाला हात न लावणे, सोशल डिस्टन्स पाळणे म्हणजे अगदी जवळ जवळ न बसणे, रोज साबणाने स्वच्छ आंघोळ करणे, बाहेरुन आलो की साबणाने हात, पाय, तोंड धुणे वगैरे) करणे अनिवार्य व गरजेचे आहे.



याबाबत आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी देखील जनतेमध्ये जाऊन प्रसार प्रचार केला पाहिजे व जाणीव जागृती दाखविली पाहिजे. कार्यकर्त्यांचे ईमान जसे त्याच्या नेत्याशी असते तसे ते त्याने निर्माण केलेल्या कार्यप्रणालीशी असते. आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ जाणते नेते मा. शरदरावजी पवार साहेब आता वयाच्या ८० च्या उंबरठ्यावर आहेत. तरी देखील ते लोकांच्या जीवनाची स्वतःच्या जीवापेक्षा अधिक काळजी वाहताहेत. त्यासाठी सरकारला मार्गदर्शन करताहेत. स्वतः वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन मिटींग घेऊन प्रश्न समजून घेऊन त्याबाबतच्या उपाययोजना सरकारला सुचविताहेत. आपल्या कार्यकर्त्यांनीदेखील काळजी घेऊन सरकारला नवनवीन उपाय सुचविले पाहिजेत. वेळ पडल्यास जर आपल्याला नवीन काही सुचत नसले तर नवीन तरुण कार्यकर्ते, लोक काय म्हणताहेत ते जाणून घेतले पाहिजे. यासाठी ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी जुन्या-नव्याचा प्रितीसंगम घडवून आणला पाहिजे. सतत आपसातला संवाद, चर्चा व विचारांची देवाणघेवाण चालू ठेवली पाहिजे. यासाठी रोज प्रत्यक्ष भेटण्याची काहीही आवश्यकता नाही.

मोबाईल व संगणकाने जग आपल्या घरात आणून ठेवले आहे. मोबाईल नाही असा एकही कार्यकर्ता नसेल. सोशल मिडियाचा (उदा. फेसबुक, व्हॉटस्अप, ट्वीटर, वेबिनार वगैरे) पुरेपुर वापर करुन आपण मनात आलेल्या विचार व मतांचा प्रभावीपणे प्रसार व प्रचार करु शकता. फक्त ही मते व विचार समाजाच्या उन्नती व कल्याणाचेच असावेत. स्वतःच्या स्वार्थाचे असू नयेत याचे भान कार्यकर्त्यांनी बाळगणे गरजेचे आहे. कार्यकर्ते संकट काळात लोकांना जी मदत करतील ती जनता कधीही विसरणार नाही.



# सावधानता हाच उपाय

**(पान ५ वरून )** राहून जमणार नाही. कडक शिस्तीचे पालन सर्वांनाच करावे लागेल. फार काळ किंवा वारंवार लॉकडाऊन करणे आणि सगळे उद्योगधंदे, दुकाने, व्यवहार बंद करण्याने हा प्रश्न सुटणार नाही.

समाजातला खूप मोठा वर्ग हा कष्टकरी, हातावर पोट असणारा, रोज मजुरीचे काम केले तरच संध्याकाळी चूल पेटणारा असा गोरगरीब वर्गातला आहे. या वर्गाला कामासाठी रोज बाहेर पडावेच लागेल. मग ते काम शेतीतले, कारखान्यातले, बिल्डरकडचे किंवा कोणतीही सेवा पुरविण्याचे असो. धुणे, भांडी, फरशा पुसणे, पोळ्या व स्वयंपाक करणे, भाज्या निवडणे यांसारखी कामे दिसायला अत्यंत हलकी आहेत. पण या कामात लाखो महिला व मोलकरणी गुंतलेल्या आहेत. हलकी असली तरी अत्यंत जीवनावश्यक अशी ही कामे आहेत ती वेळेवरच पूर्ण करावी लागतात. आर्थिक परिस्थिती दुबळी असलेला बहुसंख्य समाज व जनता या कामांमध्ये गुंतलेली आहे. या जनतेने स्वतः होऊन स्वतःची काळजी घेणे आणि आपल्यापासून इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता बाळगणे आवश्यक आहे.



हा रोग झाला म्हणजे माणूस मरणारच हा भ्रम व गैरसमज मनातून काढून टाका. वेळेवर योग्य ते उपचार घेतले आणि आवश्यक ती पथ्ये पाळली तर या रोगातून माणूस पूर्ण बरा होतो हे आपण सर्वांनी पाहिले आहे. काळजी नाही घेतली, आजार झालाय हे लपवून ठेवले आणि औषधोपचारांकडे पाठ फिरविली तर 'रामनाम सत्य है' हे म्हणण्याची पाळी येणारच. 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा' ही स्थिती आपणच आपल्या बेजबाबदार वागण्यातून निर्माण करतो. क्वारंटाईन व्हावे लागत असल्यामुळे किंवा एकट्याला वेगळे राहावे लागत असल्यामुळेही बऱ्याचदा अनेक लोक खोटे बोलणे पसंत करतात आणि खरी माहिती दडविण्याचा प्रयत्न करतात. यातून ते त्यांचे स्वतःचे आणि इतरांचेही जीवन धोक्यात आणित असतात. मृत्यूच्या दारात जाण्यापेक्षा वेगळे एकट्याने राहणे, क्वारंटाईन होणे हे जास्त सोपे व श्रेयस्कर आहे. त्यात सगळ्यांचे हित आहे.

कोरोना महामारीमुळे अनेक उद्योगधंदे, कारखाने, व्यवसाय बंद पडले आहेत. त्यामुळे बऱ्याच लोकांच्या नोकऱ्या व रोजगार जाऊन त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. सगळे धंदे भुईसपाट झाले आहेत. शेतकऱ्याने मोठ्या प्रमाणावर उत्पादित केलेला माल विकायचा कुठे असा प्रश्न असल्याने शेतकरीही नाशवंत मालाच्या उत्पादनाकडे पाठ फिरवितो आहे. कोरोनाच्या सुरुवातीच्या काळात म्हणजे मार्च-एप्रिलमध्ये जेव्हा पूर्ण लॉकडाऊन होते, बाजार समित्यांनी बाजार बंद ठेवले होते तेव्हा शेतकऱ्यांना माल कुठे विकावा असा प्रश्न निर्माण झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी भाजीपाला, फुले उपटून फेकून दिली. उकीरड्यावर टाकली. काहींनी जनावरांना चारा म्हणून खायला घातली. शेतकरी, उद्योजक, कामगार, मजूर, नोकरदार एवढंच नव्हे तर हातगाडीवर माल विकणारे व छोटे छोटे व्यावसायिक या सर्वांना महामारीच्या संकटाची झळ पोहोचलेली आहे.

आजचा काळ व वेळ सर्वांसाठी कठीण व परीक्षा पाहणारी आहे. संकटे कधी एकेकटी येत नाही. ती एकदम चोहोबाजूंनी व सर्व मिळून येतात हे आपण अनुभवतो आहोत. अशा वेळी आपण एकमेकांना समजून घेत मदतीचा हात देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकमेकांच्या दुःखात सहभागी होऊन अडचणींवर मात कशी करता येईल अशा प्रकारचा संवाद व वैचारिक देवाणघेवाण केली पाहिजे. धीर दिला पाहिजे. ही वेळ व संकट कायम राहणार नाही. ते सहा महिने-वर्षभरात निघूनही जाईल. सगळी स्थिती पूर्वपदावर निश्चित येईल. पण संकटकाळात ज्यांनी मदत केली ते लोक कधीही विसरत नाहीत. शेवटपर्यंत ते ध्यानात ठेवतात. आपला समाज तेवढा कृतज्ञ निश्चित आहे. तेव्हा आपण एकमेकांना या संकटकाळी मनापासून मदत करण्याचा निर्धार करूया. तो आपल्याला आणि पक्षालाही भावी काळात निश्चित उपयोगी ठरेल.

# शेवटचे पान



# शापीत जगणे

**कोरोना कोविड-१९ या व्हायरसचा प्रादुर्भाव झाल्यामुळे गावोगावच्या व विशेषतः शहरांमधल्या वैकुंठभूमी व स्मशानभूमींमध्ये ॲम्ब्युलन्स गाड्यांची रांग लागते आहे. विद्युत दाहिनीत शव ढकलणाऱ्या माणसांना कोण मरण पावले? हे विचारायला सुद्धा वेळ नाही. एका पाठोपाठ एक प्रेते आत अग्नीकुंडात ढकलणे एवढेच काम अखंडपणे तो करतो आहे. कोरोनाच्या साथीने बळी घेतलेल्या माणसाला अग्नीडाग देताना स्मशानभूमीत काम करणाऱ्याच्या मनाची जी भावनातत्मक उलघाल होते तिचे हे चित्रण.**

थकला-भागला त्याचा जीव उबगला होता. उसंतच मिळत नव्हती. न्याहारीला वेळ नाही, पण तहान तर भागवायला हवी नां, नाईलाज होता त्याचा. इथे त्या इहलोकीची यात्रा संपवलेला कोण घेऊन येत आहेत, हे सुदधा विचारायची सोय नव्हती. कितीजणांना परवानगी मिळाली? मग त्यांची विद्युत दाहिनीजवळ जाण्याआधी नोंद करायची. जीव संपल्याचा दवाखान्याचा दाखला उतरवायचा. डेथ सर्टिफिकेटचे रकाने भरायचे. पूर्ण नाव. वय, राहण्याचा पत्ता, व्यवसाय, तारीख, वार. आता हे करण्यासाठी सुद्धा त्याला लॅपटॉप मिळणार होता. मग प्रिंटरला जोडला की एटीममधून जसे पैसे बाहेर पडतात तसं सर्टिफिकेट डाऊनलोड करायचं. शिवाय हव्या तितक्या ओरिजनल प्रती मिळणार होत्या. याचा वापर करणं सुरुवातीला त्याला जड गेलं, पण एका पाठी एक येणाऱ्या नव्या शववाहिकांनी इथे ट्रॅफीक जाम होऊ नये, म्हणूनही काळजी घ्यावी लागायची. हे सगळं दिव्यं अंगावर पूर्ण कीट परिधान करूनच करता येण्याचं होतं. कोणी नात्यातलं बरोबर आलं असेल तर त्यांच्या अश्रूंची वाट मोकळी झाल्यावर, त्यांनाही कीट घालायला





लावायचं. ट्रॉली असते ना तयार, अखेरच्या प्रवासासाठी. सुरुवातीला दिवसभरात दोन-तिनंच बॉड्या येत असत. कोण गेलं त्याची चौकशी तो ही आपुलकीने करायचा. कोण कधी संपून जाईल याचा भरवसाच राहिला नव्हता.

आता मंत्राग्निसाठी कोण किरवंत येणार काही कळत नाही, पण त्या व्यवसायातसुद्धा आता इतरजण घुसखोरी करायला लागले होते. काय करणार?







पुजापाठावर पोट भरणाऱ्यांचा रोजगार बुडाला होता. कोणीतरी योद्धासुद्धा जेंव्हा समोर यायचा नां स्ट्रेचरवर तेव्हा त्याचा जीव गलबलून जायचा. मानवतेची सेवा करणाऱ्यांचासुद्धा असा अंत होऊ शकतो. खाकी वर्दीवाल्यांच सुद्धा असंच. एवढं सगळं होत असून सुद्धा माणुसकी जागी आहे, आणि हां एक मोठा दिलासा होता. त्याने तर आता घरी जायचं ही बंद केलं होतं. कारण २४ x ७ कामात खंड पडून चालणारं नव्हतं.

आज आता मध्य रात्र अवतरली आहे. जवळ पास दोन-तीन तास नव्यांन कोणाचं आगमन झालेलं नव्हतं. त्याला वाटलं यमदेव सुद्धा थकून गेला असेल. शिवाय इथे दिवस रात्र काम केल्यावर घरी गेल्यावर कोणाला त्याची लागण व्हायला नको होती. त्याचा दोन वेळचा जेवणाचा डबा यायचा, थर्मासमध्ये गरम पाणी सुद्धा यायचं. पण अजूनपर्यंत त्याला कोणी 'योद्धा' म्हणून गौरवलं नव्हतं. कारण तो करत होता तो सगळं अखेरच्या श्वासानंतरचं होतं. तसं हे काम त्याच्याकडे परंपरेने चालत आलेलं होतं. त्याच्या घरात पणजोबांपासून हा वारसा होता. त्याला नव्हत पडायचं यात, त्याचा मोठा भाऊ चालवायचा हा वारसा. त्याने चांगलं शिक्षण घेतलं होतं. नोकरीसाठी शोध घेतला होता काही वर्ष, आणि मग अचानक मोठा भाऊ इहलोक सोडून गेला. याला मिळाली भावाची जागा, अनुकंपा तत्वावर. पगार तर सुरु झाला, पोटापाण्याचा प्रश्न मिटला. मग सुरुवातीला अवघड वाटलेलं, आता सरावाने नीट चालू लागलं. भावना तर केव्हाच विझून गेल्या होत्या. कधी कधी काहीतरी विचित्र गोष्टींना त्यालाही सामोरं जावं लागत होतं. मध्यंतरी असाच एक निष्प्राण देह आला. बरोबर बहुतेक त्याच्या घरातलं कोणीतरी होतं. एक तरुण मुलगा होता. ट्रॉली दाहिनीत सरकवण्याआधी म्हणाला, काका थांबा नां फक्त एक मिनिट प्लीज. काय करावं त्याने? तर मोबाईलवर सेल्फी काढला, अखेरचा सेंडऑफ. तिरीमिरीत त्याला काही बोलावं, त्याचा मोबाईल हिसकावून घ्यावा, असंही क्षणभर त्याचा मनात आलं. पण थंड राहून त्याने यातलं काहीच केलं नाही. आता तो युवक सेल्फी सेंड करणार, त्याला एखाद्या भक्तीसंगीताची जोड देणार, आणी मग वाट बघत बसणार किती लाईक्स मिळतायेत त्याची. असाही इव्हेंट होऊ शकतो याबद्दल त्याला आता मनापासून वाईट वाटू लागलं. पण



करणार काय? जगणं आणि मरणं या मधील सीमा रेषा आता पुसट होत चालली होती, म्हणून नाही थांबवता येत अशा माणसांना. हे सगळं अनुभवताना त्याला आजोबांची आठवण झाली. त्यांच्यावेळी सुद्धा अंतयात्रा यायच्या, पण त्या वाजतगाजत, भजनी मंडळ आघाडीवर असायचं, फुलांनी सजवलेली तिरडी, शांत पहुडलेला मृतदेह, हे अंत्यसंस्कार करतांना कुठेतरी आपण देवाच्या घराच्या जवळ असल्याचा भास व्हायचा. काळाच्या ओघात् हे सगळं संपून गेलं. आता खुणा तेवढ्या शिल्लक आहेत. अनुभवी खांदेकरी लाकडं किती मणं घायची हेसुद्धा न चुकता सांगायची. काही जाणारे महाभाग तर असे असायचे की त्यांनी हयातीत चंदनाची झाडं जपलेली असायची आणि मग अखेरचा प्रवास त्यांचा चंदनगंधित व्हायचा. आता कोणी तरी तिऱ्हाईत किंवा सेवेकरी घेऊन येतात पोहोचवायला. कोरोनाने जगण्याचच नाही तर मरण्याचं चक्रही बदलून टाकलंय.

जेंव्हा या घाई गर्दीतून त्याला थोडी सवड मिळते तेव्हा तो खबर घेतो कब्रस्तानात काम करत असलेल्या आपल्या मित्राची, रहीमची, तशी शाळेपासून दोघांची मैत्री, एकत्रच असायचे. नावं ही दोघांची राम आणि रहीम. त्याला तिकडच्या शेवटकडचा प्रवास इकडच्या सारखाच असायचा, फक्त अग्नीऐवजी मातीत खोलवर चिरनिद्रेसाठी पाठवण्याचा. मग अशा वेळी आठवण होते या कवितेची –

*जगण्याच्या या शापासाठी उ:शाप आहे मरणाचा,*
*जगण्याच्या या शापासाठी उ:शाप आहे मरणाचा ।*
*काळोखातील रस्त्यावरती उजेड जळत्या सरणाचा,*
*उजेड जळत्या सरणाचा ।।*

■■■

